# प्रकरण तीन

## महिला व बालकल्याण विभाग

**3.881 कुपोषित मुलांसाठी अतिरिक्त आहार पुरविणे.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** सदर योजनेवर रक्कम रूपये 8,17,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेंतर्गत MUW वर्गवारीतील 1,508 व SUV वर्गवारीतील 236 असे एकूण 1,744 बालकांना ऑक्टोबर 2016 ते मार्च 2017 या कालावधीत आहार पुरविण्यात आलेला होता. सदर योजना 24 जानेवारी 2014 च्या अनुसार राबवण्यात येत असली, तरी सन 2016-2017 या आर्थिक वर्षात सदर योजना ऑक्टो 2016 मध्ये इतक्या विलंबाने राबविणे सुरु केली आहे. तसेच SUW या वर्गवारीतील 236 मुले असतांना व सदर बाब अत्यंत गंभीर असतांनासुद्धा सदर बालकांना एप्रिल ते सप्टेंबर 2016 या कालावधीत सकस आहारापासून वंचित ठेवण्यात आलेले आहे.

2) कुपोषणाच्या अवस्थेच्या आधारावर दोन वर्गवारी केली असतांना दोन्ही वर्गवारीच्या बालकांना वेगवेगळ्या पद्धतीचा आहार पुरविणे आवश्यक असतांना एकाच पद्धतीचा आहार पुरविण्यात आलेला आहे.

3) योजनेचा प्रगती अहवाल, उपयोगिता प्रमाणपत्रे उपलब्ध नाही.

4) 1,744 कुपोषित बालकांपैकी किती मुले कुपोषित वर्गवारीतून बाहेर आले? SUW या वर्गवारीतील 236 बालके सदर योजना राबविल्याने MUW किंवा कुपोषातून बाहेर पडली, याचा प्रगती अहवाल नसल्याने सदर योजनेच्या उपयुक्ततेचे मुल्यांकन लेखापरीक्षणास करता आले नाही.

**3.882 महिलांसाठी विशेष योजना समुपदेशन केंद्र चालविणे.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परिषद, पालघर, महिला व बालकल्याण विभागाचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षातील उपलब्ध लेखे तपासले असता सदरबाबत रक्कम रुपये 3,51,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णयाप्रमाणे समुपदेशन व सल्लागारांची निवड मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा सरकारी वकील सिनीअर ने एफ.एम.सी. (ज्युडीशियल मेजेस्ट्रीट) इत्यादी अधिकाऱ्याची समितीमार्फत करण्यात यावी, अशा सूचना निर्गमित केलेल्या आहेत. परंतु, महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, पालघर यांनी समितीची निवड केलेली नाही.

2) निवड समिती गठीत करून संस्था निविदेची प्रक्रिया राबविलेली दिसत नाही. तसेच समुपदेशन केंद्राची निवड करताना विहित अटी व शर्तीचे पालन करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) समुपदेशन केंद्र जिल्ह्यातील सर्व तालुक्यात राबविणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1089/646/266/3, दिनांक 29/07/1989 अन्वये फलश्रुती अहवाल व मुल्यमापन पडताळणी न केल्याने योजनेच्या उद्देश सफल झाला किंवा कसे, यांचा पडताळणी अहवाल लेखापरीक्षणास आढळून आलेला नाही.

**3.883 जिल्हा मुख्यालये जिल्हा स्तरीय महिला बचत गटाचा महामेळावा आयोजीत करणे बाबत.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** जिल्हा मुख्यालय जिल्हास्तरीय महिला बचत गटाचा महामेळावा आयोजीत करणेबाबत रक्कम रूपये 23,31,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजना राबविणेसाठी महिला बाल विकास विभाग यांनी वेगवेळया कामांच्या वेगवेगळया बचत गटांकडून निविदा मागवून सेवांचा व वस्तू पुरवठा केला आहे. उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय

क्रमांक भांखस/2014/प्र.क्र.82 भाग-3 उद्योग- 4, दिनांक 30/10/2015 नुसार ई-निविदा मागवून एकाच बचत गटाकडून वस्तू व सेवा पुरवठा करणेबाबत निविदा प्रसिद्ध करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही का केली नाही, याबाबत खुलासा करावा.

अ) ओमसाई महिला बचत गट यांना जनरेटर सुरक्षा व्यवस्था पुरविणेसाठी रुपये 2,88,000/-

ब) श्रीकृपा महिला बचत गट, पोयनाड यांना विविध स्टॉल उभारणेसाठी रुपये 2,97,000/-

क) जयभवानी बचत गट, पोयनाड यांना स्टेज व्यवस्था व डेकोरेशन पुरवठा करणेसाठी रुपये 2,99,000/-

ड) श्रीकृपा महिला बचत गट, पोयनाड यांना जनरेटर डिझेल व साऊंड सिस्टीम पुरवठा करणेसाठी रुपये 2,88,000/-

इ) विकास महिला बचत गट, अलिबाग यांना स्वच्छता ग्राऊंड तयार करणेसाठी रुपये 2,95,000/-

फ) समर्थ महिला बचत गट, अलिबाग यांना टेबल खर्ची पुरविणेसाठी रुपये 2,88,000/-

ग) शीवाई महिला बचत गट, अलिबाग यांना जेवण व पिण्याचे पाणी पुरवठा करणेसाठी रुपये 2,88,000/-

ज) वनवटी दांडा महिला बचत गट, उरण यांना सांस्कृतीक कार्यक्रम आयोजीत करणेबाबत रुपये 2,88,000/- अदा केले आहेत. सदरच्या अदा केलेल्या रक्कमेवर आयकर अधिनियम 1961 कलम 194 सी नुसार 2 टक्के दराने आयकर रक्कम रूपये 46,480/- कपात करणे आवश्यक असतांना महिला बालकल्याण विभागाने तशी कार्यवाही केलेली नाही. तसेच पुरवठा केलेल्या पावतीवर कोणत्याही कंत्राटदाराने दिनांक नमूद केलेला नाही.

2) वनवटी दांडा महिला बचत गट, उरण यांनी दिनांक 20/12/2016 ते 25/12/2016 या कालावधीत कोणत्या सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन केले, याबाबतचा अहवाल लेखा परीक्षणास उपलब्ध झाला नाही.

3) बचत गटांचे नोंदणी प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

4) ओमसाई महिला बचत गट यांनी 40 सुरक्षा रक्षकांचा पुरवठा केला आहे. पुरवठा केलेले सुरक्षा रक्षक यांना सुरक्षा रक्षक कामकाजाचा अनुभव असलेबाबतची प्रमाणपत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाहीत. तसेच पुरवठा केलेल्या कर्मचा-यांची नावनिहाय यादी लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

5) विकास महिला बचत गट यांनी रोलरसह कामगार पुरविले आहेत. त्या कामगारांनी कोणत्या ठिकाणचे सपाटीकरण केले व किती भागाचे सपाटीकरण केले, याबाबतचे लेखे लेखापरीक्षणास उपलबध झाले नाहीत.

**3.884 90 टक्के अनुदानावर विशेष घटक योजना मधून महिलांना घरघंटी पुरविणे.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,87,000/- खर्च करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मंडणगड तालुक्यातील बालविकास प्रकल्प अधिकारी यांचेकडील 2 लाभार्थी प्रस्ताव तपासणीस उपलब्ध झाले नाहीत.

2) योजनेच्या अटीशर्ती नुसार अट क्रमांक 5 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/परा-1, दिनांक 24/01/2014 मधील योजनेच्या अमंलबजावणीबाबतच्या नियमांनुसार वस्तूच्या खर्च किंमतीच्या 10 टक्के रक्कम लाभार्थी हिस्सा प्रथम जिल्हा परिषदेकडे जमा करणे आवश्यक असताना लाभार्थी यांना घरघंटीच्या किंमतीचे अनुदान रुपये 17,000/- प्रमाणे वर्ग करण्यात आले आहे. त्यामुळे लाभार्थी यांनी 10 टक्के हिस्सा रक्कम भरणा केलेली नाही. ती वसूल करून शासन खाती भरणा करावी.

3) लाभार्थी यांनी घरघंटी जिल्हा परिषदेने ठरवून दिल्याप्रमाणे खरेदी केलेबाबत खरेदी पावत्या उपलब्ध करून देणेत याव्यात.

**3.885 अंगणवाड्यांना विविध साहित्य पुरविणे अंतर्गत अंगणवाड्यांना इलेक्ट्रॉनिक वजनकाटे पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** अंगणवाड्यांना विविध साहित्य पुरविणे अंतर्गत अंगणवाड्यांना इलेक्ट्रॉनिक वजनकाटे खरेदीकरीता रक्कम रूपये 9,78,824/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ई - निविदा सूचना अट क्रमांक 4अ) 12 नुसार पुरवठेदार यांचा काळ्या यादीत नसल्याबाबतचे घोषणापत्र घेण्यात आलेले नाही. तसेच अट क्रमंक 4 अ) 13 नुसार पुरवठादाराचे नावावर कोणताही गुन्हा नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र घेण्यात आलेले नाही.

2) सदर ई - निविदा सूचना निकष व अटींमध्ये सर्व करांसह दर नमूद करण्याच्या स्पष्ट सूचना असताना पुरवठादाराने निविदा उघडल्यानंतर नमूद दर करांव्यतिरिक्त असल्याचे पत्र दिले आहे. सबब त्याने निविदा सूचना अट क्रमांक 6 नुसार निविदा प्रक्रियेतून माघार घेतल्याबाबत त्याची बयाना रक्कम जप्त करणे आवश्यक आहे. सदर रक्कम रुपये 11,000/- वसूल करून भरणा करावी.

3) करारनामा दिनांक नमूद नाही व मुख्य कार्यकारी अधिकारी स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही.

4) पुरवठा आदेश दिनांक 29/03/2017 नुसार खरेदी केलेल्या 14 वजनकाट्यांचे बालविकास प्रकल्प अधिकारी यांची पोहोच नाही. तसेच डिलिव्हरी चलन उपलब्ध झाले नाही.

5) सदर वजनकाटे ज्या अंगणवाडीना वितरीत करण्यात आले, त्या अंगणवाडीच्या जंगम मालमत्ता नोंदवहीमध्ये वजनकाटा मशीन नंबरसह नोंद घेऊन त्याची साक्षांकित प्रत सादर करावी.

**3.886 कुपोषित मुलामुलींसाठी अतिरिक्त आहार देणे योजने अंतर्गत मल्टी व्हीटॅमीन सिरप खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** कुपोषित मुलामुलींसाठी अतिरिक्त आहार देणे योजने अंतर्गत मल्टी व्हीटॅमीन सिरप खरेदीकरीता रक्कम रूपये 8,04,833/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशासकीय मान्यता आदेश व तांत्रिक मान्यता आदेश यावर जावक क्रमांक, दिनांक नमूद नाही. तसेच खातेप्रमुख स्वाक्षरी नाही.

2) दरकरारातील अटीनुसार पुरवठादराने 30 दिवसांच्या आत पुरवठा न केल्यास प्रती आठवडा 0.5 टक्के दराने दंडाची आकारणी करावी. सदर साहित्य पुरवठा 2 आठवडे विलंबाने झाला आहे. परंतु, दंडाची रक्कम एकाच आठवड्याची वसूल केली आहे. दुसऱ्या आठवड्याची दंड रक्कम रुपये 4,024/- वसूल करून पूर्तता दाखवावी.

3) मालवण, वेंगुर्ला आणि देवगड तालुका यांचे बालविकास प्रकल्प अधिकारी यांची पोहोच नाही. तसेच डिलिव्हरी चलन उपलब्ध झाले नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए -2013/प्र.क्र.76/ पंरा-1, दिनांक 24/01/2014 मधील योजना क्रमांक 14 नुसार सदर साहित्याचा पुरवठा ICDS योजने अंतर्गत होत असल्यास या योजनेमधून सदर पुरवठा करण्यात येऊ नये, असे निर्देश आहेत. ICDS मधून सदर साहित्य पुरवठा होत नाही, असे प्रमाणित केलेले नाही.

**3.887 महिलांना साहित्य पुरविणे ह्या योजने अंतर्गत महिलांना शिलाई मशिन पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** महिलांना साहित्य पुरविणे ह्या योजने अंतर्गत महिलांना शिलाई मशिन खरेदिकरिता रक्कम रूपये 9,96,975/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) डिलिव्हरी चलनवर साहित्य पोहोच दिनांक नमूद नाही.

2) योजना लाभार्थी प्रस्तावामध्ये दुबार लाभ न घेतलेबाबत ग्रामसेवक दाखला नाही.

दृष्टी दीपक ताठे, सुनिता संजय लोके

3) तांत्रिक मान्यता आदेशातील अटीनुसार लाभार्थी गावातील वास्तव्य 5 वर्षापेक्षा कमी नसावे. यासाठी वास्तव्य दाखला जोडलेला नाही.

कस्तुरी चंद्रकांत मेथर, सायली सुनील मसुरकर, दीपिका अशोक राउत, आरती अंकुश हुले, सानिका संदीप गुरव, प्रतिज्ञा लक्ष्मीकांत मुळे, सिद्धी गोपाळ साळगावकर, गौरी शंकर घाडी.

**3.888 सातवी ते बारावी पास मुलींना MS-CIT प्रशिक्षण देणे योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** महिला व बालकल्याण समितीच्या 22/05/2015 च्या ठराव क्रमांक 241 ने प्रती लाभार्थी प्रशिक्षणासाठी रूपये 3,350/- एवढे अनुदान मंजूर केलेले आहे. त्याप्रमाणे 253 लाभार्थ्यांचे प्रत्येकी रूपये 3,350/- याप्रमाणे एकूण रूपये 8,47,550/- एवढे अनुदान गट स्तरावर वर्ग करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेच्या अंतिम सुधारित अंदाजपत्रकानुसार सदर योजनेकरिता रूपये 11,32,300/- एवढे अनुदान प्राप्त झाले आहे. त्यापैकी रूपये 8,47,550/- एवढे अनुदान गटस्तरावर वर्ग केले आहे. खात्याने सुधारित प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेवून शिल्लक 2,86,750/- पैकी महिला व बालकल्याण समिती मासिक सभा दिनांक 07/03/2017 ठराव क्रमांक 385 ने 85 लाभार्थ्यांची निवड करून रूपये 3,350/- प्रमाणे 2,84,750/- एवढे अनुदान गटस्तरावर वर्ग केले आहे. सदर योजनेत खालीलप्रमाणे अनियमितता आढळून आल्या आहेत.

1) उपरोक्तप्रमाणे गटस्तरावर वितरीत केलेले अनुदान त्याच वर्षात खर्च झाल्याबाबत अनुदान विनियोग दाखले घेण्यात आलेले नाहीत.

2) वितरीत केलेले अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र पहावयास मिळालेले नाहीत.

3) सदर योजने अंतर्गत वर्ग केलेल्या अनुदानातून लाभार्थ्यांना प्रशिक्षण देवून ते पूर्ण करून सदर योजनेची उद्दिष्ट्पुर्ती झाल्याबाबतचा अहवाल नस्तीस उपलब्ध झालेला नाही.

**3.889 अंगणवाडी केंद्रांना विविध साहित्य पुरविणे (TSP)**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत रक्कम रुपये 29,99,238/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दिनांक 08/03/2017 रोजी महिला व बालविकास अधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर केलेल्या टिपणीत दिनांक 17/12/2016 रोजीच्या विषय समितीमध्ये वजनकाटे मशीन खरेदीबाबत ठराव झालेला आहे, असे नमुद आहे. तथापि, या ठरावाच्या सत्यप्रतीचे अवलोकन केले असता, दिनांक 17/12/2016 रोजीच्या सभेत ग्रीन बोर्ड खरेदीस समितीने मान्यता दिल्याचे दिसुन येते. तसेच दिनांक 26/12/2016 रोजी स्थानिक पातळीवर ग्रीनबोर्ड खरेदीबाबत दरपत्रके मागविलेली आहे व वाटाघाटाअंती भागयश्री एन्टरप्राईजेस, पुणे यांनी दिनांक 02/01/2017 च्या अन्वये ग्रीन बोर्ड प्रती नग रुपये 2,065/- या दराने पुरवठयास सहमती दिलेली आहे. यावरुन दिनांक 17/12/2016 च्या विषय समितीत वजनकाटे खरेदीस मान्यता प्राप्त नव्हती, असे दिसते. तसेच जर वजनकाटे मशीन खरेदीसाठी मान्यता होती, तर दिनांक 26/12/2016 रोजी स्थानिक पातळीवर ग्रीन बोर्ड खरेदीबाबत दरपत्रके का मागविण्यात आली व दिनांक 02/01/2017 रोजी ग्रीनबोर्ड पुरवठादाराशी वाटाघाटी का केल्या? याचा खुलासा करावा. प्रकल्प कार्यालयाकडुन वजनकाटे मशीन खरेदीची मागणीपत्रे जानेवारी 2017 मध्ये प्राप्त झाली आहेत. दिनांक 17/12/2016 रोजीच्या विषय समितीमध्ये मागणी प्राप्त होण्याआधी वजनकाटे मशीन खरेदी करण्यास मान्यता कशी दिली? याचा खुलासा करावा. यावरुन प्रत्यक्षात वजनकाटे खरेदीस विषय समितीची मान्यता नसतांना दिनांक 08/03/2017 रोजीच्या टिपणीत वजनकाटे खरेदीस समितीची मान्यता आहे, असे भासवुन खरेदी प्रक्रिया राबविली आहे. यावरुन दिनांक 17/12/2016 च्या विषय समितीत वजनकाटे मशीन खरेदी करणे, त्याचे दर व पुरवठयास मान्यता घेतलेली नाही, असे दिसते. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए2012/प्र.क्रं 680/वित्त-9, दिनांक 31/01/2013 अन्वये रुपये 23,00,000/- ते 30,00,000/- खर्चाचे कंत्राटस्वीकृतीस विषय समिती मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी वैधानिक तरतुदीचे पालन केले नाही, असे दिसते.

2) दिनांक 17/12/2016 रोजीचे विषय समितीचे इतिवृत्त उपलब्ध झाले नाही. तसेच नस्तीसोबत ठरावाची सत्यप्रत आढळुन आली नाही.

3) सदर योजनेतून वजन काटे मशीन चे एकूण 1,598 नग खरेदी केलेले आहेत.

जिल्हाधिकारी यांचे पत्र क्रमांक नियोजन/का-5(1)/आउयो/16-17/नियतव्य/1609, दिनांक 20/06/2016 अन्वये नाशिक प्रकल्प 0.50 लक्ष व कळवण प्रकल्प 1 कोटी नियतव्यय मंजुर केलेला आहे. या अनुषंगाने

प्रकल्पनिहाय प्राप्त अनुदानाचा विचार करता प्रकल्प कळवणसाठी रक्कम रुपये 19,99,492/- व नाशिक प्रकल्पासाठी रूपये 9,99,746/- या प्रमाणात साहित्य वाटप करणे आवश्यक होते. तथापि, प्रकल्प नाशिकसाठी रूपये 9,99,746/- ऐवजी रूपये 15,67,186/- रुपयाचे साहित्य वाटप केल्यामुळे निर्धारित प्रमाणापेक्षा प्रकल्प नाशिक यांना रूपये 5,67,440/- रुपयाचे साहित्य जादा वाटप केलेले आहे.

4) प्रकल्प दिंडोरी, उमराळे, कळवण - 1 व कळवण - 2 यांचे मागणीपत्र नाहीत. त्यामुळे या प्रकल्पांना वजनकाटे मशीनची आवश्यकता होती किंवा नाही, याची पडताळणी करता आली नाही. तरी, सदर प्रकल्पांचे मागणीपत्र प्राप्त करून दर्शवावे.

5) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्रं 82/भाग-III / उदयोग-4, दिनांक 01/12/2016 मधील परिच्छेद क्रमांक 4.6 ब-1 नुसार DGS & D येथे वस्तुकरीता नोंदविलेल्या संस्थांकरीता 2 टक्के सुरक्षा अनामत घेणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर खरेदीसाठी रुपये 60,000/- अनामत घेणे आवश्यक होते. तरी अनामत न घेतल्याबाबत खुलासा करावा.

6) अटी व शर्तीनुसार पुरवठयाच्या विं लबाबत प्रती आठवडा 0.5 टक्के प्रमाणे दंड घेणे आवश्यक आहे. प्रकल्प देवळा यांना 123 नग मशीनचा पुरवठा दिनांक 29/03/2017 रोजी झाला आहे. पुरवठयाची मुदत दिनांक 28/03/2017 अशी होती. त्यानुसार 0.5 टक्के प्रमाणे रुपये 1,154/- दंड कपात करणे आवश्यक होते. तरी दंडाची रक्कम वसुल करण्यात यावी.

7) चाचणी अहवाल देयकासोबत जोडलेला नाही. त्यामुळे दर करारातील निर्देशाप्रमाणे प्रत्यक्षात साहित्य मिळाले किंवा कसे, याची पडताळणी करता आली नाही. तरी, चाचणी अहवाल प्राप्त करुन अनुपालन दर्शवावे.

**3.890 इयत्ता 7 वी ते 12 वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण देणे**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2, 3 व 4) -** सन 2016-2017 या अहवाल वर्षात महिला व बालकल्याण विभाग यांचे संगणक प्रशिक्षण खर्चाबाबतची पडताळणी केली असता सदरबाबत रक्कम रुपये 72,83,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्रं 82/भाग-III / उदयोग-4, दिनांक 01/12/2016 मधील परिच्छेद क्रमांक 3.2.1. नुसार ज्या निविदांचे अंदाजित मूल्य 3 लक्ष रुपयापेक्षा जास्त असेल, अशा सर्व निविदा ई-निविदा पद्धतीने काढणे आवश्यक आहे. नाशिक जिल्ह्यात 220 अधिकृत प्रशिक्षण केंद्रे कार्यान्वित असतांना सदर कामकाज विना निविदा B.A.P. कॉम्प्यूटर यांना देण्यात आले.

B.A.P. कॉम्प्यूटर्स यांच्या ग्रामीण भागात स्वत:च्या शाखा नसल्याने सदरची प्रशिक्षणे त्यांनी इतर प्रशिक्षण केंद्रांमार्फत करून घेतले आहे. त्यामुळे B.A.P. कॉम्प्यूटर्स यांनी उपठेकेदार (SUB TENDERER) नेमून सदर प्रशिक्षण दिल्याचे दिसून आले.

2) लाभार्थ्यांची निवड ही B.A.P. कॉम्प्यूटर्स यांनी केल्याचे स्पष्ट होते. वास्तविक लाभार्थी निवड हा विषय संबंधित समितीचा अधिकार असतांना सदर लाभार्थी निवडीचे अधिकार B.A.P. कॉम्प्यूटर्स यांना देण्याचे प्रयोजन स्पष्ट होत नाही. सदर लाभार्थी यादीस विषय समितीने दिनांक 17/12/2016 रोजी मान्यता दिल्याचे नस्तीवरून दिसून आले. तथापि, सदर समितीचे इतिवृत्त लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाले नाही.

3) सदर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी प्रती लाभार्थी रुपये 3,500/- प्रमाणे एकूण 857 लाभार्थ्यांचे एकूण रूपये 22,99,500/- रुपये B.A.P. कॉम्प्यूटर्स यांना अदा केलेले आहेत. तथापि, B.A.P. कॉम्प्यूटर्स यांनी एकूण 857 लाभार्थ्यांचे प्रशिक्षण व परीक्षा शुल्क MKCL यांच्याकडे लाभार्थी निहाय पैसे भरल्याची पावती (रिसीप्ट) लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात आली नाही.

4) योजनेस दिनांक 29/12/2016 रोजी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिली आहे व कार्यारंभ आदेश दिनांक 08/03/2017 रोजी दिला आहे.

5) कार्यादेशापुर्वीच तसेच योजनेस प्रशासकीय मान्यता मिळण्यापुर्वीच विद्यार्थ्यांनी एम.एस.सी.आय.टी./ टॅली/ डी.टी.पी. परीक्षा पास केल्यामुळे BAP Computer नाशिक यांना प्रती लाभार्थी रुपये 3,500/- प्रमाणे एकूण

450 विद्यार्थ्यांचे नियमबाहय रित्या रूपये 15,75,000/- प्रदान झाले आहे. तरी रक्कम रूपये 15,75,000/- संबंधितांकडुन वसुल करुन जिल्हा परिषद सेस निधीत भरणा करावी व अनुपालन सादर करावे

देवळा तालुक्यातील 24 लाभार्थ्यांचा प्रशिक्षण कालावधी दिनांक 01/01/2017 ते 01/03/2017 असा नमुद आहे. सदरचा कालावधी कार्यादेशापुर्वीचा असल्याने यांना लाभ अनुज्ञेय ठरत नाही त्यामुळे संबंधितांकडुन प्रती विदयार्थी रुपये 3,500/- प्रमाणे रूपये 84,000/- रुपये संबंधिताकडुन वसुल करण्यात यावे.

6) नाशिक प्रकल्पातील विदयार्थ्याच्या प्रकरणांची पडताळणी केली असता, सर्व प्रकरणासोबत Tally-ERP 9 ची प्रमाणपत्र जोडलेली आहेत. Tally-ERP 9 च्या प्रमाणपत्रावर BAP Computer यांचा शिक्का आहे व प्राचार्य यांची स्वाक्षरी आहे. तथापि, MKCL यांचा होलोग्राम, संबधित केद्रांचा कोड क्रमांक विहिती नमुन्यातील MKCL यांचेकडील MSCIT/DTP/ TALLY बाबत प्रमाणपत्र, प्रमाणपत्र व्हेरेफिकेशन क्रमांक, प्रमाणपत्र काढल्याचा दिनांक इत्यादी बाबी नमूद नाहीत. त्यामुळे ते ग्राहय धरता येत नाही. यादीचे अवलोकन केले असता सर्व विद्यार्थ्यांचे गाव नाशिक नमूद आहे. योजनेचे कार्यक्षेत्र ग्रामीण भाग असल्यामुळे नाशिक शहरातील विध्यार्थ्यानां दिलेला लाभ अनुज्ञेय ठरत नाही.

7) लाभार्थी प्रकरणांची पडताळणी केली असता आवश्यक ती कागदपत्रे प्रकरणासोबत जोडलेली नाहीत. कागदपत्रे अपूर्ण असल्यामुळे योजनेच्या अटी व शर्ती प्रमाणे लाभार्थी पात्र होते किंवा कसे याची पडताळणी करता आली नाही.

8) लाभार्थी यादीनुसार विद्यार्थी व प्रमाणकासोबत दिलेल्या यादीनुसार विद्यार्थी यांत बदल केलेले आहेत. विषय समितीने मान्यता दिलेल्या व महिला व बालकल्याण अधिकाऱ्यांनी मान्यता दिलेल्या लाभार्थ्यांच्या यादीत बदल करण्याचा इतर कुणाला अधिकार नसतांना BAP Computer यांनी प्रशिक्षण दिले आहे व संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी परस्पर बदल केले आहेत. सबब सदर बदल अमान्य करण्यात येऊन संपूर्ण रक्कम वसूलपात्र आहे

9) प्रकल्प कार्यालय सिन्नर यांच्या मंजुर लाभार्थी यादीतील अनुक्रमांक 44 व 46 मध्ये खताळे ज्योती गोरख तसेच अनुक्रमांक 80 व 81 मध्ये सातपुते प्रियंका नाना हया विद्यार्थ्याचे नाव दुबार घेण्यात आले आहे त्यामुळे लाभार्थी निवड यादी अचूक केलेली नाही.

10) लाभार्थ्याच्या प्रकरणासोबत प्रशिक्षणाचा कालावधी कोणता होता? याबाबत प्रमाणपत्र जोडलेले नाही. विदयार्थीनी कोणत्या कैंद्रामध्ये प्रशिक्षण घेतले? याच्या कैंदनिहाय यादया नाहीत. प्रशिक्षणार्थी विदयाथीनींचे प्रशिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची रक्कम BAP Computer यांना देणेबाबत संबंधित विदयार्थीनी अथवा पालक यांचे संमतीपत्रक घेलेले नाही. तसेच BAP Computer यांनी कोणत्या कैंदांना किती विदयार्थीनींचे प्रशिक्षण व परीक्षा शुल्क अदा केले? याचा तपशील नाही.

11) जिल्हा स्तरावर लाभार्थ्याची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. एकात्मीक बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे दुबार लाभ दिला नसल्याबाबत प्रमाणपत्र नाही.

12) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक अंदाज-20.11/प्र.क्रं93/2011/अर्थसंकल्प-3 दिनांक 06/05/2011 अन्वये शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार वैयक्तिक लाभार्थी यांची प्रदाने ECS द्वारे करावी, असे आदेश आहेत. त्यामुळे प्रशिक्षणाच्या रक्कमा विदयार्थ्याना अदा करणे आवश्यक असतांना BAP Computer Nashik यांना अदा करण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

13) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे आदेश क्रमांक मबाक/अर्थ/148/17, दिनांक 08/03/2017 अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. तसेच महिला व बाल कल्याण अधिकारी यांचे पत्र क्रमांक 227 ते 241 दिनांक 11/03/2017 अन्वये लाभार्थी यादयांना मंजुरी देण्यात आलेली आहे. लाभार्थी यादी दिनांक 11/03/2017 रोजी मंजुर केलेली असतांना कार्यादेश दिनांक 08/03/2017 रोजी लाभार्थी यादी मंजुर नसतांना काय आधारे देण्यात आला? याचा खुलासा करावा.

14) करारनामा दिनांक 15/03/2017 रोजी केला आहे. कार्यादेश दिनांक 08/03/2017 रोजी दिला आहे. करारनामापुर्वी कार्यादेश देण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे.

15) देयकातुन 2 टक्के टी डी एस रुपये 59,990/- कपात केला आहे. तथापि, प्राप्तीकर अधिनियम 1961 चे नियम 194 जे नुसार 10 टक्के आयकर कपात करणे आवश्यक आहे. तरी कमी कपात रक्कम रूपये 5,82,680/- संबंधितांकडुन वसुल करुन शासन सदरी भरणा करावी.

**3.891 आदिवासी उपयोजनातर्गत व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील अंगणवाडीना पोट्रीन फुड सप्लीमेंड पुरविणे योजनेतील अनियमितता. (परिच्छेद क्रमांक 4)**

**जिल्हा परिषद उपकरातुन अंगणवाडी केद्रातील कुपोषीत मुलामुलीचे कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रोट्रीन फुड सप्लीमेंड पुरविणे योजनेतील अनियमितता (परिच्छेद क्रमांक 5)**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4, 5) -** सदर योजनैंतर्गत टिएसपी क्षेत्र 1,298 व ओटिएसपी क्षेत्र 650 असे एकुन 1,948 तीव्र व मध्यम वजनाचा बालकासाठी प्रती 5 पाकिटे प्रमाणे 9,740 पाकीटांचा पुरवठा करण्याबाबत प्रमाणक क्रमांक 514 दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 14,99,960/- खर्च करण्यात आला आहे. तसेच जिल्हा परिषद उपकरातुन अंगणवाडी कैंद्रातील एकुन 1,884 कुपोषीत बालकासाठी प्रती 5 पाकिटे प्रमाणे 9,420 पाकीटांचा पुरवठा करण्याबाबत प्रमाणक क्रमांक 252 दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 14,50,680/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मालाचा पुरवठा विलंबाने करण्यात आलेला आहे. प्रशासकीय मान्यतेतील अट क्रमांक 4 नुसार विहित कालावधीत पुरवठा न केलेल्या मालाची किमंत 1 लाखापेक्षा जास्त असल्यास 5 टक्के प्रमाणे दंड वसुल करणे आवश्यक असतांना रुपये 52,500/- व रक्कम रुपये 50,771/- दंड वसुल करण्यात आलेला आहे. कमी वसुल केलेली रक्कम रूपये 22,498/- व रूपये 21,763/- एकुण रूपये 44,261/- वसुल करुन संबधित शिर्षात जमा केल्याचे अनुपालन दर्शवावे.

2) प्रकल्पनिहाय 1498 तीव्र व मध्यम वजनाचा बालकाना योजनेचा लाभ दयावयाचा असुन याबाबत प्रकल्पनिहाय यादी उपलब्ध करुन अनुपालन दर्शवावे. (परिच्छेद क्रमांक 4)

3) सन 2016-2017 मध्ये टि.एस.पी व ओटिएसपी अनुदानातुन सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात आली असुन समकक्ष योजनेन्वये लाभार्थी यादी पडताळणीस अप्राप्त आहे. सदर कुपोषित बालकांची यादी उपलब्ध करुन योजनेची फलनिष्पती दर्शवावी. (परिच्छेद क्रमांक 5)

**3.892 जिल्हा परिषद सेस अंतर्गत 10 टक्के एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडयांना टेबल व खुर्ची पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** महिला बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबारचे सन 2016-2017 च्या लेखापरिक्षणात बालविकास प्रकल्प अंतर्गत असलेल्या अंगणवाडयांना जिल्हा परिषद उपकरातंर्गत 10 टक्के निधीतुन 12 प्रकल्पांना प्रत्येकी 14 टेबल व खुर्ची यांचे वाटप केलेले आहे. सदरबाबत प्रमाणक क्रमांक 151, दिनांक 17/02/2017 अन्वये रक्कम रुपये 38,45,964/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीआर 1088/सीआर-794 दिनांक 26/10/1989 ज्या वर्षात साहित्य खरेदी केले, त्याच वर्षात साहित्य वाटप करणे आवश्यक आहे. परंतु, साठा नोंदवहीवर वाटप दिनांक नोंदविलेला नसल्याने वाटप कधी केले? खात्री करता आली नाही.

2) सदर खरेदीच्या प्रमाणकासोबतच्या रनाळे, शहादा, नवापुर, मोलगी, पिंपळखुटा, अक्कलकुवा, खुंटामोही या प्रकल्पाच्या Delivery challan वर (पुरवठा चलनावर) संबंधित जबाबदार अधिकारी / कर्मचाऱ्याची दिनांकीत स्वाक्षरी नसल्याने साहित्य कोणत्या दिनांकास प्राप्त झाले? याची खात्री करता आली नाही. त्यामुळे साहित्य विलंबाने प्राप्त झाल्याची शक्यता आहे.

3) तळोदा प्रकल्पअंतर्गत अंगणवाडी प्रतापुर येथील अंगणवाडी सेविका यांनी 20 टेबल व 20 खुर्ची इतका माल प्राप्त झाल्याची दिनांक 05/10/2017 रोजीची दिनांकीत पोहच पावती दिलेली आहे. म्हणजे साहित्य 9 महिने

10 दिवसाच्या विलंबाने पुरविलेला आहे. पुरवठा आदेशातील अट क्रमांक 8 नुसार साहित्याचा पुरवठा 30 दिवसाच्या आत प्रकल्प कार्यालयांना करावयाचा आहे. परंतु, अंगणवाडी प्रतापुर यांना साहित्याची विलंबाने पुरवठा केलेला आहे. पुरवठा आदेशातील अट क्रमांक 8 नुसार साहित्याचा पुरवठा झाल्यास दंड प्रती आठवडा अंदाजपत्रकीय तरतुद रकक्कमेवर ½ दंड आकारलेला असतांना देयकातुन रूपये 25,287/- इतका दंड कपात न करताच प्रदान केलेले आहे. सदर पुरवठादाराकडुन दंडाची रक्कम वसुल करावी.

4) रूपये 2,900/- इतका किमंतीचा करारनामा करणे आवश्यक असतांना रूपये 100/- चा करारनामा केलेला आहे. म्हणजे रूपये 2,800/- इतका कमी केला आहे. तरी रूपये 2,800/- इतकी संबंधितांकडुन वसुल करावी.

5) महाराष्ट्र पंचायत समिती व जिल्हा परिषद लेखा संहिता 1968 चे नियम 147 व 148 नुसार करारनाम्यावर विभाग प्रमुख म्हणुन उपमुख्य कार्यकारी अधिकारी महिला बाल कल्याण विभाग यांची दिनांकीत स्वाक्षरी नाही. त्यामुळे असा करारनामा हा कायदेशीदृष्टया अवैध ठरतो.

6) पुरवठा आदेश अट क्रमांक 11 नुसार निवीदा रक्कमेपैकी 90 टक्के रक्कम रूपये 3,46,16,378/- चे प्रदान लेखापरिक्षणापुर्वी करुन उर्वरित 10 टक्के रक्क्म रूपये 3,84,596/- चे लेखापरिक्षण झाल्यानंतर प्रदान करणेबाबत आदेशीत असतांना विभागाने पुर्ण रक्कमेचे नियमबाहयरित्या आदेशाचे पालन न करता विभागाने प्रदान केलेले आहे.

7) सदर साहित्याच्या मागणीच्या लेख्याची तपासणी केली असता, मोलगी, पिपंळखुटा, तळोदा, नवापुर, शहादा, खुंटामोही, धडगाव येथील मागणी पत्रावर दिनांक नमुद नाही. त्यामुळे सदर मागणी पत्रे कधी प्राप्त केली? याबाबतची खात्री करता आली नाही. तसेच प्रकल्प शहादा व धडगाव बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या स्वाक्षरी नाही.

8) सदर साहित्य सुस्थितीत प्राप्त झाल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र नोंदविलेले नाही.

9) अंगणवाडींनी साहित्याची नोंद नमुना नंबर 33 मध्ये घेतल्याचे प्रमाणपत्र प्राप्त केलेले नसल्याने साहित्य नोंदविल्याची खात्री करता आली नाही.

**3.893 जिल्हा परिषद सेस अंतर्गत सन 2014-2015 मधील अनुशेषासह सन 2015-2016 च्या तरतुदीतील अंगणवाडयांना वजन काटे पुरविणे.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** जिल्हा परिषद, नंदुरबारचे सन 2016-2017 चे लेखापरिक्षणात जिल्हा परिषद उपकरातंर्गत अंगणवाडया केंद्राना व त्या अंतर्गत असलेल्या अंगणवाडयांना वजन काटे पुरविणे या योजनेवरील खर्चातील अनियमितता आढळुन आल्या. सदरबाबत प्रमाणक क्रमांक 451, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 4,98,151/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात:-

1) करारनामा व पुरवठा आदेश अट क्रमांक 10 व संचिकामधील उपमख्य कार्यकारी अधिकारी (बालविकास) यांची टिप्पणी दिनांक 14/03/2017 नुसार देयकाचे 90 टक्के रक्कमेचे प्रदानाची व 10 टक्के रक्कम Deposit खाती जमा करण्याची टिप्पणी असतांना वित्त विभागाने 10 टक्के रक्कम रूपये 49,815/- रक्कम राखुन न ठेवता देयकाची पुर्ण 100 टक्के रक्कम पुरवठादारास नियमबाहयपणे रूपये 49,81,551/- केलेले आहे.

2) पुरवठा आदेश अट क्रमांक 2 व 3 नुसार प्रकल्पाधिकारी यांचे माल सुस्थितीत प्राप्त झाल्याच्या व चालु स्थिती असल्याबाबतचे प्रमाणपत्र नोंदविलेले नाही.

3) पुरवठा केलेल्या वजन काटयाचे साहित्यांची नोंद पुरविलेल्या अंगणवाडी केंद्र व अंतर्गत असलेल्या अंगणवाडयांनी साठा नोंदवहीत नोंदविल्याचे प्रमाणपत्र संचिकेत नाही.

4) यापुर्वी कोणत्या वर्षी, कोणत्या निधीतुन सदर योजना राबविण्यात आली? तसेच सदर योजनेव्दारे पुरविलेल्या अंगणवाडयांना यापुर्वी वजन काटे किती पुरविण्यात आले? याबाबतचा तपशिल संचिकेत नाही.

5) महिला बाल कल्याण विभागाने कंपनीशी वजन काटयाचे 1 वर्षापर्यंत गॅरंन्टी व 1 वर्षाच्या आत वस्तू बिघाड झाल्यास देखभाल व दुरुस्तीबाबतचा करार करणे आवश्यक असतांना करारनाम्यात याबाबतच्या अटी व शर्थीचा समावेश नसल्याने देखभाल व दुरुस्तीबाबतची खात्री करता आली नाही.

6) देखभाल दुरुस्तीकरिता देयकाच्या प्रदानातुन संबधित पुरवठादाराकडून 5 टक्के रक्कम 1 वर्षापर्यंत अनामत म्हणून कपात करणे आवश्यक होते. तसेच करण्यात आलेले नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा सहिता 1968 चे नियम 72 प्रमाणे अनुदान वाटप केल्याची पोच पावती नाही.

8) विभागाने अंगणवाडयांची साहित्याची मागणीबाबतचे अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने मागणी प्राप्त साहित्याचा पुरवठा झाल्याची खात्री करता आली नाही.

### 3.894 नाविन्यपुर्ण योजनेतुन ग्रामीण भागातील अंगणवाडयांना जलसुध्दीकरण यंत्र पुरविणेतील अनियमितता

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 638, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 1,04,20,998/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय क्रमांक भाखंस/2014प्र.क.82/भाग-4मधील उदयोग-4, दिनांक 30/10/2015 मधील 4:4:2 मधील अनुक्रमांक 3 नुसार रूपये 25 लक्ष ते 5 कोटी पर्यंतच्या खरेदीसाठी ई निविदा प्रसिध्दी करुन त्याबाबतची जाहीरात विभागीय स्तरावरील वर्तमानपत्रात आणि राज्य स्तरीय वर्तमानपत्रात राहीरात प्रसिध्दी करणेत यावी, असे नमुद असतांना तशी कार्यवाही करणेत आलेली नाही.

2) ई निविदेतील अट क्रमांक 5 नुसार निविदा निकाल अधिसुचित केल्यांनंतर निविदाकाराने पंधरा दिवसाचे आत एकूण निविदा किंमतीच्या 5 टक्के रक्कम सुरक्षा अनामत म्हणुन मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचे नावे डिमांड ड्राप्टाव्दारे जमा करावी. असे न केल्यास निविदा प्रक्रीया रदद करणेत येईल, असे नमुद असतांना पुरवठादाराचे देयकातुन 10 टक्के सुरक्षा अनामत वसुल करणेत आलेली आहे. उदयोग व उर्जा, कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस/2014प्र.क.82/भाग-4मधील उदयोग-4, दिनांक 30/10/2015 मधील प्रकरण क्रमांक 4 मधील अनुक्रमांक 4.6 मध्ये नमुद निविदा अधिसुचित करण्यात आल्यानंतर निविदाकाराने पंधरा दिवसाचे आत सुरक्षा अनामत डिमांड ड्राप्टने किंवा राष्टीयकृत बॅकेची हमी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करणेत आलेली नाही. याबाबत खुलासा सादर करणेत यावा.

3) निविदा प्रसिध्दी मधील अट क्रमांक 6 (ब) नुसार पुरवठा करावयाचे संपुर्ण साहित्य हे जिल्हास्तरावर एकाच ठिकाणी ठेऊन त्याची तपासणी जिल्हा स्तरीय साहित्य खरेदी समिती/शासकीय अभियांत्रीकी महाविदयालयाकडुन करुन घेणे बंधनकारक राहील. त्यानंतर सदर साहित्य हे आदेशामध्ये दिलेल्या पंचायत समिती कार्यालयास पोहच करावे लागेल, असे नमुद असुन जिल्हा स्तरावर जिल्हा स्तरीय साहित्य खरेदी समितीने अथवा शासकीय अभियांत्रीकी महाविदयालय यांनी तपासणी केल्याचा अहवाल नस्तीसोबत आढळुन आला नाही. याबाबत खुलासा करणेत यावा.

### 3.895 ग्रामीण भागातील महिलांना पिको फॉल मशिन / शिवणयंत्र पुरविणेबाबत.

**जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परिषद निधीतून ग्रामीण भागातील महिलांना पिकोफॉल मशिन / शिवणयंत्र पुरविणेसाठी रक्कम रुपये 37,59,525/- अनुदान खर्च केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1094/सीआर-2239/31, दिनांक 19/09/2001 नुसार विहीत नमुन्यात गाव निहाय, योजना निहाय लाभार्थी मास्टर रजिस्टर नोंदवही ठेवून प्रत्येक वर्षी लाभार्थ्यांना दिलेल्या लाभाची नोंद त्या रजिस्टरला ठेवणे आवश्यक असतांना फक्त सदर

योजनाचा लाभ देण्यात आलेल्या लाभार्थ्यांचेच रजिस्टर ठेवण्यात आले आहे. योजनानिहाय मास्टर रजिस्टर ठेवण्यात आलेले नसलेने एकाच कुटुंबात दुबार लाभ दिला गेला किंवा कसे, याबाबत पडताळणी करता आली नाही.

2) तसेच उपरोक्त नमुद सदर शासन निर्णयानुसार दारीद्र्य रेषेखालील महिलांना प्रथम प्राधान्याने लाभ द्यावा. जर दारिद्र्य रेषेखालील महिला लाभार्थी पुरेशा प्रमाणात न मिळाल्यास रक्कम रूपये 50,000/- वार्षिक उत्पन्न असलेल्या अन्य महिला लाभार्थ्यांना लाभ देणेबाबत नमुद केलेले आहे. तथापि, विभागाने प्राधान्याने दारिद्र्य रेषेखालील महिलांना लाभ देणेबाबत कोणती कार्यवाही केली? याबाबत बोध होत नाही. त्यामुळे दारिद्र्य रेषेखालील महिला लाभार्थी लाभापासून वंचित राहिले, असे दिसुन येते. तरी विभागाने जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील दारिद्र्य रेषेखालील महिला लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ दिलेबाबत गटविकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र घेउन सादर करावे.

3) जिल्हा परिषद महिला व बाल कल्याण विभागाकडील पिको फॉल/ शिवण मशिन नस्तीची तपासणी केली असता त्यामध्ये तालुकानिहाय प्राप्त झालेले लाभार्थी प्रस्ताव व महिला बाल कल्याण विभागाने प्रत्यक्ष मंजूर केलेली लाभार्थी यादी यामध्ये तफावत दिसुन येते. विभागाने प्रत्यक्ष लाभार्थी यादी मंजूर केल्यानंतर पुरवठा आदेश देणे आवश्यक असता तसे न करताच पुरवठा आदेश दिलेला आहे. त्यामुळे लाभार्थींची निवड न करता जादा साहित्य पुरवठा केलेल्या नगांची 113 x दर रूपये 11,025/- = रक्कम रूपये 1245,825/- वसुल होणे आवश्यक आहे.

4) अंतिम मंजूर लाभार्थ्यांची यादी तपासली असता खालील तालुक्यांतील लाभार्थ्यांची नावे दुबार झाली आहेत. दुबार लाभार्थ्यांची पिको फॉलची रक्कम रूपये 22,050/- वसुलात आणुन जिल्हा परिषद निधीमध्ये भरणा करुन पुर्तता दाखवावी.

5) सन 2016-2017 समाजकल्याण विभाग 20 टक्के जिल्हा परिषद निधी मागासवर्गीय महिलांना पिको फॉल शिलाई मशिन वाटप समाज कल्याण समिती बैठक दिनांक 29/08/2016 अन्वये मंजुर यादीप्रमाणे लाभधारकास लाभ मिळाला असतांना त्याची खातरजमा न करता महिला व बाल कल्याण विभागास 10 टक्के जिल्हा परिषद निधीतून एकाच वर्षात दुबार लाभ दिलेला आहे. लाभार्थींना दुबार लाभ झालेने 6 x12,250 = रूपये 73,500/- रक्कम वसुलात आणुन पुर्तता दाखवावी.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1080/सीआर/1071/57 दिनांक 29/09/1993 अन्वये फलश्रुती अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक असता असे अहवाल नस्तीसोबत प्राप्त झाले नाहीत.

7) ठेकेदाराने वस्तुंचा पुरवठा केल्यानंतर चलनावर वस्तु मिळाल्याची पोहच आहे. परंतु, तालुका खेड व मावळ यांच्या चलनावर दिनांक नमुद नसल्याने वस्तु मुदतीत प्राप्त झाल्या किंवा कसे, याबाबत खात्री करता आली नाही.

8) तालुक्यांना वाटप केलेल्या शिलाई मशिनचे लाभार्थींकडून एकूण रक्कम रूपये 23,77,725/- लाभार्थी हिस्सा जमा झाल्याची पडताळणी करण्यात यावी.

**3.896 ग्रामीण भागातील महिलांना पिको फॉल मशिन पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत 2 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 13,90,050/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र. 446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 परिच्छेद ई मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. दिनांक 31/03/2017 पर्यंत विनीयोग दाखले प्राप्त करुन घेणे आवश्यक होते. परंतू, तशी कार्यवाही केली नाही.

2) महाराष्ट्र शासन, निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1080/सीआर/1074/ 57, दिनांक 29/09/1993 अन्वये फलश्रृती अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक असतांना अहवाल प्राप्त झाला नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1094/सीआर/2239/ 31, दिनांक 01/09/1993 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/

1094/ सीआर/ 2239/ 34 दिनांक 20/11/1999 मधील परिच्छेद क्रमांक 4 अन्वये विहीत केलेल्या नमुना प्रपत्र अ-1 मध्ये गावनिहाय, योजनानिहाय लाभार्थी नोंद सदर नोंदवहीत वर्षनिहाय ठेवण्यात आली नसल्याने एकाच कुटुंबात दुबार लभ दिला गेला किंवा कसे, याबाबत खात्री करता आली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 20 अनुसार संबंधित लाभार्थींना रकमा प्राप्त झाल्याबाबत मुद्रांकित पोहोच पावत्या लेखापरीक्षणास प्राप्त झाल्या नाहीत.

5) ग्रामीण भागातील महिलांना पिको फॉल मशिन खेरदीपोटी 90 टक्के अनुदान लाभार्थी बँक खात्यावर वर्ग करावयाचे असतांना श्रीमती भारती तुकाराम चव्हाण, रा. श्रीपालवण, ता. माण यांनी शिलाई मशिन खरेदीपोटी रक्कम रुपये 3,330/- त्यांच्या बँक खात्यावर वर्ग केले आहेत. सदरची पिको फॉल मशिन खरेदी योजना असतांना त्यांना शिलाई मशिन खरेदी अनुदान अदा केल्याने योजना योग्य प्रकारे राबविली नसल्याचे दिसून येते.

6) लाभार्थ्यांच्या प्रास्तावासोबत खालीलप्रमाणे उणिवा आढळून आल्या.

1. सौ. पुनम राजेंद्र कदम, रा. करंदेवाडी, पो. कुमठे, ता. सातारा यांची स्वतःच्या अर्जावर स्वाक्षरी नाही.

2. गौरी संतोष धुमाळ, रा. सोनके, ता. कोरेगांव यांच्या अर्जावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती कोरेगांव यांची स्वाक्षरी नाही.

3. दोन्ही लाभार्थीकरीता एकच शिवण कर्तन प्रमाणपत्र जोडून रक्कम आहरीत केली आहे. सदर बाब ही अफरातफर असून चारही लाभार्थींची रक्कम चौकशी अंती वसूल करणे आवश्यक आहे.

### 3.897 विशेष घटक योजनेतून आंगणवाडी केंद्र इमारत दूरूस्तीबाबत

**जिल्हा परिषद सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** महिला व बालकल्याण विभागाचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षण या आर्थिक वर्षात विविध केले असता विभागाने आंगणवाडी इमारत दुरूस्तीबाबत विविध प्रमाणकान्वये रक्कम रूपये 21,78,000/- चे प्रदान केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2016-2017 च्या मुळ अंदाज पत्रकात तरतूद नसताना नियमबाहयरित्या सदर योजनेवर खर्च करण्यात आला आहे.

2) शासन परिपत्रक क्रमांक झेडपियए/2013/प्र.क्र.76 /प.रा-1, दिनांक 24/01/2014 अन्वये जिल्हा परिषद मध्ये स्थापन करण्यात आलेल्या महिला व बालकल्याण समित्यामार्फत जिल्हा परीषद उत्पन्नाच्या 10 टक्के निधीतून राबवावयाच्या योजनाबाबत निर्देश दिले आहेत. या निर्णयामध्ये शासन पूरकपत्र क्रमांक झेडपीए/2015/प्रक्र.77/पंरा1, दिनांक 25/08/2015 अन्वये आंगणवाडी कैंद्र इमारत दुरूस्तीसाठी कोणतेही लेखाशिर्ष नसलेने व जून्या मोडकळीस आलेल्या इमारतीच्या दुरूस्तीसाठी निधी उपलब्घ होणे आवश्यक असलेने सदर योजनेचा समावेश करणेत आला.

आंगणवाडी केन्द्र इमारत दुरूस्तीची कामे जिल्हा परीषदेच्या स्वतःच्या उत्पन्नातुन महिला व बालकल्याण समितीकडील 10 टक्के खर्च करण्यास शासन मान्यता देत आहे, असा स्पष्ट उललेख असताना महिला व बालकल्याण समिती, जिल्हा परीषद, सांगली यानी दिनांक 16/012/2016 रोजीच्या सभेमघील ठराव क्रमांक 145 अन्वये आंगणवाडी दुरूस्तीसाठी विशेष घटक योजना अतर्गत तरतूदी मधून रूपये 21,78,000 खर्च करणेबाबत मंजूरी दिली आहे. या ठरावास जिल्हा परीषद सर्वसाधारण सभा दिनांक 22/12/2016 अन्वये मंजूरी मिळाली आहे. तसेच यानुसार जा.क्र. जिल्हा परिषद सा./म.बा.क./1594/2016, दिनांक 31/12/2016 च्या बाबतीत प्रशासकीय मंजूरी आदेशात उपमुख्य कार्यकारी अधिकारी महीला व बालकल्याण यानी 2235-3266 विशेष घटक योजना या लेखा शिषार्गत खर्च करणेस मंजूरी दिली आहे.

3) अनुसुचित जाती उपाययोजना (विशेष घटक योजना) ही शासना मार्फत अनुसुचित जाती/ नवबैदध लाभार्थ्याकरीता अर्थसहाय्य पुरविणे व त्याना दारिद्र्य रेषेवर आणण्यासाठी राबविणेत येणारी योजना असून लाभार्थी निवडीचे निकष व येजना राबविणेबाबतच्या अर्टी शर्ती ठरविणेत आल्या आहेत.

महिला व बालकल्याण, जिल्हा परीषद, सांगली यांनी विशेष घटक योजना अंतर्गत प्राप्त निधीचा विनियोग योजनेच्या उद्दीष्टावर न करता अंगणवाडी कैंद्र इमारत दुरूस्तीवर करून गंभीर अनियमितता केली आहे.

**3.898 ग्रामीण भागातील मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारिरिक विकासासाठी ज्युदो कराटे प्रशिक्षण देणे खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** ग्रामीण भागातील मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारिरिक विकासासाठी ज्युदो कराटे प्रशिक्षण देणेकरिता रक्कम रूपये 30,00,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णयाप्रमाणे शाळेतील इयत्ता 4 थी ते 10 पर्यंतच्या व महाविद्यालयीन मुलींना व शाळेतील इच्छुक महिला शिक्षकांना 6 महिन्याचे कराटे प्रशिक्षण देण्यात यावे, असे स्पष्ट आहे. या कामी या योजनेअंतर्गत प्रती प्रशिक्षाणार्थीवर रक्कम रूपये 600/- इतका खर्च करण्याचे निर्देश आहेत. मे. कोल्हापूर डी असोशिएशन यांनी सन 2016-2017 मध्ये आयोजित सदर प्रशिक्षण हे एक महिन्यासाठी घेतले होते. त्यामुळे कमी कालावधीसाठी त्या प्रमाणात रक्कम म्हणजेच रककम रुपये 600 ÷ 6 = रूपये 100/- प्रती महिना x प्रशिक्षणार्थी 21,378 = 21,37,800/- चे मर्यादेत टेंडर रककम मंजुर होणे व मर्यादित रक्कम अदा होणे आवश्यक असताना प्रत्यक्षात रुपये 30,00,000/- अदा केल्याने रूपये 8,62,200/- इतकी जादा रककम अदा झाली आहे.

2) महिला बालकल्याण विभागामार्फत राबवावयाच्या योजनाचेबाबत ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2013/प्रक्र 76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 मध्ये निर्देशित केलेल्या योजनेपैकी मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारिरीक विकासासाठी प्रशिक्षण देणेचे योजनेअंतर्गत इयत्ता 4 थी ते 10 पर्यंतच्या शाळेतील मुलींना व महाविद्यालयातील मुलींना ज्युदो कराटे प्रशिक्षण योजना राबविण्यासाठी प्रती लाभार्थी रुपये 600/- प्रमाणे खर्च करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. सदर प्रशिक्षणासाठी निवड प्रशिक्षकाची जिल्हा क्रिडा अधिकारी यांचेकडुन प्रमाणित असलेल्या प्रशिक्षकांची निवड करणेबाबत सुचित केले आहे. तथापि, मे.कोल्हापूर कराटे दि असोसिएशन मार्फत नेमलेले प्रशिक्षक हे जिल्हा क्रिडा अधिकारी यांनी प्रमाणित केले नसलेल्या प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण देण्यात आल्यामुळे प्रशिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता योग्य माहिती नसल्याचे स्पष्ट होते.

3) सन 2016-2017 महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत प्रशिक्षणार्थीचे प्रशिक्षण कार्यक्रम / कालावधी संपताना संबंधित वर्गातील प्रशिक्षणार्थीचे चाचणी/सराव परिक्षा घेवून प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणाचा लाभ मिळालेचे विनियोग दाखले संबंधित एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी यांचेकडुन प्रमाणित करुन घेण्यात आलेले नाही.

**3.899 ग्रामीण भागातील मुलीना व महिलाना कुकींग कॅटरिंग प्रशिक्षण देणेबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** ग्रामीण भागातील मुलींना व महिलांना कुकींग कॅटरिंग प्रशिक्षण देणेकरिता रक्कम रूपये 15,00,000/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2013/प्रक्र76/पंरा, दिनांक 24/01/2014 प्रमाणे कॅटरिंग प्रशिक्षण ही योजना राबविण्यात आली. सदर शासन निर्णयातील मार्गदर्शनाप्रमाणे मान्यता प्राप्त संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना प्रती लाभार्थी रुपये 5,000/- पर्यंत अदा करावयाची तरतूद आहे. असे असताना महिला व बालकल्याण विभागाने ई टेंडर मागवुन प्रशिक्षण संस्था / पुरवठादार निश्चित करुन त्यांना नियमबाहय प्रशिक्षण देण्याचा ठेका दिला.

2) शासन निर्णय दिनांक 24/01/2014 प्रमाणे सदर प्रशिक्षण हे 1 वर्षापर्यंत कालावधीसाठी घेण्यात यावे व त्यासाठी जास्तीत जास्त रुपये 5,000/- देण्याची तरतूद करावी, असे स्पष्ट केले आहे. त्याप्रमाणे कार्यपध्दती अनुसरणे आवश्यक होते. तथापि, सदर प्रशिक्षण सुरु करण्याचे आदेश देताना ते 3 तास प्रमाणे 30 दिवसात पुर्ण करणेबाबत सुचना दिल्या आहेत. म्हणजे त्याप्रमाणात तसे शुल्क मान्य करणे व अदा करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे 5,000 ÷ 365 दिवस = 13.69 x 30 दिवस = 410/- चे मर्यादेत रक्कम अदा होणे असताना 899/- रुपये अदा केल्याने रुपये 899-410 = 489/- जादा रक्कम अदा झाली आहे. म्हणजेच एकूण प्रशिक्षणार्थी 1,669 x 489/- = 8,16,141/- इतकी जादा अदा रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

3) सदर प्रशिक्षण कामी प्रसिध्द केलेली प्रथम ई निविदेस 5 संस्थांनी प्रतिसाद दिला. त्यातील 3 संस्था हया अपात्र ठरल्याने पुन्हा ई टेंडर प्रसिध्द करणेत आले. त्यावेळी 4 संस्थांनी निविदा भरल्या त्यावेळी 1 संस्था अपात्र ठरल्याने उर्वरित 3 संस्थामधून महाव्यावसायिक प्रशिक्षण मंडळ यांची निविदा न्युनतम दराची ठरल्याने त्यांचेशी वाटाघाटी करुन रुपये 899/- प्रती प्रशिक्षणार्थी ही निश्चीत करण्यात आली. त्यांना या कामी कामाचा ठेका दिनांक 02/12/2016 रोजी देण्यात आला होता व सदर प्रशिक्षण दिनांक 01/01/2017 पासुन 30 दिवसामध्ये सुटया वगळून पुर्ण करण्याचा कालावधी देण्यात आला होता. म्हणजे दिनांक 01/01/2017 ते 05/02/2017 चे दरम्यान प्रशिक्षण पुर्ण होणे आवश्यक होते. तत्पुर्वी लाभार्थी निवड व 10 टक्के रक्कम लाभार्थी हिस्सा हा वसुल होवून भरणा होणे आवश्यक होते. तथापि, भरणा चलने पहाता अशी वसुली तथा भरणा हा माहे मार्च महिन्यात केला आहे. म्हणजे प्रशिक्षण सुरु झालेनंतर लाभार्थी हिस्सा तथा भरणा केला आहे. म्हणजेच प्रशिक्षण हे विहित कालावधीत न घेता उशीरा घेवून पुर्ण केले आहे. सबब उशीर कालावधी दिनांक 05/02/2017 ते 08/03/2017 एकूण दिवस 33 x दंड रुपये 100/- प्रती दिनी x16 प्रकल्पाचे पोटी रुपये 52,800/- वसुलपात्र ठरते.

उपरोक्त 10 टक्के प्रमाणे लाभार्थीनिहाय व्हावयाची वसुली तथा प्रत्यक्ष चलनाने केलेला भरणा पहाता त्यामध्ये मोठया प्रमाणावर तफावत दिसुन येते.

### 3.900 ग्रामीण भागातील मुलीना व महिलाना फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण देणेबाबत.

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** ग्रामीण भागातील मुलींना व महिलांना फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण देणेकेरिता रक्कम रूपये 19,98,008/- खर्च केला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2013/प्रक्र76/पंरा, दिनांक 24/01/2014 प्रमाणे फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण ही योजना राबविण्यात आली. सदर शासन निर्णयातील मार्गदर्शनाप्रमाणे मान्यता प्राप्त संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना प्रती लाभार्थी रुपये 5,000/- पर्यंत अदा करावयाची तरतूद आहे. असे असताना महिला व बालकल्याण विभागाने ई टेंडर मागवुन प्रशिक्षण संस्था / पुरवठादार निश्चित करुन त्यांना प्रशिक्षण देण्याचा ठेका दिला. सदर प्रक्रिया नियमबाहय आहे.

2) लाभार्थ्याने स्व:त 10 टक्के रककम भरण्याची कार्यपध्दती उपरोक्त शासन निर्णय असताना लाभार्थीचे नांवे भरलेली रक्कम कमी/अधिक रककम भरल्याचे निदर्शनास आले.

3) सदर प्रशिक्षण संस्था ही इंदिरा गांधी महिला मंडळ ही असुन त्यांना सदर कामाचा ठेका उपरोक्त आदेशाने दिनांक 21/12/2016 रोजी देण्यात आला होता. आदेशाप्रमाणे त्यांनी सदर प्रशिक्षण दिनांक 01/01/2017 पासुन 30 दिवसामध्ये सुट्टया वगळून पुर्ण करण्याचे होते म्हणजेच दिनांक 01/01/2017 ते 05/02/2017 चे दरम्यान प्रशिक्षण पुर्ण होणे आवश्यक होते. त्यापुर्वी 10 टक्के लाभार्थी हिस्सा वसुल होणे आवश्यक होते. तथापि, तालुकास्तरावरुन 10 टक्के रक्कम ही माहे फेब्रुवारी या महिन्यामध्ये चलनाने भरल्याची दिसून आली. म्हणजे प्रशिक्षण कालावधीमध्ये अशी रककम वसुल केली आहे. म्हणजेच सदर प्रशिक्षण हे विहित कालावधीमध्से सुरु झाले नव्हते व पुर्ण केले गेले नाही. त्यामुळे संबंधित संस्थेकडुन दंड वसुलीची कार्यवाही होणे आवश्यक होते. सबब दिनांक 05/02/2017 ते 17/02/2017 या कालावधीसाठी प्रती दिन 100/- प्रमाणे x12 दिवस x 16 प्रकल्प = रूपये 19,200/- रककम वसुलपात्र ठरते.

### 3.901 अंगणवाडयांना विविध साहित्य पुरविणे या योजनेअंतर्गत अंगणवाडी सेविकांना लॅपटॉप पुरवठा करणे.

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 458, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 49,71,500/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महिला व बालकल्याण समितीने मासिक सभा दिनांक 27/09/2016 च्या ठराव क्रमांक 394 अन्वये अधिकारात नसलेल्या विषयास नियमबाहय मंजुरी दिलेली आहे. तसेच सदस्य सचिव (मबाक समिती) तथा उप

मुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक) यांनी महिला व बाल कल्याण समितीस ठराव मंजूर करताना शासन निर्णयाबाबत योग्य ते मार्गदर्शन न करता व तसेच सदरच्या LAPTOP खरेदीच्या ई-निविदेला मुदतवाढ देताना सदर खरेदी अंगणवाडी बळकटीकरणासाठी आवश्यक असल्याबाबत चुकीचा अभिप्राय दिलेला आहे. उपरोक्त शासन निर्णयामध्ये अंगणवाडयांचे बळकटीकरण करण्यासाठी जिल्हा परिषद सेसमधून तरतुद किंवा खर्च करण्याची मुभा नसताना तरतुद करुन बळकटीकरणासाठी नियमबाहय खर्च करण्यांत आला आहे. सदरच्या खर्चाची प्रवृत्ती ही प्रशासकीय स्वरूपाची असून तो खर्च करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेची नसून शासनाची आहे. तसेच गट “ब” मधील योजना राबविताना सदरची योजना वैयक्तीक अथवा सामुहिक लाभाची असणे गरजेचे असताना त्याकडे फक्त निधी खर्च करण्याच्या दृष्टीकोनातून रीतसर दुर्लक्ष करण्यांत आलेले आहे. ही बाब निश्चितच गंभीर आहे.

2) अंगणवाडी सेविका हे पद मानधन तत्वावर कार्यरत असल्याने जिल्हा परिषदेची जंगम मालमत्ता (LAPTOP) त्यांच्या सुपुर्द करणे नियमबाहय आहे. तसेच अंगणवाडी सेविका पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या (JOB CHART) पाहता अंगणवाडीतील सहा वर्षे वयोगटातील बालके, गर्भवती महिला व स्तनदा माता यांना पुरकपोषण आहार देणे व शालेयपूर्व शिक्षण देणे ही कामे दररोज करणे तसेच लसीकरण, आरोग्य तपासणी, आरोग्य संदर्भसेवा आणि पोषण व आरोग्य विषय शिक्षण ही आरोग्य विषयक कामे आवशकतेनुसार करून घेतलेली जातात. त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती ONLINE भरवयाची नसताना, अंगणवाडी बीट स्तरावर माहिती संकलित करण्यासाठी अंगणवाडी पर्यवेक्षिका हे पद कार्यरत असतना व सर्व प्रकल्पाच्या मुख्यालय स्तरावर प्रकल्पाची माहिती ONLINE भरण्यासाठी विस्तार अधिकारी (सांख्यिकी) हे पद कार्यरत असताना, अंगणवाडीतील सर्व माहिती संगणकावर ऑनलाईन भरणेकामी अंगणवाडयांना विविध साहित्य पुरविणे योजनेअंतर्गत अंगणवाडी सेविकांना कामकाजासाठी लॅपटॉप खरेदीला मान्यता देण्याचे प्रयोजन काय याबाबत विभागाने समर्पक खुलासा लेखापरीक्षणांस सादर करावा.

3) अंगणवाडी सेविकांची नेमणूक देताना त्यांना संगणक ज्ञान असलेबाबतची अट नाही. तरी सदरची योजना राबविताना संगणकाचे ज्ञान असणाऱ्या अंगणवाडी सेविकांसाठी अंगणवाडीच्या कामकाजासाठी LAPTOP खरेदी करण्यात आलेले आहेत. परंतू, 163 LAPTOP वाटप करण्यात आलेल्या अंगणवाडी सेविकांना संगणकीय ज्ञान असल्याबाबतचे अभिलेखे (MSCIT/DOAECC उत्तीर्ण असल्याबाबतचे प्रमाणपत्रे) संचिकेस सलंग्न नसल्यामुळे वाटप केलेले LAPTOP नेमकेपणाने कोण वापरात आणत आहे, याबाबत खात्री करता आलेली नाही.

4) महिला व बालकल्याण समितीच्या ठरावात अंगणवाडीतील कामकाजात सुधारणा होण्याच्या दृष्टींने व अंगणवाडीतील सर्व माहिती संगणकावर ऑनलाईन भरणेकामी अंगणवाडयांना विविध साहित्य पुरविणे ह्या योजनेअंतर्गत संगणकीय ज्ञान असणाऱ्या अंगणवाडी सेविकांना कामकाजासाठी लॅपटॉप खरेदीस मान्यता दिलेली आहे. परंतु, अंगणवाडी स्तरावर अंगणवाडी इमारतीत इंटरनेट जोड (internet connection) नसल्याने ONLINE काम करण्याचा प्रश्नच उदभवत नसल्याने सदर खरेदी निष्फळ ठरते.

5) उपरोक्त खरेदी करण्यापूर्वी वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक परास 2012/ प्र.क्र.104 / वित्त-3, दिनांक 16/10/2012 अन्वये जिल्हा परिषदेने मार्गदर्शक तत्वाचे पालन केलेली नाही. तरी याबाबत विभागाने समर्पक खुलासा लेखापरीक्षणांस सादर करावा.

6) उपरोक्त शासन निर्णयानुसार योजनेच्या खर्चातून अंगणवाडी बालकांचा सर्वांगिण विकास कोणत्या प्रकारे तसेच बौध्दीक/ शैक्षणिक विकासास कोणत्या प्रकारे चालना मिळालेली आहे किंवा बालकांच्या शारीरिक विकासास पूरक ठरलेले आहे? याबाबत समर्पक व साधार खुलासा लेखापरीक्षणांस सादर करावा.

7) तसेच सोलापूर जिल्हयात एकूण 3269 अंगणवाडी व एकूण 945 मिनी अंगणवाड्या असतना (एकूण 4214), केवळ 163 अंगणवाड्यांना या योजनेत समावेश करण्यात आलेला आहे.अंगणवाडीस कामकाजासाठी LAPTOP ची आवशकता असल्याबाबत अथवा LAPTOP मागणीचे संबधित बाल विकास प्रकल्प अधिकारी किंवा संबधित गट विकास अधिकारी यांचे पत्र नसताना वस्तू खरेदीचे व वाटपाचे प्रयोजन काय याबाबत याबाबत समर्पक खुलासा लेखापरीक्षणांस सादर करावा.

8) पुरवठा आदेशात नमूद केलेप्रमाणे पुरवठादाराने कॉलेज ऑफ इंजिनीरिंग पुणे चे दिनांक 27/03/2017 रोजीचे पत्रान्वये LAPTOP (SERIAL NO :- UNG80S1075H600281) चा तपासणी अहवाल सादर केलेला

आहे. परंतु, बाल विकास प्रकल्प अधिकारी, पंढरपूर-1 यांना तपासणीसाठी वापरण्यात आलेला LAPTOP दिनांक 08/02/2017 रोजी प्राप्त झालेला होता व हाच LAPTOP बाल विकास प्रकल्प अधिकारी, पंढरपूर-1 यांचेकडून दिनांक 27/03/2017 रोजी अंगणवाडी सेविकेस वाटप करण्यात आलेला आहे. तरी पुरवठादाराने त्याच LAPTOP ची तपासणी केंव्हा व कशी करून घेतली? याबाबत तसेच 163 LAPTOP खरेदी केलेली असताना केवळ एकच LAPTOP तपासणी करण्याचे प्रयोजन काय? याबाबत साधार खुलासा लेखापरीक्षणास सादर करावा.

9) सन 2013-2014 मध्ये समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, सोलापुरमार्फत मागासवर्गीय विद्यार्थांना MINILAPTOP पुरवण्यात आले होते. सदरची खरेदी ही साईं कॉम्पु., सोलापुर यांचेकडून करण्यात आलेली होती परंतू, सदरचे MINILAPTOP हे निकृष्ट दर्जाचे असलेबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या. त्या अनुषंगाने तत्कालीन उपाध्यक्ष तथा सभापति, बांधकाम व अर्थ समिति, जिल्हा परिषद, सोलापुर यांनी संबधित पुरवठादार याना निकृष्ट दर्जाच्या वस्तू पुरवठा करणे तसेच विक्री पश्चात चांगली सेवा न दिल्यामुळे काळ्या यादीत टाकणेबाबत दिनांक 22/04/2015 रोजीच्या स्थायी समिती सभेत सूचित केले होते. तरी सुद्धा जिल्हा परिषदेने पुन्हा संबंधित पुरावाठादाराचा पूर्वानुभव असताना त्याला निविदा प्रक्रियेत समाविष्ट करून त्याच पुरवठादाराकडून मोठ्या प्रमाणात खरेदी करण्याचे प्रयोजन काय? (समाजकल्याण विभागातील खरेदीबाबत सन 2014-2015 च्या समाज कल्याण विभागाच्या लेखापरीक्षण अहवालात याबाबत स्वतंत्र परिच्छेद क्रमांक 03 नोंदविण्यात आलेला आहे.)

10) तसेच सदरच्या पुरवठादाराने बालविकास प्रकल्प अधिकारी, प्रकल्प करमाळा, करमाळा यांना 13 लॅपटॉप उशिराने (अंतिम दिनांक 10/02/2017) म्हणजेच दिनांक 24/03/2017 रोजी पुरवठा केलेला आहे. सदरचा कालावधी हा सहा आठवडयाचा असून पुरवठा आदेशात प्रती आठवडा 0.5 टक्के दराने दंडाची तरतुद असल्याने प्रती आठवडा रक्कम रुपये 1,983/- प्रमाणे सहा आठवडयांचा दंड रक्कम रुपये 11,898/- वसूल करावा.

11) संचिकेत संलग्न साठा नोंदवहीच्या साक्षांकित प्रती व डिलीव्हरी चलन याची तपासणी केली असता साठा नोंदवही पान क्रमांक व डिलीव्हरी चलनावर नमुद साठा नोंदवही पान क्रमांक यामध्ये तफावत आढळून येते.

**3.902 90 टक्के अनुदानावर शिलाई मशिन सर्वसाधारण लाभार्थ्यांना वाटप करणेबाबत.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** 90 टक्के अनुदानावर शिलाई मशिन सर्वसाधारण लाभार्थ्यांना वाटप करणे योजनेवर रक्कम रूपये 38,56,140/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त खरेदीसाठी ई - निविदा मागविण्यात आली. एकुण 6 निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी 3 निविदा पात्र ठरल्या व तीन निविदा अपात्र ठरल्या. पात्र ठरलेल्या तीनही निविदांचे पुरवठादार हे लक्ष्मी ब्रांड शिलाई मशीनचे विक्रेते आहेत. यावरुन निविदेत नमुद केलेल्या अटीशर्तीस एकच लक्ष्मी ब्रांड शिलाई मशीन पात्र ठरल्याचे दिसते. महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस/2014/ प्र.क्र.82/भाग-3/उदयोग- 4, दिनांक 30/10/2015 मधील नियम 3.1.1 नुसार आवश्यक असलेल्या विशिष्ठ वस्तुंचे स्पेसीफीकेशन ठरवितांना बाजारात उपलब्ध असलेल्या वस्तुंचा विचार करुन जास्तीत जास्त स्पर्धा निर्माण होईल आणि अत्यावश्यक किमान गरजा पुर्ण होतील असेच स्पेसीफीकेशन निविदेच्या अटी शर्ती मध्ये नमुद करणे आवश्यक आहे. परंतु, महिला व बालकल्याण विभागाने शिलाई मशीनच्या बाबतीत ठरविलेले स्पेसीफीकेशन शासन निर्णयास अनुसरुन किमान असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे ई - निविदेमध्ये व्यापक स्पर्धा निर्माण झाली नाही. त्यामुळे कमी किंमतीत अत्युच्च गुणवत्ता प्राप्त वस्तु खरेदी करण्याचा शासनाचा उददेश सफल झाल्याचे दिसुन येत नाही. उदा. स्पेसीफीकेशनमध्ये शिलाई मशीनचे वजन 14 किलो असावे, अशी अट नमुद आहे. त्यामुळे इतर निविदा अपात्र ठरविलेल्या आहेत. परंतु, 14 किलो वजनाची मशीनच योग्य व स्टँडर्ड आहे, हे स्पष्ट झाले नाही.

2) वरील प्रमाणकान्वये ई - निविदा राबवुन श्रीकुष्ण् सेल्स कार्पोरेशन, माणिक चौक, अहमदनगर यांची निविदा सर्वात कमी दराची असून बाजार भावातील दरापेक्षा जास्त दिसत असल्यामुळे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (महिला व बालकल्याण) यांचे पत्र क्रमांक 2703 दिनांक 25/11/2016 अन्वये वाटाघाटीकरीता बोलाविले असता

वाटाघाटी न करता निविदेतील दर रुपये 7,477/- असतांनी रुपये 7,400/- दर कसा ठरविण्यात आला, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) पुरवठादार श्रीकुष्ण सेल्स कोर्पोरेशन, अहमदनगर हे लक्ष्मी बॅन्ड पिको फॉल मशिनचे पुरवठादार / अधिकृत विक्रेते असुन उत्पादक सी.आर.ॲलुलोक ॲन्ड संन्स प्रा. लीमीटेड, लुधियाना यांना भारतीय मानक ब्युरो (ISI) या संस्थेने दिनांक 02/09/2013 ते 01/09/2014 या कालावधीकरीता ISI मार्क उत्पादक म्हणुन प्रमाणित केले आहे. त्यानंतर उत्पादकाचे रिनिव्हल म्हणुन प्रमाणपत्र सोबत जोडले नाही. त्यामुळे सन 2016-2017 मध्ये ही मशिन ISI स्टॅंडर नुसार उत्पादीत केल्याचे स्पष्ट होत नाही. खुलासा करावा.

4) निविदा धारक 1) श्रीकुष्ण सेल्स कार्पोरेशन, अहमदनगर 2) महाराष्ट्र एजन्सी, अहमदनगर 3) प्रीतम एंटरप्रायजेसेस, अहमदनगर हे सर्व एकाच कंपनीचे पुरवठादार एकाच जिल्हयातील कसे? तसेच यापैकी एकाचेही तांत्रिक लिफाप्यात अधिकृत पुरवठादार असल्याचे प्रमाणपत्र नाही. तसेच तीनही तांत्रिक लिफाप्यात एकाच कंपनीचे उत्पादकाचे कागदपत्र जोडले आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच एकाच जिल्हयात एकाच कंपनीचे तीन अधिकृत पुरवठादार कसे, याबाबत खुलासा झालेला नाही.

5) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस/2014/प्र.क्र.82/भाग-3/उघोग- 4, दिनांक 30/10/2015 नुसार शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपदधती मधील अनुक्रमांक 11 नुसार खरेदी विभागाने आवश्यक त्या वस्तुची खरेदी वित्तीय वर्षाच्या 15 फेब्रुवारीपुर्वीच होईल, अशा प्रकारे खरेदी प्रक्रिया राबवावयाची आहे. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

6) श्रीकुष्ण सेल्स कार्पोरेशन माणिक चौक, अहमदनगर यांनी प्रत्येक पुरवठा आदेशाप्रमाणे दिलेल्या साहित्याच्या रक्कमेच्या 3 टक्के सुरक्षा रक्कम जमा करुन नियमानुसार करारनामा करणे आवश्यक असतांना पुरवठा आदेशातील शर्ती व अट क्रमांक 3 ची कार्यवाही केलेली नाही. जिल्हा परिषद उपकर, शासकीय आणि जिल्हा नियोजन या सर्व निधितुन रूपये 78,80,000/- ऐवढया रक्कमेची वरील साहित्य खरेदी करण्याची प्रक्रिया असुन या पुर्ण रक्कमेवर करारनामा केला आहे. परंतु, करारनामा एकुन रुपये 7,000/- चे स्टँप पेपरवर करणे आवश्यक असतांना रूपये 4,100/- रुपयाचे स्टँप पेपरवर केला आहे. कमी स्टॅम्प पेपर रुपये 2,900/- असुन रक्कम वसुलपात्र ठरते.

7) योजना राबविण्यापुर्वी तथा पुरवठा आदेश देण्यापुर्वी लाभार्थीची निवड करुन सर्वसाधारण सभेमध्ये यादी मंजुर करुन घेणे आवश्यक आहे. परंतु, या योजनेमध्ये साहित्य प्रकल्प स्तरावर पाठविल्यानंतर जसजसे लाभार्थ्याचे अर्ज व 10 टक्के हिस्सा भरणा चलान आल्यानंतर त्यांना साहित्य वाटप करीत असल्याचे त्यांचे साठा पुस्तकावरुन दिसुन येते. अर्जावर तारीख नाही. तसेच लाभार्थीचे अर्ज कोणी तपासले याबाबत उल्लेख नाही. असे असतांना विभागीय स्तरावर लाभार्थी निवड कशी करण्यात आली, याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

8) 10 लाभार्थ्याचे वरील योजनेबाबत शिवण काम व कटाईबाबतचे प्रमाणपत्र नाही.

9) 4 लाभार्थाना वरील साहित्याचे वाटप केले आहे. परंतु, 10 टक्के लाभार्थी हिस्स्याचा भरणा करण्यात आला नाही.

10) विभागाने वरील योजनेबाबत प्रकल्प स्तरावर वरीलप्रमाणे साहित्याचा पुरवठा केला आहे. परंतु, लेखापरिक्षणाचे अंतिम तारखेपावेतो मोठया प्रमाणात प्रकल्प स्तरावर साहित्य शिल्लक असल्याचे दिसुन आले आहे.

11) विभागाने पुरवठा आदेश क्रमांक 2760 दिनांक 03/12/2016 अन्वये पिको फॉल शिलाई मशिनचा सर्वसाधारण लाभार्थाना या योजनेचा लाभ देण्याकरीता प्रकल्प स्तरावर 225 नगाचा पुरवठा करण्यासंबधी आदेश असुन या आदेशातील शर्ती व अट क्रमांक 5 अन्वये साहीत्याचा पुरवठा आदेश दिल्यापासुन 45 दिवसाचे आत होणे आवश्यक आहे अन्यथा विलंबाने प्राप्त झालेल्या मालावर प्रती आठवडा अर्धा टक्का या दराने दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल, असे असतांना प्रकल्पाचे साठा रजिस्टरची तपासणीअंती वरुडला दिनांक 03/03/2017 अंजनगाव दिनांक 03/03/2017 चिखलदरा दिनांक 07/03/2017 रोजी प्राप्त असुन इतर प्रकल्पाचे साठा रजिस्टरला साहित्य प्राप्तीचा दिनांक नाही. तरी 94 दिवस पुरवठा आदेशापासुन होत असतांना 94 दिवस - 45 दिवस मुदत = 49

दिवस विलंब असुन एकुण रुपये 52,448/- वसुलपात्र ठरते. तरी संबधिताकडुन वसुल करुन योग्य लेखाशिर्षात भरणा करुन दाखवावे.

12) 10 टक्के लाभार्थी हिस्सा रुपये 740/- प्रती लाभार्थी प्रमाणे एकुण लाभार्थी 354+225=579 पैकी किती लाभार्थ्यांचा 11 संकिर्ण 3 ब ठेवीमध्ये भरणा केला, याबाबतचे अभिलेखे तपासणीस सादर केले नाही.

13) विभागाचे स्तरावरुन प्रकल्प स्तरावर पुरवठा केलेल्या पिको फॉल शिलाई मशिनचा लाभार्थ्यांना योग्य प्रकारे वाटप केल्याबाबत प्रकल्प अधिका-याचे उपयोगीता प्रमाणपत्र घेण्यात आले नाही.

14) पंचायत समिती, अंजनगांव येथील प्रकल्पावर पिको फॉल शिलाई मशिन 24+12=36 नगाचा पुरवठा केला असुन प्रकल्पाचे साठा पुस्तकानुसार लाभार्थाना वाटप केले आहे. परंतु, त्या लाभार्थ्याचा 10 टक्के लाभार्थी हिस्याची रक्कम वसुल केली नसतांना त्यांना साहित्याचे वाटप कसे करण्यात आले, याबाबत वरिष्ठ अधिकारी यांनी योग्य ती चौकशी करुन संबधितावर कार्यवाही करण्यात यावी.

**3.903 जिल्हा निधी मधुन सन 2016 - 2017 मध्ये सी सी सी संगणक प्रशिक्षण दिलेल्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या ग्रामीण भागातील महिला व मुलींच्या प्रशिक्षणाबाबतची 50 टक्के अग्रीम रक्कम प्रदान करतांना झालेली अनियमितता.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, अमरावतीचे सन 2016-2017 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण केले असता जिल्हा निधीमधून ग्रामीण भागातील महिला व मुलींना संगणक प्रशिक्षण देणे या योजनेवर सन 2016-2017 मधे प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थींची 50 टक्के अग्रीम रक्कम प्रदान करतांना रककम रूपये 12,49,500/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त प्रशिक्षण खर्चाबाबतची ई - निविदा जाहीरात अनुक्रमांक 03/ 2016-2017 अन्वये ई - निविदा पोर्टलवर आणि दैनिक हिंदुस्थान ब वर्ग तसेच साप्ताहिक मानव क्रांती ब वर्ग साप्ताहिक या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली. महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 30/10/2015 च्या नियम 4.4.2.3 नुसार रुपये 25 लक्ष वरील खर्चाबाबतची जाहीरात एका विभाग स्तरावरील वृत्तपत्रात तसेच एका राज्य स्तरावरील वृत्तपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे. सदर खर्च हा रूपये 25 लक्ष वरील असतांना सुध्दा सदर निविदेची जाहीरात एकाही राज्यस्तरावरील वृत्तपत्रात तसेच विभागीय वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली नाही. (सर्वसाधारण 17 लक्ष, अनुसूचित जमाती 10 लक्ष, अनुसूचित जाती 15 लक्ष एकुण रुपये 42 लक्ष) त्यामुळे निविदेला पुरेशी प्रसिध्दी मिळाली नाही. निविदेला पुरेशी प्रसिध्दी न मिळाल्याने केवळ दोनच निविदा धारकाने निविदा भरली व त्यामुळे स्पर्धात्मक दराचा फायदा मिळाला नाही.

2) सदर खर्चाची जाहिरात दैनिक हिंदुस्थान ब वर्ग तसेच साप्ताहिक मानव क्रांती ब वर्ग साप्ताहिक या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आल्याचे टिपणीत नमुद आहे. परंतु, सदर जाहिरातीचे कात्रण लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे प्रत्यक्षात जाहिरात दिली किंवा नाही, याची खात्री करता आली नाही.

3) प्रथमत: निविदेला तीन वेळा मुदतवाढ देण्यात आली. त्यानंतर फेर निविदा काढण्यात आली. त्यावेळी एकच निविदा पात्र असल्याने युनिसेस कॉम्प्युटर यांची निविदा मंजुर करण्यात आली. निविदा मंजुर केल्यानंतर कंत्राटदार युनिसेस कॉम्प्युटर यांना वाटाघाटीसाठी आमंत्रीत करण्यात आले व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, अमरावती यांनी वाटाघाटी करुन रूपये 3,000/- दर निश्चित केला. महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 30/10/2015 च्या नियम 4.4.4.1 नुसार कंत्राटदाराबरोबर वाटाघाटी एका व्यक्तीने न करता खरेदी समितीने करणे आवश्यक आहे. असे असतांना उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, अमरावती यांनी स्वत: वाटाघाटी केल्या ही, बाब नियमाला धरुन नाही. तसेच वाटाघाटी का करण्यात आल्या, याचा तपशिल दिलेला नाही.

4) प्रथम लाभार्थ्यांचे अर्ज मागवुन त्यामधील पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करुन त्या यादीला मंजुरी देवुन योजना राबविणे आवश्यक असतांना अर्ज न मागविता यादी तयार करुन त्याला मंजुरी देण्यात आली आहे व अर्ज नंतर मागविण्यात आले आहेत. त्यामुळे यादीतील सर्व लाभार्थी पात्र असल्याचे स्पष्ट होत नाही.

5) यादीमध्ये नमुद केलेल्या लाभार्थी / प्रशिक्षणार्थी यांचे अर्ज लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे लाभार्थी पात्र असल्याची तपासणी करता आली नाही. तरी त्याबाबत खुलासा करावा.

6) सदर संस्थेने तालुका स्तरावरील संस्थेच्या नावासह व हमीपत्रासह यादी दिलेली नाही. त्यामुळे सदर संस्थेची संपुर्ण जिल्हयात लाभार्थींना प्रशिक्षण देण्याची क्षमता असल्याबाबत खात्री पटत नाही.

7) निवड केलेल्या लाभार्थ्यांना कोणत्या केंद्रात प्रशिक्षणाकरीता प्रवेश दिला व कोणत्या केंद्रात प्रशिक्षण दिले, याबाबत माहिती लेखापरीक्षणास सादर झाली नाही.

8) प्रमाणक क्रमांक 3203 मध्ये यादीची तपासणी केली असता अनुक्रमांक 17 मधील कु. अश्वीनी जयसींग कासदेकर व अनुक्रमांक 25 मधील कु. प्रीती जयसींग कासदेकर हया एकाच कुटुंबातील दोन लाभार्थींना लाभ दिलेला आहे. तसेच प्रमाणक क्रमांक 3204 मध्ये यादीची तपासणी केली असता 9 एकाच कुटुंबातील दोन लाभार्थींना लाभ दिला असल्याचे दिसुन येते.

एकाच कुटुंबातील दोन लाभार्थ्यांना लाभ दिल्याने योजनेचा उददेश सफल झाला नाही ही, गंभीर अनियमितता आहे.

9) अपंग व्यंक्तीं हक्काचे सरंक्षण अधिनियम 1995 तसेच महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय विशेष सहाय्यं विभाग, शासन परीपत्रक क्रमांक अपंग / 2011 / प्र.क्र.01 / सुधार 03, दिनांक 07/01/2001 अन्वये एकुण लाभार्थ्यांपैकी 3 टक्के अपंग लाभार्थ्यांची निवड करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही. तरी त्याबाबत खुलासा करावा.

10) सदर योजनेचा फलश्रुती अहवाल लेखापरीक्षणास सादर झाला नाही. त्यामुळे योजना राबविण्याचा उददेश सफल झाला, असे म्हणता येणार नाही.

**3.904 जिल्हा निधीमधून सन 2016 - 2017 मध्ये फॅशन ड्रेस डिझायनींग प्रशिक्षण दिलेल्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या ग्रामीण भागातील महिला व मुलींच्या प्रशिक्षणाबाबतची रक्कम प्रदान करतांना झालेली अनियमितता.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** ग्रामीण भागातील महिला व मुलींना फॅशन ड्रेस डिझायनींग प्रशिक्षण देणे या योजनेवर सन 2016-2017 मधे प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थीची रक्कम प्रदान करतांना रक्कम रूपये 21,06,000/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अनुसुचीत जमाती रूपये 11,12,000/-, अनुसुचित जाती रूपये 10,00,000/- व सर्वसाधारण प्रवर्ग रूपये 17,00,000/- अशा एकुण रूपये 38,12,000 ला प्रशासकिय मान्यता व तांत्रीक मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यामधील सर्वसाधारण प्रवर्गातील रुपये 7,70,400/- हे मागील वर्षाचे प्रदान करावयाचे असल्याने ती रककम वजा करुन निव्वळ निविदा रक्कम रुपये 28,82,400/- येते. तसेच तीनही प्रवर्गावर रुपये 33,72,000/- खर्च करण्यात आला आहे. असे असतांना प्रसिध्द केलेल्या निविदेमध्ये निविदा रक्कम रुपये 22,71,200/- दर्शविण्यात आली आहे व त्या अनुषंगाने रूपये 4,000/- असा स्पर्धात्मक कमी दर प्राप्त झाला आहे. प्रसिध्द केलेल्या निविदेमध्ये प्रत्यक्ष निविदा रक्कम रुपये 28,82,400/- दर्शविण्यात आली असती तर आणखी स्पर्धा होऊन रूपये 4,000/- पेक्षाही कमी असा स्पर्धात्मक कमी दर प्राप्त होऊ शकला असता. तरी प्रसिध्द केलेल्या निविदेमध्ये निवीदा रक्कम कमी दर्शविण्याचे प्रयोजन लेखापरीक्षणास स्पष्ट करावे व त्याबाबत खुलासा करावा.

2) उपरोक्त प्रशिक्षण खर्चाबाबतची ई - निविदा जाहीरात अनुक्रमांक 03/ 2016-2017 अन्वये ई - निविदा पोर्टलवर आणि दैनिक हिंदुस्थान ब वर्ग तसेच साप्ताहिक मानव क्रांती ब वर्ग साप्ताहिक या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली. महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 30/10/2015 च्या नियम 4.4.2.3 नुसार रुपये 25 लक्ष वरील खर्चाबाबतची जाहिरात एका विभाग स्तरावरील वृत्तपत्रात तसेच एका राज्य

स्तरावरील वृत्तपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे. सदर खर्च हा रूपये 25 लक्ष वरील असतांना सुध्दा सदर निविदेची जाहीरात एकाही राज्यस्तरावरील वृत्तपत्रात तसेच विभागीय वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली नाही. त्यामुळे निविदेला पुरेशी प्रसिध्दी मिळाली नाही. निविदेला पुरेशी प्रसिध्दी न मिळाल्याने स्पर्धात्मक दराचा फायदा मिळाला नाही.

3) सदर खर्चाची जाहिरात दैनिक हिंदुस्थान ब वर्ग तसेच साप्ताहिक मानव क्रांती ब वर्ग साप्ताहिक या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आल्याचे टिपणीत नमुद आहे. परंतु, सदर जाहिरातीचे कात्रण लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे प्रत्यक्षात जाहिरात दिली किंवा नाही, याची खात्री करता आली नाही.

4) निविदेतील अटी व शर्तीनुसार कामाचा आदेश देण्यापुर्वी कंत्राटदाराकडुन 3 टक्के प्रमाणे सुरक्षा अनामत भरणे आवश्यक असतांना रुपये 51,160/- सुरक्षा अनामत भरुन घेण्यात आली व कामाचा आदेश देण्यात आला ही, गंभीर अनियमितता आहे.

5) प्रथम लाभार्थ्यांचे अर्ज मागवुन त्यामधील पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करुन त्या यादीला मंजुरी देवुन योजना राबविणे आवश्यक असतांना अर्ज न मागविता यादी तयार करुन त्याला मंजुरी देण्यात आली आहे व अर्ज नंतर मागविण्यात आले आहे. त्यामुळे यादीतील सर्व लाभार्थी पात्र असल्याचे स्पष्ट होत नाही.

6) सदर संस्थेने तालुका स्तरावरील संस्थेच्या नावासह व हमीपत्रासह यादी दिलेली नाही. त्यामुळे सदर संस्थेची संपुर्ण जिल्हयात लाभार्थींना प्रशिक्षण देण्याची क्षमता असल्याबाबत खात्री पटत नाही.

7) निवड केलेल्या लाभार्थ्यांना कोणत्या केंद्रात प्रशिक्षणाकरीता प्रवेश दिला व कोणत्या केंद्रात प्रशिक्षण दिले, याबाबत माहिती लेखापरीक्षणास सादर झाली नाही.

8) अनुसुचित जातीच्या प्रवर्गाच्या प्रशिक्षणावरील खर्चासाठी रूपये 10,00,000/- ला प्रशासकिय व तांत्रीक मंजुरी मिळाली आहे. खर्च मात्र रूपये 11,08,000/- करण्यात आलेला आहे. म्हणजेच रूपये 1,08,000/- ज्यादा खर्च केलेला आहे. त्यामुळे ज्यादा केलेला खर्च लेखापरीक्षणास अंतीम अमान्य करण्यात येत आहे. तसेच अनुसुचित जमातीच्या प्रवर्गाच्या प्रशिक्षणावरील खर्चासाठी रुपये 11,12,000/- ला प्रशासकीय व तांत्रीक मंजुरी मिळाली आहे. खर्च मात्र रूपये 12,32,000/- करण्यात आलेला आहे. म्हणजेच रुपये 1,20,000/- ज्यादा खर्च केलेला आहे. त्यामुळे प्रशासकीय मंजुरीपेक्षा ज्यादा केलेला खर्च लेखापरीक्षणास अंतीम अमान्य करण्यात येत आहे. {एकुण ज्यादा खर्च रूपये 2,28,000/- }

9) निविदा सादर केलेल्या संस्था 1 सर्वज्ञ बहुउददेशिय शिक्षण संस्था 2 ज्ञानोदय संस्था 3 रोषणी महिला विकास संस्था यांच्या तांत्रीक कागदपत्राची तपासणी केली असता तीन्हीसोबत महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ यांचे पत्र क्रमांक 1167 दिनांक 19/07/2016 अन्वये मंजुरी दिल्याचे पत्र सोबत जोडले आहे. त्यावर महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ यांच्या प्राधिकृत अधिका-याची स्वाक्षरी नाही. त्यामुळे सदर मंजुरी वैध असल्याचे स्पष्ट होत नाही. तरी त्याबाबत खुलासा करावा.

10) प्रमाणक क्रमांक 2994 मध्ये एकुण 308 लाभार्थ्यांना प्रशिक्षण दिले आहे. यादीची तपासणी केली असता एकच लाभार्थी यादीत दोनदा दाखवुन दुबार प्रदान झाले आहे. तरी त्याबाबत प्रदान केलेली रक्कम रूपये 12,000/- {4,000 x 3} वसुल करुन अनुपालन दाखवावे.

11) प्रमाणक क्रमांक 2993 मध्ये यादीची तपासणी केली असता एकाच कुटुंबातील दोन लाभार्थीना लाभ दिला असल्याचे दिसुन येते. एकाच कुटुंबातील दोन लाभार्थ्यांना लाभ दिल्याने योजनेचा उददेश सफल झाला नाही ही, गंभीर अनियमितता आहे.

12) अपंग व्यक्तीं हक्काचे सरंक्षण अधिनियम 1995 तसेच महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय विशेष सहाय्यं विभाग, शासन परीपत्रक क्रमांक अपंग/2011/प्रक्रं01/सुधार03, दिनांक 07/01/2001 अन्वये एकुण लाभार्थ्यापैकी 3 टक्के अपंग लाभार्थ्यांची निवड करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही. तरी त्याबाबत खुलासा करावा.

13) सदर योजनेचा फलश्रुती अहवाल लेखापरीक्षणास सादर झाला नाही. त्यामुळे योजना राबविण्याचा उददेश सफल झाला, असे म्हणता येणार नाही.

**3.905 महिला बालकल्याण विभागाकरीता 10 टक्के जिल्हा परिषद उपकरातुन राबवायची योजना.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती 1961 चे कलम 125 तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखासंहीता 1968 चे परि 2 ब नुसार सन 2016-2017 करीता 10 टक्के जिल्हा परिषद उपकरातुन महीला बालकल्याण विभागा अंतर्गत महिला बाल कल्याण समिती ठराव क्रमांक 7 नुसार मारहाण, लैंगीक छळ व इतर तऱ्हेने त्रासलेल्या तसेच मानसिकदृष्टया असंतुलीत महिलांच्या सामाजीक मानसशास्त्रीय कायदेशीर समुपदेशास महिला आयोगाची सहमती असलेल्या समुपदेशन केंद्रामार्फत प्रत्येक जिल्हा पातळीवर, तालुका पातळीवर समुपदेशन केंद्र कार्यान्वीत करणेकरीता प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. समुपदेशन केंद्र चालविणाऱ्या संस्थेस वरिलप्रमाणे रूपये 11 लक्ष खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालील अभिप्राय आहेत.

1) माता रमाई बहुउद्देशीय क्रिडा व शिक्षण संस्था, चांदुर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार माहे मार्च महीन्याचा अहवाल दिलेला नसतांना माहे मार्च चे मानधन रूपये 24,000/- व सादील खर्चाचे रूपये 1,000/- असे एकुण रूपये 25,000/- अनियमितपणे प्रदान केले आहे. खुलासा करावा. संस्थेने सादर केलेल्या अहवालानुसार तक्रार अर्ज नोंदवही, प्राप्त तक्रार अर्ज, त्यावर केलेल्या कार्यवाहीची नस्ती याबाबत विभागाने अभिलेखे प्राप्त न करताच रक्कमा प्रदान केल्यामुळे जिल्हा परिषद उपकरातुन झालेल्या खर्चाची फलश्रुती झालेली नाही.

2) ग्रामविकास प्रतिष्ठाण, भंडारज बु. यांना पातुर, बाळापुर, बार्शीटाकळी या ठिकाणी समुपदेश केंद्र चालवलेल्या संस्थेच्या अहवालानुसार ग्रामविकास प्रतिष्ठाणला रूपये 5,72,000/- चे प्रदान केले आहेत. दाखल प्रकरणे पाहाता समुपदेशन केंद्राचे ठिकाण व कार्य याबाबत व्यापक प्रसिध्दी न झाल्याने केंद्राकडे प्रकरणे दाखल झाली नाहीत. असे लेखापरिक्षणाचे मत आहे.

3) समुपदेश केंद्राने आपला अहवाल दर तीन महिन्यांनी महाराष्ट्र शासन महिला आयोगास सादर करावयाचा असतांना संस्थेने दर तिमाही अहवाल पाठविल्याचे अभिलेखे आढळले नाही.

4) महाराष्ट्र शासन राज्य महिला आयोगाचे संस्थेस मंजुरी असल्याचे अभिलेखे पहावयास मिळाले नाही. त्यामुळे रक्कमा प्रदान केलेल्या समुपदेशन केंद्रास मंजुरी आहे अगर कसे याची खात्री पटत नाही.

5) प्रकल्प अधिकाऱ्यांनी समुपदेशन केंद्राची तपासणी केल्याचे अहवाल उपलब्ध झाले नाही.

6) समुपदेशन केंद्राचे तिमाही अहवाल प्राप्त झालेले अर्जाची रोखवही प्राप्त अर्ज व त्यावर केलेल्या कार्यवाहीची नस्ती लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही. योजनेचा फलश्रुती अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही.

7) सदर प्रदानातुन टीडीएस कपात केले किंवा कसे, खुलासा करावा. नसल्यास टिडीएसच्या रक्कमेची परिगणना करून सदर रक्कम वसुल करून अनुपालन दर्शवावे

**3.906 जिल्हा परिषद उपकर निधी अंतर्गत 90 टक्के अनुदानावर महिलांना मल्टीपर्पज शिलाई मशीन पुरविणे योजना खर्चातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परिषद, वाशिमचे महिला व बाल कल्याण विभागाचे सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात जिल्हा परिषद उपकर निधी अंतर्गत 90 टक्के अनुदानावर महिलांना मल्टीपर्पज शिलाई महीन वाटप योजनेवर रक्कम रुपये 42,98,737/- खर्च केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2007/प्र.क्र.4871/ वित्त-3, दिनांक 05/10/2012 नुसार जिल्हा परीषद स्वउत्पन्नामधील वैयक्तीक लाभाच्या योजनेतील एकुण पात्र लाभार्थ्यांपैकी 3 टक्के लाभार्थी अपंग प्रवर्गातील असावेत, असे आदेश आहेत. त्यानुसार 3 टक्के अपंगाना लाभ दिल्याबाबत निवड यादी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे शासनाचे उपरोक्त आदेशानुसार कार्यवाही केल्याबाबत खात्री करता आली नाही. पुर्तता करावी.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक-परांस 1084/सीआ/1633/57, दिनांक 19/01/1985 नुसार खरेदीपुर्वी लाभार्थी हिस्सा जमा करणे आवश्यक असतांना त्यापुर्वीच पुरवठा आदेश देवून साहित्य प्राप्त झाल्यानंतर चलानद्वारे लाभार्थी हिस्सा भरणा करुन साहित्य वाटप केल्याचे आढळून आले आहे.

3) पंचायत समिती स्तरावरील लाभार्थी अर्जाची तपासणी केली असता पंचायत समिती स्तरावर लाभार्थीचे अर्ज आवक करुन त्यास क्रमांक देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे आढळून आले नाही. योजना नस्तीप्रमाणे प्राप्त लाभार्थी अर्ज संख्या 1,364 नमूद केली आहे. त्यापैकी 813 लाभार्थ्यांची निवड केली आहे. निवड न केले अर्ज लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आले नाही.

4) पंचायत समिती स्तरावरील योजनानिहाय लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्याला दुबार किंवा त्यापेक्षा जास्त वेळा लाभ दिला गेल्याबाबत शक्यता नाकारता येत नाही.

5) लाभार्थी निवड निकषामध्ये शिलाई मशीनचे प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र असणेबाबत नमूद आहे. परंतु, मान्यता प्राप्त प्रशिक्षण केंद्राचे प्रमाणपत्र असणे आवश्यक असतांना लाभार्थी अर्जाची छाननी केली असता 9 लाभार्थ्यांनी जोडलेल्या शिलाई मशीनचे प्रशिक्षण प्रमाणपत्रावर नोंदणी क्रमांक नाहीत. तसेच सदर प्रमाणपत्र छायांकित असून त्यावर उपरी लेखन केलेले आहे.

6) 4 लाभार्थी निवड शिलाई मशीनचे प्रशिक्षण प्रमाणपत्र नसतांना करुन लाभ दिला आहे.

7) पुरवठा आदेशांतील अट क्रमांक 06 नुसार प्राप्त साहित्य योग्य मापदांडाप्रमाणे असल्याबाबत खात्री तसेच तपासणी करून झाल्यानंतर 90 टक्के देयकाची अदायगी करण्यात येइल, असे नमूद असताना पंचायत समिती स्तरावर पुरवठा झालेल्या साहित्याबाबत अहवाल नसताना देयकाची अदायागी केल्याने झालेल्या अनियमिततेबाबत खुलासा करावा.

**3.907 महिला पद अधिका-याचे अभ्यास दौऱ्याकरीता नियमबाहय रककम खर्च करणेबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** महिला पद अधिका-याचे अभ्यास दौऱ्याकरीता नियमबाहय रककम रूपये 4,03,135/- खर्च केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) रेल्वे टिकीटवर रककम रूपये 1,17,915/- खर्च केले आहे. त्यामध्ये जाताना 03 एसीचे व येताना 02 एसीचे टिकीट भाडे लावले आहे. परंतू, महाराष्ट्र शासन, वित्त विभागाचे शासन निर्णय क्रमांक प्रवास-1010/प्र.क्र.02/सेवा-05, दिनांक 03/03/2010 मधील परीच्छेद क्रमांक 12 अन्वये अशासकीय सदस्याचे प्रवास भत्ते (मुबंई नागरी सेवा नियम खंड 02 परी 42-ए विभाग एक) अन्वये राज्य / विभाग / जिल्हा स्तरावरील समिती / आयोग यांवर नियुकत केलेल्या आशासकीय सदस्याना रूपये 8,900/- व त्याहून अधिक ग्रेड वेतन असणा-या शासकीय कर्मचाऱ्यांच्या दराने प्रवास भत्ता अनूज्ञेय असेल. मात्र त्याना विमान प्रवास आणि रेल्वेचे वातानाकूलीत प्रथम वर्गाचा प्रवास अनूज्ञेय असणार नाही. तसेच यांचेसोबत गेलेले सौ.उषा धवने पर्यवेक्षीका, श्री कूदांर पवार कनिष्ट सहाय्यक, व श्री. सूनिल ढाले स्वीय सहाय्यक यांचे ग्रेड वेतन रूपये 8,900/- पेक्षा कमी असल्यामूळे रेल्वेचे वातानाकूलीत वर्गाचा प्रवास अनूज्ञेय नाही. सबब सदरचे कर्मचा-याना दिलेले वातानूकूलीत रेल्वे भाडेची रककम आकारणी करून व सदर रककमेची जबाबदारी निश्चित करून रककम वसूल करून अनूपालन दर्शवावे.

2) रेल्वे टिकीटमध्ये सर्वीस चार्ज म्हणून रककम रूपये 8,100/- खर्च नोंदं केले आहे. उपरोकत प्रमाणे नमूद केलेले शासन निर्णय अन्वये एजंसी शूल्क महणून रककम आकारणी करता येते. परंतू, सदरची रक्कम फक्त त्यांना देय आहे. ज्यांना रेल्वेने आरक्षणासाठी रेल्वेने परवाना दिलेला आहे, तसेच रेल्वेचे अधिक्रत एजन्सीने आहे, तसेच त्यांना सदर शुल्काची रककम प्रतिपूर्तीकरीता अनूज्ञेय केला आहे. परंतू, सदरचे तिकाटावरून असे अढळून येते की, रेल्वेचे अधिकृत एजन्सी नाही. सबब आरक्षणाकरीता दिलेले शूल्काची रककम बरोबर नाही. सदर रककमेची जबाबदारी निश्चित करून रककम वसूल करून अनूपालन दर्शवावे.

3) जिल्हा परीषदेचे महिला पद अधिका-यांना अभ्यास दौऱ्याकरीता महाराष्ट्राबाहेर घेवून जाणेकरीता कोणाची परवानगी घेतली होती, याबाबत खूलासा झाला नाही. तसेच इंदीरा गांधी पंचायत राज ग्रामीण विकास संस्था, जयपूर हे ठिकाण अभ्यास दौऱ्याकरीता कोणी व का अंतीम केले, याबाबत खूलासा झाला नाही. तसेच

पंचायत राज समितीचे अभ्यास दौरा /प्रशिक्षण करीता महाराष्ट्रात केद्रं उपलब्ध असताना महिलांना महाराष्ट्र बाहेर पाठवून काय साध्य करावयाचे होते, याबाबत खुलासा करावा.

4) रेल्वे तिकीटाप्रमाणे सदरचे पद अधिका-यानी धामणगाव ते मथूरा, मथूरा ते जयपूर तसेच जयपूर ते सेवाग्राम असा रेल्वे भाडेचे आरक्षण काढून प्रवास केल्याचे आढळून आले. परंतू, सरळ धामणगाव ते जयपूर असा प्रवास न करता प्रथम मथूरेला गेलेनंतर तेथून जयपूरला आले. मुबंई नागरी सेवा नियम 1959 मध्ये नमूद केल्याप्रमाणे जवळ मार्गाने प्रवास करण्याचे आदेश व नियम आहे. परंतू, याप्रमाणे जवळच्या मार्गाने प्रवास न केल्यामूळे आनावश्यक रेल्वेचे जास्त भाडे दयावे लागले. तसेच रेल्वे भाडेवर जास्त रककम खर्च झाली. सदर रककमेची जबाबदारी निश्चित करून रककम वसूल करून अनूपालन दर्शवावे.

5) इंदीरा गांधी पंचायत राज ग्रामीण विकास संस्था, जयपूर यांनी दिनांक 26/09/2016 ते 30/09/2016 पर्यंतंचे रककम खर्च दाखवून एकूण रककम रूपये 2,50,663/- घेतले आहे.

1. दिनांक 26/09/2016 रोजी तिकीटाप्रमाणे सदरचे पद अधिकारी मथूरा येथे होते. सबब सदरचे संस्थेला दिनांक 26/09/2016 रोजीचे खर्च देय होत नाही.

2. वाहन भाडे म्हणून रककम रूपये 54,201/- घेतले आहे. कोणत्या गाडीने व कोणत्या ठिकाणी तसेच कधी दौरे केले, याबाबत तपशिल नाही. तसेच वाहन भाडेची अधिकृत पावती आढळून आली नाही.

3. सेवा शुल्क म्हणून 10 टकके रककम घेतली आहे. ती रककम शासन खाती जमा केली किंवा कसे, याबाबत खूलासा झाला नाही.

4. सादील म्हणून रककम रूपये 8,361/- सदरचे संस्थेने घेतले आहे. परंतू, कोणती सादील खरेदी केली, तसेच सदरचे सादील खरेदी करून सदस्य यांना दिल्याचे पोच पावती आढळून आली नाही. खर्चाची स्थिती विचारात घेता खर्च संशयासपद वाटतो.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/पंरा-01, दिनांक 24/01/2014 मधील परीशिष्ट 12 अन्वये महिला व बालकल्याण समिती सदस्याचे राज्यांतर्गत व राज्याबाहेरील अशा सहलींसाठी तरतूद करण्यात आली आहे. परंतू, सदरची सहल फक्त महिला व बालकल्याण समिती सदस्यांकरीता आहे. इतर जिल्हा परीषदेचे महिला पद अधिकारी करीता नाही. सबब महिला व बालकल्याण समितीचे सदस्या सोडून सदरचे सहलीकरीता गेलेले इतर सदस्यांकडून सदरची रककम वसूल करून शासन खाती जमा करून अनूपालन दर्शवावे.

7) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण यांचे नावाने रककम रूपये 05 लक्ष अग्रीमाची रककम प्राप्त झाली. परंतू, ते या सहलीमध्ये गेले नाहीत. सबब सदरचा खर्च कोणी व कसा केला, याबाबत खूलासा झाला नाही.

**3.908 100 टकके अनूदानावर 05 ते 12 वी वर्ग शिकणा-या मूलीना लेडीज सायकल वाटप करणेबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** 100 टकके अनूदानावर 05 ते 12 वी वर्ग शिकणा-या मूलींना लेडीज सायकल वाटप करणेकरीता रक्कम रूपये 24,98,715/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दिनांक 14/09/2016 रोजीचे जिल्हा परीषद सर्वसाधारण समितीचे ठराव क्रमांक 25 अन्वये सदरचे देयकाची रककम शोधन करण्याची मंजूरात दिली. परंतू, वर्ष 2016-2017 चे जिल्हा परीषदेचे सेसचे अंदाजपत्रकामध्ये तशा प्रकारची कोणतीही तरतूद आढळून आली नाही. सबब अंदाजपत्रकामध्ये अशा प्रकारची कोणतीही योजनेवर रककमेची तरतूद नसताना देयकाची रककम शोधन कसे केले, याबाबत खूलासा करावा.

2) दिनांक 14/09/2016 रोजीचे जिल्हा परीषद सर्वसाधारण समितीचे ठराव क्रमांक 25 अन्वये सदरचे देयकाची रककम शोधन करण्याची मंजूरात मिळाल्यानंतर अंदाजपत्रकात तरतूद करून देयकाची रककम शोधन करणे आवश्यक होते. परंतू, तशा प्रकारची कोणतीही कार्यवाही न करता देयकाची रककम शोधन केल्यामूळे रककमेचे गैरवापर होण्याची शकयता नाकारता येत नाही.

3) छतीसगड स्टेट ईडंस्ट्रीयल डेव्हलॅपमेटं कॉरपोरेशन लिमिटेड, रायपूर हयांचे दरकरार क्रमांक सीएसआयडीसी/एमकेडी/ पीएस-03/ 126/6006/15-16/बिसीवाय/व्हीसी/7199, दिनांक 29/03/2016 अन्वये विशाल सायकलस प्रायवेट लिमिटेड, लूधयाना, हीरो ईकोटेक लिमिटेड, लूधीयाना, कोहेनूर सायकल प्राय.लि., लूधयाना, ए-वन सायकल लि., लूधयाना असे एकूण 06 पूरवठाधारक सोबत सायकल खरेदीकरीता दिनाक 29/03/2016 ते 28/03/2017 या कालावधीकरीता सायकल खरेदीसाठी दरकरार केले. सदरचे दरकरार मध्ये 20 इंचं लेडीज सायकलचे दर रक्कम रूपये 2,792/- आहे. परंतू, जिल्हा परीषद, यवतमाळ येथे लेडीज सायकलचे दराकरीता ई-निविदा बोलावून रक्कम रूपये 3,345/- प्रती लेडीज सायकलचे दर अंतीम करून या दराने सायकल खरेदी केले. जिल्हा परिषदेने एका सायकलवर रक्कम रूपये 553/- जास्त दर देवून सायकल खरेदी केले आहे.

4) हिरो सायकल व ए-वन सायकलचे कंपनीचे 20 इंच लेडीज सायकलचे दर जवळपास रक्कम रूपये 2,800/- असताना पूरवठाधारकाचे रक्कम रूपये 3,345/- प्रती लेडीज सायकलचे दर अंतीम कोणत्या आधारे केले, याबाबत खूलासा करावा.

5) महाराष्ट्रं शासन, वित्तं विभाग, शासन परीपत्रक क्रंमाक संकीर्ण-1000/प्र.क्रं.14/कोषा-4, दिनांक 11/02/2000 नूसार 15 फेब्रुवारी अथवा तदनंतर सर्व प्रशासकीय विभांगानी तसेच त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विभागीय कार्यालयांनी / प्रादेशिक कार्यालयांनी यंत्र सामग्री, उपकरणे, नवीन मोटार वाहने, नवीन फनिचर्स, नवीन झेरॉक्सं मशीन, नवीन संगणक किंवां इतर वस्तूची खरेदीकरीता अथवा त्यांचे सूटे भाग यांच्या खरेदीच्या पस्तावांना मंजूरी देवू नये, असे आदेश असतांना उपरोकत प्रमाणे दिनांक 22 फेब्रुवारीला साहित्ये खरेदी पूरवठा आदेश दिले.

6) प्राप्तं झालेल्या साहित्याची तपासणी शासकीय औदयोगीक संस्था, शासकीय तंत्रनिकेतन किंवा अभियांत्रीकी महाविदयालयाकडून करुन सदरचे सायकली स्पेसिफिकेशनप्रमाणे बरोबर असल्याबाबतचा तपासणी अहवाल घेणे आवश्यंक असतांना त्यानुसार तपासणी अहवाल प्राप्तं न करता संबंधींत पूरवठाधारकास रक्कम प्रदान केलेल आहे. साहित्यांचा दर्जा तपासणीचे अहवाल उपलब्ध करून देण्यात आले नाही. सबब योगय दर्जाचे साहित्य खरेदी केले किंवा कसे, याची पडताळणी करता आली नाही.

7) सदर योजनेचे लाभार्थीचे अर्ज, लाभार्थीचे मंजूर / निवळ केल्याचे आदेश त्या संबधी इतर कागदपत्रे नस्तीसोबत आढळून आले नाही.

8) साहित्य खरेदी करण्यापूर्वी या योजनेचे लाभार्थी निवड करणे आवश्यक होते. परंतू, तशा प्रकारची कार्यवाही न करता सायकली खरेदीचे आदेश दिले.

**3.909 विशेष घटक योजना अंतर्गत आंगणवाडी केंद्रातील मुलामुलींसाठी डेंक्सबेंच खरेदी योजनेतील अनियमितता**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** विशेष घटक योजना आंगणवाडी केंद्रातील मुलामुलींसाठी डेंक्सबेंच खरेदीसाठी रक्कम रूपये 94,24,342/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचे मुळ पुरवठा आदेश क्रमांक 15 दिनांक 04/01/2017 नुसार पंचायत समिती बुलढाणा अंतर्गत असलेल्या प्रकल्पाकरीता एकूण 280 नग डेस्कबेंच पुरविण्याचे आदेशीत केले होते. परंतु, शुध्दीपत्रक व दिनांक नमूद नसलेल्या पत्रानुसार पंचायत समिती बुलढाणा अंतर्गत प्रकल्पांना 240 डेस्कबेंच पुरविणेसंबंधी आदेश देण्यात आले आहेत. सदर शुध्दीपत्रकातील तालुकानिहाय डेस्कबेंच पुरविण्याच्या नगांची अंकगणीतीय बेरीज केली असता सदर बेरीज ही 1834 नग येत असतांना ही बेरीज 1874 नग इतकी घेतल्याने पुरवठाधारकाने 40 नगाचा जादा पुरवठा केल्याचे दिसून येते. त्यामुळे 40 डेस्कबेंचची किंमत रूपये 5,029/- प्रती नग प्रमाणे रूपये 2,01,160/- वसूल करणे आवश्यक आहे.

2) तांत्रीक मान्यता मबाविआ/तांम/का 6/प्र 5/221/पूणे/16-17/6834, दिनांक 29/12/2016 नुसार तांत्रीक मंजूरी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन देण्यात आलेली आहे त्यानुसार अट क्रमांक 1 नुसार बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचेकडून प्रस्तावित योजने अंतर्गत डेक्सबेंच साहित्याची मागणी प्राप्त करुन घेण्यात यावी, असे

असतांना मागणी घेण्यात आल्याबाबत कोणतेही प्रस्ताव संचिकेत उपलब्ध नाहीत. अट क्रमांक 4 नुसार मागणी बाल विकास प्रकल्प अधिकारी स्तरावरुन प्राप्त करुन घेऊन महिला व बाल कल्याण समिती आंगणवाडयांची निवड करील, असे असतांना तशा प्रकारच्या निवडीबाबत ठराव महिला व बालकल्याण समितीने घेतलेला नाही. नियमबाहयतेबाबत खुलासा सादर करावा.

3) तांत्रीक मान्यता आदेशातील अट क्रमांक 6 नुसार सदर योजनेचा लाभ इतर अन्य कोणत्याही विभागामार्फत घेण्यात आलेला नाही, असे बाल विकास अधिकारी यांचेकडून प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही व त्याबाबत कोणतीही शहनिशा करण्यात आलेली नाही.

4) सदर डेक्सबेंचची खरेदी रुपये 95 लक्षची असतांना सुध्दा ई - टेंडरींग केलेले नाही. शासन निर्णय दिनांक 30/10/2015 नुसार दरकरार शासनाने रद्द केलेला आहे. तरी सुध्दा निविदा व दर करारावर खरेदी करण्यात आलेली आहे. याबाबतचा प्राधिकार लेखापरीक्षणास दर्शवावा.

5) पुरवठादाराने कोऱ्या डिलीव्हरी चलान महिला व बाल कल्याण विभागास पाठविलेल्या आहेत. जेव्हा पंचायत समिती स्तरावर/आंगणवाडी केंद्रावर माल पुरवठा होईल, तेव्हा संबधीतांना साहित्य नग जेवढे मिळाले, तेव्हढे त्यावर नोंद करुन साहित्य मिळाल्याची पोच देण्यात यावी. म्हणजे पुरवठादाराने दिलेल्या मुदतीत साहित्याचा पुरवठा केलेला नाही, असे लेखापरिक्षणाचे स्पष्ट मत आहे.

6) साठा पुस्तकाची पडताळणी केली असता (1) जळगाव जामोद येथील 124 नग दिनांक 20/03/2017 रोजी त्यापैकी 117 नग वाटप केले असुन 7 नग वाटप करावयाचे बाकी आहेत. पुरवठा आदेश क्रमांक बुजिप/मबाक/लेखा 15/2017, दिनांक 04/01/2017 चे शुध्दीपत्रकानुसार अट क्रमांक 3 नुसार डेक्सबेंचचा पुरवठा 60 दिवसात न केल्यास दंडाची रक्कम अट क्रमांक 3 मधील (अ) प्रमाणे किंमत रुपये 1 लाखापेक्षा जास्त असेल अशा किंमतीच्या 5 टक्के दंड आकारण्यात येईल, असे असतांना 9 केंद्राना साहित्याचा पुरवठा उशीरा करण्यात आलेला आहे.

7) मोताळा येथील डेक्स बेंच कोणास वाटप केले, याबाबत नोंद नाही. उशीरा प्राप्त झालेल्या मालाबाबत दंड रुपये 16,778/- संबधीत ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावा. तसेच डेक्सबेंच 40 चा कमी पुरवठा करण्यात आला. त्यांची किंमत रुपये 2,01,120/- असे एकूण रुपये 3,68,838/- संबधीत ठेकेदाराकडून वसुल करण्यात यावे.

**3.910 विशेष घटक योजने अंतर्गत केंद्रांना परात पुरविणे योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** विशेष घटक योजने अंतर्गत केंद्राना परात पुरविणे योजनेवर रक्कम रूपये 5,23,152/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेश क्रमांक 04/10/2017 अन्वये स्टील परातीचा पुरवठा दिनांक 03/03/2017 पर्यंत करणे आवश्यक होते. पंचायत समिती स्तरावरील प्रत्यक्ष साठा पुस्तकाची पडताळणी केली असता साहित्य (परात) पुरवठा उशीरा करण्यात आलेला आहे. अर्धसमास पत्र क्रमांक 4 दिनांक 06/11/2017 नुसार विलंबासाठीच्या दंडाबाबत विचारणा केली असता पत्र क्रमांक बुजिप/मबाक/लेखा/1741/2017, दिनांक 10/11/2017 नुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) जिल्हा परिषद, बुलडाणा यांनी सदर पुरवठादारास कुठल्याही प्रकारचा दंड करण्यात आलेला नाही, असे कळविले आहे. पुरवठा आदेशातील अट क्रमांक 3 मधील अ नुसार मालाची किंमत 1.00 लाखापेक्षा कमी असेल अशा किंमतीच्या 10 टक्के दंड आकारण्यात येईल, असे आदेश आहे. तसेच अट क्रमांक 3 मधील ब) मालाची किंमत रुपये 1.00 लक्ष पेक्षा जास्त असेल अशी किंमतीच्या 5 टक्के दंड आकरण्यात येईल. त्यानुसार रक्कम रूपये 64,781/- दंड वसूल करावा.

2) सदर पंचायत समिती स्तरावरील 14 प्रकल्प अधिकारी एकात्मीक बाल विकास विभागांना साहित्य प्रदान 513 नग वाटप करण्यात आलेले आहेत. त्यापैकी 232 नग पराती पंचायत समिती स्तरावर आंगणवाडी केंद्रांना वाटप न करता पडून आहेत. याबाबत खुलासा सादर करावा.

3) सर्व आंगणवाडी केंद्राकडून उपयोगीता प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

**3.911 90 टक्के अनुदानावर ग्रामीण भागातील महीलांना सौर कंदिल पुरविणे बाबत**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** प्रमाणक क्रमांक 2004, दिनांक 30/03/2017 अन्वये रक्कम रूपये 14,98,925/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थी निवड बाबत महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक प.रा.स./1020/प्र.क्रं.14/38, दिनांक 09/02/2001 नुसार लाभार्थीचे अर्ज लेखापरीक्षणास सादर न केल्याने योजनेच्या अटी व शर्ती नुसार लाभार्थाची निवड केल्याचे दस्तावेज नस्तीबध्द नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 9, दिनांक 13/10/2017 अन्वये मागणी करूनही सदर दस्तावेज सादर केलेले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक प.रा.स./1020/प्र.क्रं.14/38, दिनांक 09/02/2001 अन्वये लाभार्थी हिस्सा वसूल करून, साहीत्य खरेदी करणे बाबत निर्देश असतांना वरील प्रमाणे लाभार्थी हिस्सा वसूल न केल्याने शासन परिपत्रकाचे उल्लंघन झाले आहे.

3) पंचायत समिती भिवापुर येथील साठा पुस्तक तपासले असता खालील त्रुट्या दिसून आल्या

(अ) लाभार्थी निवड यादी मध्ये लाभार्थाचे नाव आचल सूर्यभान दडमल असताना साठा पुस्तकात आचल सूर्यभान पेंदाम यांना सौर कंदिल चे वाटप करण्यात आले.

(ब) लाभार्थी निवड यादी मध्ये लाभार्थाचे नाव मिनाक्षी भोजराज ठाकरे असताना साठा पुस्तकात जयश्री भोजराज ठवकर यांना सौर कंदिल चे वाटप करण्यात आले.

(क) लाभार्थी निवड यादी मध्ये लाभार्थाचे नाव निकीता डोमा जाधव असताना साठा पुस्तकात सारीका डोमाजी जरीत यांना सौर कंदिल चे वाटप करण्यात आले.

(ड) लेखापरीक्षण कालावधी पर्यंत सौर कंदिल 2 नग शिल्लक असल्याचे आढळून आले. वरील प्रमाणे मंजुर लाभार्थी यादी नुसार लाभार्थाला सौर कंदिल वाटप न केल्याने एकूण तीन नगाची रक्कम रुपये 6,789/- वसूल होणे आवश्यक आहे.

4) पंचायत समिती मौदा येथील साठा पुस्तक तपासले असता लेखापरीक्षण कालावधी पर्यंत फक्त 15 नग सौर कंदिल वाटप करण्यात आले व शिल्लक 43 नग दिसून आले. विहीत कालावधीत साहीत्याचे वाटप करण्यात न आल्याने योजनेचा मूळ उद्देश सफल झाला नाही. त्यामुळे साहित्याची आवश्यकता नसतांना खरेदी केल्याने रक्कम रुपये 97,303/- विनाकारण गुंतून पडली आहे.

5) पुरवठा आदेशाच्या अटी व शर्ती नुसार रुपये 800/- मुद्रांक स्टॅम्प पेपर वर करारनामा करावयाचा असतांना, तसा करारनामा करण्यात न आल्याने रुपये 800/- वसूल होणे आवश्यक आहे**.** करारनामा न करता पुरवठा आदेश देण्यात आल्याने नियम शर्ती व अटी चे उल्लंघन झाले आहे.

6) ग्रामपंचायत हिंगणा हि दिनांक 19/03/2015 रोजी व ग्रामपंचायती पारशिवनी हि दिनांक 25/10/2016 ला नगर पंचायत, आणि ग्रामपंचायत वानाडोंगरी ही दिनांक 26/10/2016 ला नगर परिषद क्षेत्र घोषीत करण्यात आले असतांना 12 लाभार्थांना नियमबाहय सौर कंदिल वाटप करण्यात आले.

7) तांत्रिक मंजुरीचे पत्र नस्तीबध्द नाही.

8) महाराष्ट्र शासन ,ग्रामविकास विभागशासन परिपत्रक , क्रमांक/1089 प्र ,55364/.क्र.दिनांक नुसार मास्टर नोंदवही 1989/10/05ठेवण्यात आली नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक प.रा.स./1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार योजनेचे मूल्यमापन करून फलश्रुती अहवाल सादर करणे बाबत निर्देश असताना, फलश्रुती अहवाल नस्तीबध्द नाही.

10) लाभार्थाची निवड ग्रामपंचायतच्या ग्रामसभेतून निवड केल्याबाबत ग्रामसभेच्या ठरावाची प्रत नस्तीबध्द नाही.

11) एकूण 13 प्रकल्पा पैकी मौदा व भिवापुर चे साठा पुस्तक तपासणीस सादर करण्यात आले उर्वरीत 11 प्रकल्पाचे साठा पुस्तक सादर करण्यात आले नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 8, दिनांक 10/10/2017 व अर्धसमास पत्र क्रमांक 9, दिनांक 13/10/2017 अन्वये मागणी करूनही साठा पुस्तक सादर करण्यात आले नाही.

त्यामुळे सदर साहित्य केव्हा प्राप्त झाले व केव्हा वितरीत करण्यात आले आणि शिल्लक साहित्य किती याबाबतची तपासणी करता आली नाही.

**3.912 90 टक्के अनुदानावर महिलांना पिको फॉल मशिन पुरविणे मधील अनियमितता**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** प्रमाणक क्रमांक 475, दिनांक 22/08/2016 अन्वये रक्कम रूपये 22,44,810/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर देयकातून आयकर कपात हि रक्कम रुपये 49,885/- करण्यात आलेली आहे. आयकर अधिनियम 190 सी नुसार प्रत्यक्ष आयकर कपात हि रक्कम रुपये 52,528/- नी करावयास पाहीजे होती. त्यामुळे एकूण आयकर कपात हि एकूण रक्कम रुपये 2,643/- नी कमी करण्यात आलेली आहे. तरी एकूण रक्कम रुपये 2,643/- च्या वसुलीची कार्यवाही व्हावी.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1089/प्र.क्र./55364, दिनांक 05/10/1989 नुसार मास्टर नोंदवही ठेवुन लाभार्थ्यास दुबारा लाभ दिला नसल्याची खात्री पटवावी

3) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक 1083/1074, दिनांक 09/01/1983 अनुसार राबविण्यात येणारी योजना सफल झाल्याबाबत तशी तपासणी करुन फलश्रृती अहवाल दिलेला नाही.

4) शासन परिपत्रक क्रमांक परास-1096/प्र.क्र.178/05, दिनांक 07/10/1997 नुसार योजने अंतर्गत लाभ त्याच वित्तीय देणे आवश्यक असतांना तसा लाभ पात्र लाभार्थीना त्याच वर्षात झाल्याचे आढळुन आलेले नाही.

5) सदर लाभार्थांचे अर्ज, निवड यादी, पावत्या नस्तीबध्द नाही.

6) प्रकल्पाचे साठा पुस्तक सादर करण्यात न आल्याने सादर साहित्य केव्हा प्राप्त झाले व केव्हा वितरीत करण्यात आले आणि शिल्लक साहित्य किती याबाबतची तपासणी करता आली नाही.

**3.913 अंगणवाडयांसाठी लोखंडी कपाट खरेदी करणेबाबतची अनियमितता**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, वर्धा चे सन 2016-17 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करतांना, अंगणवाडयांसाठी खरेदी करण्यात आलेल्या लोखंडी कपाटावर केलेल्या खर्चाची नस्तीची तपासणी करण्यात आली. सदर बाबत प्रमाणक क्रमांक 1634, दिनांक 13/01/2017 अन्वये रकक्म रुपये 8,97,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजनेतील खर्चाची मर्यादेनुसार विभागालाच प्रशासकिय व तांत्रिक मान्यतेचा अधिकार असल्यामुळे एकाच दिवशी दोन्ही मान्यता देण्यात आलेले आहे. परंतु, नियमानुसार कोणत्याही योजनेला प्रथम प्रशासकीय व नंतर तांत्रिक मंजूरी देणे आवश्यक असतांना विभागाने याप्रमाणे मंजूरी दिलेली नाही

2) आयकर अधिनियम 1961 कलम 194 सी नुसार सदर मॅन्युफयाक्चरींग कंपनीकडून रूपये 8,97,000/- च्या देयकावर 2 टक्के प्रमाणे रूपये 17,940/- आयकर कपात करुन शासन खाती जमा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही. विभागाने सदर कंपनीकडून रूपये 17,940/- आयकराची रक्कम वसुल करुन चलनादवारे शासन खाती जमा करावे.

3) 09 बाल विकास प्रकल्प कार्यालयाकडून त्यांचा अधिनस्त् असलेल्या अंगणवाडयांना लोखंडी कपाटाची आवश्यकता असल्यामुळे महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, वर्धा कार्यालयाला मागणी केल्याचे पत्र लेखापरीक्षणास सादर केले नाही. त्यामुळे कशाचा आधारे विभागाने 184 नग लोखंडी कपाट खरेदी केले? याची शहानीशा करता आली नाही.

**3.914 ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या स्त्रियांना 90 टक्के अनुदानावर शिलाई मशिन पुरविणे योजनेतील अनियमितताबाबत**.

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 1863, दिनांक 10/03/2017 अन्वये रक्कम रुपये 34,91,964/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महिला व बालकल्यांण विभाग, जिल्हा परिषदवर्धा सन 2015-2016 व 2016-2017 चे लेखापरीक्षण जिल्हा परिषदसेस फंड योजनाचे लेखापरीक्षण वेळी ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या स्त्रियांना 90 टक्के अनुदानावर शिलाई मशिन पुरविणे योजना प्रमाणकासोबत नस्तीची तपासणी केली असता सदर योजनेस प्रशासकिय व तांत्रिक मान्यता प्राप्त असुन ई-टेंडरींग नुसार मे.कस्तुरी सप्लायर, नागपुर यांना 1116 नग शिलाई मशिन पुरविणेबाबत शासकिय अनुदान रक्कम रूपये 34,91,964/- प्रदान करण्यात आले. यावर लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे आहेत:-

1) शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2013/प्र क्र 76/पंरा, दिनांक 24/01/2014 मधील योजना क्रमांक 16 नुसार लाभार्थी मिळविण्याच्या अनुषंगाने पुरेशी व व्यापक प्रसिध्दी देऊन अर्ज मागविणयाचे सूचविले आहे परंतु, महिला व बालकल्याण विभागाने योजनेबाबतची प्रसिध्दी केल्याचे अभिलेखे नस्तीत दिसून आले नाही. तसेच ग्रामीण भागातील दुर्बल घटकातील महिलांना रोजगार उपलब्ध व्हावा, या दृष्टीने शासनाने योजना राबविण्याचे निर्देशित आहे. तर वाटप केलेल्या लाभार्थ्यांपैकी किती लाभार्थ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली? याबाबतचे अभिलेखे उपलब्ध झाले नाही.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/1094/सीआर/1633/57, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिस्सा जमा केल्याशिवाय निवड यादी जाहीर करू नये. असे असतांना 90 टक्के अनुदानावर शिवणयंत्राचे वाटप करीत असतांना 10 टक्के लाभार्थी हिस्सा पात्र उमेदवाराकडून शिवणयंत्र वाटप करण्याआधीच घेणे आवश्यक आहे. सदरील योजना अंतर्गत 10 टक्के रूपये 347.70/- प्रमाणे 1,116 लाभार्थ्यांचा लाभार्थी हिस्सा रूपये 3,88,033/- पैकी रक्कम रूपये 84,564/- वसूल असुन रक्कम रूपये 3,03,469/- अदयावत लाभार्थी हिस्सा वसुली केलेली नसल्याचे विभागाकडील प्राप्त चलान नोंदवहीवरुन दिसुन येते.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक मागास1089/प्र.क्र.565/34, दिनांक 05/10/1989 तथा दिनांक 02/09/2013 अन्वये मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवही ठेवलेली नाही. मास्टर नोंदवही न ठेवल्याने पंचायत समिती, हिंगणघाट- 04, समुद्रपुर-02, देवळी-06 लाभार्थ्यांचे अर्ज पुन्हा प्राप्त झाले होते. महिला व बालकल्याण विभागाने सर्वसाधारण सभा दिनांक 05/07/2017 विषय क्रमांक 5 ठराव क्रमांक 4, 3 अन्वये नवीन लाभार्थ्यांना मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यामुळे मास्टर नोंदवही अभावी दुबार लाभ देण्यात आला किंवा कसे, याबाबत लेखापरीक्षणात बोध घेता आलेला नाही.

4) सदरील योजना अन्वये लाभार्थ्यांना 1,116 नग शिलाई मशिन वाटप करण्यात आल्या. परंतु, लाभार्थ्यांचकडुन नियमानुसार योग्य त्या मुद्रांकसह करारनामा केलेला नाही.

5) पंचायत समिती अंतर्गत लाभार्थ्यांना शिलाई मशिन वाटप करण्यात आलेले नाही. पंचायत समिती समुद्रपुर - 33 नग, पंचायत समिती हिंगणघाट 4 नग, पंचायत समिती देवळी 5 नग, पंचायत समिती वर्धा 7 नग व पंचायत समिती कारंजा 7 नग शिलाई मशिन अदयाप वाटप करण्यात आलेले नाही.

6) शिलाई मशिन प्रशिक्षण प्रमाणपत्र शासन मान्यता संस्थाचे नसणे तथा संस्था मान्यता रजिस्ट्रेशन क्रमांक नमुद नसतांना 15 लाभार्थ्यांना शिलाई मशिन वाटप केलेली आहे.

7) शिलाई मशिन शिवणकला प्रमाणपत्र प्राप्त नसताना 11 लाभार्थ्यांना मशिन वाटपबाबत.

8) उत्पन्न रुपये 50,000/- पेक्षा जादा असतांना 4 लाभार्थ्यांना शिलाई मशिन वाटप केलेली आहे.

**3.915 7 वी ते 12 वी पास विद्यार्थींना 90 टक्के अनुदानावर एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षण देणे व संगणक प्रशिक्षण केंद्रांना वितरीत करण्यात आलेल्या निधीतील अनियमितता**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 43,06,050/- अनुदान वितरित करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सेवाकर कायदा 1994 सुधारीत 2004 च्या अनुक्रमाक 23 मध्ये Commercial Training Coaching Classes ला सेवाकर भरणे बंधनकारक आहे. सदर प्रकरणात एकुण 26 संगणक प्रशिक्षण केंद्रांनी सेवाकर भरल्याचे अभिलेखे आढळले नाही. त्यानुसार जुन 2016 पासुन 15 टक्के सेवाकर कपात करणे आवश्यक

असताना सेवाकर कपात केल्याचे आढळले नाही. रूपये 6,45,907.5/- एवढी सेवाकर रक्कम वसुल करुन शासनखाती जमा करण्यात यावी.

2) Income Tax Act 1961 च्या कलम 194C नुसार 2 टक्के प्रशिक्षण केंद्रांकडुन Income Tax कपात करणे आवश्यक असतांना Income Tax कपात केल्याचे आढळले नाही. रूपये 86,121/- एवढी Income Tax रक्कम वसुल करुन शासनखाती जमा करण्यात यावी.

3) Cosmica Council Advaned Computer Education Hinghanghat या प्रशिक्षण केंद्रांची एकुण 37 विद्यार्थीनीची प्रवेश नस्ती व निकाल नस्ती तपासली असता असे निदर्शनास आले की, विद्यार्थीनींनी प्रवेश घेतल्याबाबतचे तसेच त्यांचा प्रवेश MKCL कडुन निश्चित झाल्याचे दाखवुन त्यांची माहीती MKCL वर UPLOAD केल्याची कागदपत्रे manually तयार केल्याचे आढळले.

निकाल नस्तीमध्ये विद्यार्थीनीची परीक्षेचे प्रवेश पत्र व परीक्षेचा निकालाची कागदपत्रे manually तयार केल्याचे आढळले. सदर MSCIT प्रशिक्षण योजना आक्टोंबर 2016 ते जानेवारी 2017 या कालावधीतील प्रशिक्षणासाठी व प्रशिक्षणानंतर माहे जानेवारी 2017 च्या परीक्षेसाठी आहे. परंतु, निकाल नस्ती तपासली असता विद्यार्थीनीची MSCIT परीक्षेचे प्रवेशपत्र मार्च 2017 चे आहे व online MSCIT परीक्षा एप्रिल 2017 मधील आहे. माहे मार्च 2017 च्या परीक्षेचे प्रवेश पत्र तपासले असता त्यावर Learner ID हा 177 या digit नुसार सुरु तर 241 या digit ने संपतो व लेखापरीक्षणास तपासणीकरीता सादर केलेली निकालाची प्रतीवर result January 2017 च्या परीक्षेचा आहे, असे नमुद केले आहे. पंरतु, परीक्षेच्या प्रवेश पत्रावरील Learner ID नुसार सदर निकालाची प्रत ही March 2017 च्या परीक्षेची आहे.

तसेच MSCIT परीक्षेच्या निकालाची प्रत तपासली असता त्यावर Z. P. BATCH OCT-2017, MS-CIT RESULT FOR JANUARY 2017(Result-1) असे दर्शविले आहे. पंरतु, ऑक्टोबर 2017 च्या प्रशिक्षण सत्राची सुरुवात 2017 या वर्षातील ऑक्टोबर महिन्याची सुरुवात झाल्यानंतर होईल.

त्यामुळे संबधीताने कृत्रिम कागदपत्रे तयार करुन लेखापरीक्षणास सादर केल्याचे आढळले. त्यामुळे 37 विद्यार्थीनीचे रूपये 3,150/- प्रमाणे रक्कम रूपये 1,16,550/- वसुलपात्र करण्यात येत आहे.

4) SHREE SUPER COMPUTER TALEGAO (SHAP) येथील निकाल नस्ती व प्रवेश नस्ती तपासली असता MKCL ने Generate केलेले admission report व result report नस्तीत आढळले नाही. तसेच एकुण 8 विद्यार्थीनीचा प्रवेश नोंदविलेला आहे. पंरतु, 8 विद्यार्थीनीचे परीक्षेचे प्रवेशपत्र नाही व त्यांचे provisional certificates नाही. त्यामुळे 8 विद्यार्थीनीचा प्रवेश निश्चित झाला नसल्याचे दिसते.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण), जिल्हा परीषद, वर्धा यांचे पत्र क्रमांक जिपव/जिक/मबाक/कावि-40/120/ 2017, दिनांक 13/18/-जानेवारी-2017 तील टीप नुसार जानेवारी 2017 मध्ये घेण्यात येणाऱ्या MS-CIT परीक्षेमध्ये ज्या विद्यार्थीनींचे ऑनलाईन प्रवेश पत्र प्राप्त होणार नाही. त्या विद्यार्थीनींचे देयक अदा केले जाणार नाही, असे नमुद केले आहे. त्यामुळे SHREE SUPER COMPUTER TALEGAO (SHAP) येथील एकुण 8 विद्यार्थीनींचे रूपये 3,150/- प्रमाणे रक्कम रूपये 25,200/- वसुलपात्र करण्यात येत आहे.

अर्धसमासपत्र क्रमांक 10 दिनांक 07/09/2017 व अर्धसमासपत्र क्रमांक 10 दिनांक 14/09/2017 नुसार MKCL ने Generate केलेले admission confirmed uploaded report, hall ticket for exam January 2017, provisional certificates व result report बाबत विचारणा केली असता अर्धसमासपत्राचे उत्तर देण्यात आले नाही.

5) MS-CIT प्रशिक्षणाकरीता एकुण 1,367 विद्यार्थीनींनी प्रवेश घेतलेला आहे. त्यापैकी 748 विद्यार्थीनीं पास, 329 विद्यार्थीनीं नापास व 290 विद्यार्थीनीं गैरहजर आहेत त्यामुळे जवळपास निम्मे विद्यार्थीनींच्या प्रशिक्षणासाठी खर्च करण्यात आलेल्या रकमेचा उपयोग झाला नसल्याचे दिसते. तसेच यानुसार असे निदर्शनास येते की, प्रशिक्षण केंद्रांला विद्यार्थ्यांना पुरेसे संगणक उपलब्ध नाही व शिकवणीसाठी बसण्याची पर्याप्त व्यवस्था नाही. त्याकारणाने विद्यार्थीनींचे गैरहजर व नापास झाल्याचे प्रमाण जास्त असल्याचे दिसते. परीक्षेकरीता परीक्षा केंद्रावर विद्यार्थीने उपस्थित राहण्याविषयीची जबाबदारी ही, प्रशिक्षण केंद्राची असते. तसेच 290 विद्यार्थीनीं गैरहजर असणे

व 329 विद्यार्थीनीं नापास होणे ही, बाब प्रशिक्षण केंद्रांची गुणवत्ता खालावलेली असल्याची दिसते व जिल्हा परीषदेचा प्रशिक्षण केंद्रांवरील नियत्रंणाचा अभाव असल्याचे आढळले.

6) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण), जिल्हा परीषद, वर्धा यांचे आदेश क्रमांक जिपव/मबाक/संगणक प्र./ कावि-2098/2016, दिनांक 30/11/2016 नुसार प्रकल्पनिहाय प्रकल्प अधिकारी यांनी तालुक्यातील प्रशिक्षण केंद्रांना भेट देऊन तपासणी अहवाल व भेट दिल्याबाबत भेट रजिस्टरची झेरॉक्स कॉपी कार्यालयास सादर करावयाचे होते. परंतु, भेट दिल्याबाबत भेट रजिस्टरची झेरॉक्स कॉपी नस्तीमध्ये आढळली नाही. त्यामुळे प्रकल्पनिहाय प्रकल्प अधिकारी यांनी प्रशिक्षण केंदांना भेट दिली नसल्याचे निदर्शनास येते. केवळ 13 संगणक प्रशिक्षण केंद्रांचे तपासणी अहवाल लेखापरीक्षणास सादर केले. उर्वरीत संगणक प्रशिक्षण केंद्रांचे तपासणी अहवाल लेखापरीक्षणास सादर केलेली नाही. लेखापरीक्षणास सादर केलेल्या प्रशिक्षण अहवालामध्ये सविस्तर माहीती असल्याचे आढळुन आले नाही.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण), जिल्हा परीषद, वर्धा यांनी संगणक प्रशिक्षण केंद्रांची तपासणी करण्यासाठी प्रकल्प अधिकारी यांची निवड करुन सुध्दा तालुकानिहाय प्रकल्प अधिकारी संगणक प्रशिक्षण केंद्रांची तपासणी न केल्याचे दिसुन येते.

त्यामुळे संगणक प्रशिक्षण केंद्रावर जिल्हा परीषदेने नियंत्रण ठेवलेले नसल्यामुळे नापास व गैरहजर विद्यार्थीनींची प्रमाण जवळपास निम्म्याएवढे आहे. त्यामुळे जिल्हा परीषदेने ज्या उद्देशासाठी योजना राबविली, त्याची फलनिष्पती झाली, असे म्हणता येणार नाही.

7) 5 संगणक प्रशिक्षण केंद्राचे हजेरीपत्रक लेखापरीक्षणास सादर केलेल्या नस्तीत आढळले नाही. त्यामुळे संबधित प्रशिक्षण केंद्रामध्ये नियमित शिकवणी वर्ग होत असल्याची खात्री करता आली नाही.

8) एकुण 15 संगणक प्रशिक्षण केंद्रांचे MKCL अधिकृत व सन 2016-2017 करीता मान्यता असल्याचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेल्या नस्तीमध्ये आढळले नाही. त्यामुळे संबधीत प्रशिक्षण केंद्रांला मान्यता आहे किंवा कसे, याबाबत खात्री करता आली नाही.

9) योजना वर्ग 7 वी ते 12 वी पास मुलींना एमएस-सीआयटी प्रशिक्षण देणेबाबत योजना देण्यात आली आहे. तथापि, महिला व बालकल्याण समितीने सदर योजना नियमबाहयपणे महिलांकरिता सुध्दा मंजुर करुन अमंलात आणल्याचे निदर्शनास येते कारण, आय टी स्कॅन कॉम्प्युटर एजुकेशन, वर्धा या प्रशिक्षण केंद्राला श्रीमती साधना श्यामराव मेंढे (जन्म दिनांक 08/04/1965) या महिलेने व झेनिथ् कॉम्प्युटर, समुद्रपुर या प्रशिक्षण केंद्राला श्रीमती मंजुषा नामदेवराव कालोडे (जन्म दिनांक 08/04/1965) या महिलेने प्रवेश घेतला आहे. त्यामुळे सदर रक्कम रूपये 6,300/- वसुलपात्र करण्यात येत आहे.

10) अर्धसमासपत्र क्रमांक 10 दिनांक 07/09/2017 नुसार मागणी करुनही लेखापरीक्षणास पंचायत समिती, कारंजा व पंचायत समिती, आष्टी येथील सेस फंड, विशेष घटक योजना, ओटीएसपी योजनेतुन लाभ दिलेल्या सर्व प्रवर्गनिहाय विद्यार्थीनींचे अर्ज तपासणी करीता सादर करण्यात आले नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक लेखाप-2013/प्र.क्र.81/वित्त 5, दिनांक 18/02/2014 अन्वये लेखापरीक्षणासाठी विहित कालावधीत अभिलेखे सादर न करणाऱ्या अधिकारी / कर्मचारीविरुद्ध दंडात्मक व प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**3.916 अनुसुचित जाती जमाती भटक्या जमाती व विमुक्त जमातीच्या द्रारिद्य रेषेखालील इयत्ता 10 वी वर्ग पास मुलींना बेसीक कोर्स इन कम्प्युटर टायपींग प्रशिक्षण देण्याबाबत**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** प्रमाणक क्रमांक 1925, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रूपये 1,39,120/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 अन्वये मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण शुल्काच्या रक्कमेच्या 10 टक्के रक्कम लाभार्थ्यांने स्वत: भरावी असे नमुद आहे.

एकुण लाभार्थी 74 प्रती लाभार्थी प्रशिक्षण शुल्क रक्कम रुपये 4,700/- यानुसार 10 टक्के रक्कम प्रती लाभार्थी 470/- रुपये असे एकुण (74*470) रुपये 34,780/- लाभार्थ्यांकडुन वसुल करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नसल्याने शासन निधीचे रक्कम रुपये 34,780/- नियमबाह्य प्रदान करुन नुकसान करण्यात आले आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार एकाच व्यक्तीस दोन वेगवेगळ्या योजनांचा लाभ अनुदेय नाही किंवा एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त व्यक्तींना लाभ अनुदेय नाही. असे असतांना लाभार्थ्यांना एकाच कुटुंबात लाभ दिलेले आहे.

तरी लाभार्थ्यांकडुन रक्कम रूपये 4,700/- वसुलीस पात्र ठरतात.

3) लाभार्थ्यांच्या मंजुर यादी वरुन असे निर्दशनास येते की सदर योजना इयत्ता 10 वी वर्ग पास असलेल्या मुलींकरीता असतांना इयत्ता 10 वी वर्ग नापास असलेल्या तीन लाभार्थ्यांना लाभ देण्यात आले आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, झेडपीए/2008, दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषदेने राबविण्यात येणाऱ्या विवीध योजनाचे नियोजन व अंमलबजावणीचे वेळापत्रकाकडे दुर्लक्ष करुन योजना राबविण्यात आल्याचे निदर्शनास येते.

5) प्रशिक्षणार्थ्यींला संस्थेमध्ये प्रवेश केव्हा दिला व प्रशिक्षणाची सुरवात केव्हा झाली व परीक्षेचा दिनांक विभागाने घेतलेला नाही.

6) सदर योजनेची प्रचार प्रसिध्दी, लाभार्थीची निवडीचे निकष व निवड, लाभार्थी अर्ज व मंजुरीचा ठराव लेखापरीक्षणास सादर करण्यात आला नाही. तो सादर करणे आवश्यक आहे.

7) प्रशिक्षणार्थीचे हजेरी बुक लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही. तसेच विभागातील सक्षम कर्मचारी वर्गाने हजेरी बुकची तपासणी केल्याचा अहवाल लेखापरीक्षणास सादर करण्यात आला नाही.

8) प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर खर्चाचा अहवाल व त्या संबंधीचे उपयोगिता व विनियोग प्रमाणपत्र व परीक्षा पासचे प्रमाण देयका सोबत आढळून आले नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थीची मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

### 3.917 विशेष घटक योजना अंतर्गत द्रारिद्य रेषेखालील इयत्ता 10 वी वर्ग पास मुलींना बेसीक कोर्स इन कम्प्युटर टायपींग प्रशिक्षण देण्याबाबत.

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** प्रमाणक क्रमांक 1926, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रूपये 3,19,600/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 अन्वये मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण शुल्काच्या रक्कतेच्या 10 टक्के रक्कम लाभार्थ्यांने स्वत: भरावी असे नमुद आहे.

एकुण लाभार्थी 170 प्रती लाभार्थी प्रशिक्षण शुल्क रक्कम रुपये 4,700/- यानुसार 10 टक्के रक्कम प्रती लाभार्थी 470/- रुपये असे एकुण (170*470) रुपये 79,900/- लाभार्थ्यांकडुन वसुल करणे आवश्यक होते.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1093/प्र.क्र.1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार एकाच व्यक्तीस दोन वेगवेगळया योजनांचा लाभ अनुदेय नाही किंवा एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त व्यक्तींना लाभ अनुदेय नाही असे असतांना 8 लाभार्थ्यांना एकाच कुटुंबात लाभ दिलेले आहे.

तरी 8 लाभार्थ्यांकडुन रक्कम रूपये 4,700/- प्रमाणे रक्कम रूपये 18,800/- चे वसुलीस पात्र ठरतात.

3) प्रशिक्षणार्थ्यींला संस्थेमध्ये प्रवेश केव्हा दिला व प्रशिक्षणाची सुरवात केव्हा झाली व परीक्षेचा दिनांक विभागाने घेतलेला नाही.

4) सदर योजनेची प्रचार प्रसिध्दी, लाभार्थीची निवडीचे निकष व निवड, लाभार्थी अर्ज व मंजुरीचा ठराव लेखापरीक्षणास सादर करण्यात आला नाही. तो सादर करणे आवश्यक आहे.

5) प्रशीक्षणार्थीचे हजेरी बुक लेखा परीक्षणास सादर करण्यात आले नाही. तसेच विभागातील सक्षम कर्मचारी वर्गाने हजेरी बुकची तपासणी केल्याचा अहवाल लेखापरीक्षणास सादर करण्यात आला नाही.

6) प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर खर्चाचा अहवाल व त्या संबंधीचे उपयोगिता व विनियोग प्रमाणपत्र व परीक्षा पासचे प्रमाण देयका सोबत आढळून आले नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थीची मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

**3.918 महिलांसाठी समुपदेशन केंद्रे चालविणेचे योजनेतील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** प्रमाणक क्रमांक 906, दिनांक 29/03/2017 अन्वये रक्कम रूपये 5,76,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अर्धसमास पत्र क्रमांक 09, दिनांक 14/11/2017 नुसार सदर समुपदेशन केंद्रे कार्यरत असलेल्या ठिकाणचा पत्ता, दुरध्वनी क्रमांक आणि सदर केंद्रात कार्यरत समुपदेशक आणि विधी सल्लागार यांचे शैक्षणीक अहर्ताची छायांकीत प्रत मागणी करूनही लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्यामूळे सदर समुपदेशन केंद्रे कार्यरत असलेबाबत आणि सदर केंद्रात तज्ञ समुपदेश आणि विधी सल्लागार सेवा देत असलेबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

2) महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा परिषद भंडारा यांचे पत्र क्रमांक 127, दिनांक 30/05/2013 नुसार मासिक किमान 05 आणि वार्षीक किमान 60 प्रकरणे निकाली न काढल्यास मानधन अनुज्ञेय असणार नाही असे नमूद असून जिल्हा स्तरांवरील समुपदेशन केंद्राने मासिक 05 आणि वार्षिक 60 प्रकरणे निकाली काढल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रकल्पस्तरांवरील समुपदेशन केंद्रांनी किती प्रकरणे निकाली काढली याबाबतचा कुठलाही अभिलेखे संचिकेत दिसून आला नाही. तरी विहित मर्यादेत प्रकरणे निकाली काढलेली नसतांना सुध्दा परीपूर्ण मानधन अदा केलेले आहे.

3) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास विभाग), जिल्हा परिषद भंडारा यांचे समुपदेशन केंद्र सुरू करनेबाबतचे आदेश क्रमांक 62, दिनांक 20/03/2012 मधील अट क्रमांक 09 नुसार समुपदेशन केंद्र सुरू करण्यापुर्वी जिल्हा समुपदेश केंद्र, भंडारा व प्रकल्प स्तरांवरील समुपदेशन केंद्र भंडारा, लाखांदूर, मोहाडी, तुमसर व पवनी यांनी रूपये 100/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा केल्याचे संचिकेत दिसून आले नाही. त्यामूळे रूपये 600/- शासन महसूलाची हानी झालेली आहे.

4) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास विभाग), जिल्हा परिषद भंडारा यांनी आदेश क्रमांक 62, दिनांक 20/03/2012 नुसार जिल्हास्तरावर मुख्यालयात आणि प्रकल्पस्तरांवर तालुका तूमसर येथे महिला समुपदेश केंद्र सुरू करणेबाबत सहयोग महिला मंडळ, तुमसर या संस्थेची निवड केली असून दोन्ही केंद्रात समुपदेशक श्रीमती गिता कोंडेवार आणि विधी सल्लागार ॲडव्होकेट श्री सुदीप सक्सेना कार्यरत असल्याचे दिसून येते. करीता सदर व्यक्ती नेमके कुठल्या संस्थेत सेवा देत आहेत याबाबतची खात्री केल्याचे संचिकेत दिसून आले नाही.

5) महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक 29/07/2016 चे ठराव क्रमांक 4 नुसार महिला समुपदेशन केंद्र मोहाडी, तूमसर, साकोली, लाखांदूर व पवनी बंद करनेबाबतचा असून सबंधीत 05 संस्थांना रूपये 72,000/- प्रमाणे रूपये 3,60,000/- वितरीत केलेले आहे.

6) सदर महिला समुपदेशन केंद्रे सुरू करणेबाबतचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास विभाग), जिल्हा परिषद भंडारा यांचे आदेश क्रमांक 62, दिनांक 20/03/2012 आणि समआदेश क्रमांक 156, दिनांक 19/07/2013 मध्ये सदर संस्थांचे निवडीचे मुदत नमुद केलेली नाही. तसेच सदर संस्थां कार्यक्षमरित्या कार्यरत असलेबाबत वार्षिक आढावा घेतलेला नाही. त्यामूळे अकार्यक्षम संस्थांना सुध्दा निधी वितरीत होवून निष्फळ आवर्ती खर्च होत असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

7) महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांचे पत्र क्रमांक ममआ-2016/प्रोसया/का-03/1296, दिनांक 01/09/2016 नुसार सदर महिला समुपदेशन केंद्र चालविणाऱ्या संस्थांचा कार्य अहवाल प्राप्त करून दर तीन महिण्यांनी महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांना सादर केल्याचे संचिकेत दिसून आले नाही.

8) महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा परिषद भंडारा यांचे प्रशासकीय आदेश क्रमांक भंजिप/मवबावि/डे-4/1376, दिनांक 15/11/2016 मधील अट क्रमांक 04 नुसार सदर समुपदेशन केंद्रात आर्थिक गैरव्यवहार न झालेबाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र संचिकेत दिसून आले नाही.

9) समुपदेशन केंद्र चालविणा-या संस्थांचा सनदी लेखापालाने केलेले लेखापरीक्षणाचे अहवाल प्राप्त केलेले नाही.

10) महिला समुपदेशन केंद्राकरीता निवड केलेल्या संस्था स्थानिक पातळीवर कार्यरत असल्याचे दिसून येत नाही. करीता परीणामकारक तत्पर सेवा देत असलेबाबत लेखापरीक्षणास खात्री पटत नाही.

11) महिला समुपदेशन केंद्र निवडीकरीता गठीत समितीचे सभा दिनांक 31/12/2011 चे कार्यवृत नुसार तालूका लाखनी करीता रसिका बहुद्देशिय शिक्षण संस्था, सावरीखूट, गडेगाव यांची निवड केलेली असून उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास विभाग), जिल्हा परिषद भंडारा यांनी आदेश क्रमांक 62, दिनांक 20/03/2012 नुसार केंद्र सुरू करनेबाबत आदेशित केलेले आहे. परंतू रसिका बहुद्देशिय शिक्षण संस्था, सावरीखूट सदर महिला समुपदेशन केंद्र चालविण्यास इच्छूक नसलेबाबतचे पत्र प्राप्त न करता पत्र क्रमांक 156, दिनांक 19/07/2013 नुसार लाखनी तालूक्याकरीता तेजस्वीनी बहुद्देशिय सेवाभावी विकास संस्था, नागपूर या संस्थेची निवड केलेली आहे.

12) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालविकास विभाग), जिल्हा परिषद भंडारा यांनी आदेश क्रमांक 156, दिनांक 19/07/2013 नुसार लाखनी व साकोली तालूक्याकरीता महिला समुपदेशन केंद्र चालविण्यासाठी संस्थांची निवड केली असून सदर निवड करनेसाठी वृत्तपत्रात जाहिरात दिलेली नाही

13) महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा परिषद भंडारा यांनी पत्र क्रमांक 982, दिनांक 12/01/2017 नुसार प्रकल्प स्तरांवरील तालूका समुपदेशन केंद्रांना वितरीत निधीचे उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही

**3.919 TSP व OTSP योजने अंतर्गत 90 टक्के सुटीवर आदिवासी क्षेत्रातील अनुसुचीत जमाती व बाहय क्षेत्र उपयोजना अंतर्गत अनुसुचित जमातीच्या मुलींना कापड शिलाई मशिन पुरवठा करणे बाबत**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** TSP व OTSP योजने अंतर्गत 90 टक्के सुटीवर आदिवासी क्षेत्रातील अनुसुचीत जमाती व बाहय क्षेत्र उपयोजना अंतर्गत अनुसुचित जमातीच्या मुलींना कापड शिलाई मशिन पुरवठा करणेकरिता दोन प्रमाणकांन्वये रक्कम रुपये 19,34,101/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेश क्रमांक 767/2016, दिनांक 26/07/2016 च्या अटी नुसार अट क्रमांक 11 अन्वये शासन नियमानुसार सेल टॅक्स / वॅट कपात करणे आवश्यक आहे. पंरतु, सदर प्रमाणकाची तपासणी केली असता सेलटॅक्स कपात करण्यात आलेली नाही.

2) जावक क्रमांक सआस/कगो/अजाऊओ/1266/2015-2016, कार्यालय सहायक समाज कल्याण विभाग, गोंदिया दिनांक 23/07/2015 संदर्भ क्रमांक विघयो/2014/प्र.क्र.60/विघयो/समाजिक न्याय विभाग, स. वि. विस्तार मुंबई दिनांक 12/03/2015 अन्व्ये नियतव्यय पुर्णता 100 टक्के मार्च 2016 अखेर खर्च करण्याविषयी आतापासुनच नियोजनबध्द प्रयत्न करावे असे पत्र असतांना सदर विभागाने कोणत्याच प्रकारची कार्यवाही न करता 2015-16 या वर्षी अनुदान खर्च न करता सन 2016-17 या वर्षी खर्च केलेला आहे.

3) साहित्य खरेदी करण्याकरीता ई-निविदा क्रमांक 95/653 -2, दिनांक 12/02/2016 प्रमाणे साहित्य खरेदी करण्यात आलेले आहे. परंतु अर्ध समास पत्र क्रमांक 3, दिनांक 16/11/2017 ला देवून लेखापरीक्षणास ई-निविदा दाखविण्यात आलेली नाही.

4) नियमाप्रमाणे 10 टक्के लाभार्थी हिस्सा ओटीएसपी योजने अंतर्गत रक्कम रुपये 20,719/- व टीएसपी योजने अंतर्गत रक्कम रुपये 1,97,505/- साहित्य वाटप करण्याच्या अगोदर या कार्यालयास जमा करणे आवश्यक होते. परंतु या संबधी अर्धसमास पत्र क्रमांक 3, दिनांक 16/11/2017 ला देवून सुध्दा लाभार्थी हिस्सा रक्कम जमा करण्यात आलेबाबत लेखापरिक्षणाची खात्री करुन देणेत आली नाही.

5) ज्या लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे त्यांचे या कार्यालयात अर्ज व लाभार्थी निवड यादी अर्धसमास पत्र क्रमांक 3, दिनांक 16/11/2017 ला देवून सुध्दा लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

6) साहित्य चाचणी अहवाल अर्धसमास पत्र क्रमांक 3, दिनांक 16/11/2017 ला देवून सुध्दा लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही.

**3.920 विशेष घटक आणी TSP व OTSP योजने अंतर्गत सौंदर्य प्रसाधनाचे प्रशिक्षण देणे बाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4 व 5) -** ग्रामिण भागातील अनुसुचित जातीच्या महिलांना / मुलींना 90 टक्के अनुदानावर सौंदर्य प्रसाधनाचे प्रशिक्षण देणेकरिता रक्कम रुपये 3,36,960/- व रुपये 17,72,550/- एकूण रुपये 21,09,510/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हिओसी 2012/365/प्रक्र.169/ व्यशी 4, दिनांक 19/03/2016 अन्वये सदर प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतल्याशबाबत प्रवेशपत्र या कार्यालयास सादर केल्यानंतर सदर संस्थेला प्रती लाभार्थी जे शुल्क मंजुर करण्यात आलेले आहे, त्याची निम्मी रक्कम देण्यात येईल व उर्वरित रक्कम लाभार्थ्यांच्या सौदर्य प्रसाधन परिक्षेचे निकाल प्राप्त झाल्यानंतर देण्यात येईल. परंतु, सदर विभागाने त्या प्रमाणे कार्यवाही न करता वरिल प्रमाणकाव्दारे 90 टक्के रक्कम प्रदान केलेली आहे. हे नियमबाह्य आहे.

2) जावक क्रमांक सआस/कगो/अजाऊओ/1266/2015-2016, कार्यालय सहायक समाजकल्याण विभाग गोंदिया दिनांक 23/07/2015 संदर्भ क्रमांक विघयो/2014/प्र.क्र.60/विघयो/समाजिक न्याय विभाग, स. वि. विस्तार मुंबई दिनांक 12/03/2015 अन्वये नियतव्यय पुर्णता 100 टक्के मार्च 2016 अखेर खर्च करण्याविषयी आतापासुनच नियोजनबध्द प्रयत्न करावे असे पत्र असतांना सदर विभागाने कोणत्याच प्रकारची कार्यवाही न करता सन 2015-16 या वर्षी अनुदान खर्च न करता सन 2016-17 या वर्षी खर्च केलेला आहे.

3) ज्या लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे त्यांचे या कार्यालयात अर्ज व लाभार्थी निवड यादी अर्धसमास पत्र क्रमांक 3, दिनांक 16/11/2017 ला देवून सुध्दा लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

4) लाभार्थ्यांना प्रशिक्षण कालावधी 6 महिने असतांना त्यांना प्रशिक्षण पुर्ण केले किंवा नाही याची कोणत्याच प्रकारची प्रमाणपत्र लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही.

5) लाभार्थ्यांनी प्रशिक्षण पुर्ण केलेला असेल तर त्यांना रक्कम रुपये 3,510/- प्रमाणे प्रदान करावयाची होती. परंतु प्रमाणकासोबत कोणत्याच प्रकारचे प्रमाणपत्र नाही. लाभार्थींनी प्रशिक्षणासाठी प्रवेश दिनांक 21/03/2017 ला घेतलेला आहे. मात्र त्यांना निम्मी रक्कम रुपये 1,950/- प्रदान न करता दिनांक 31/03/2017 ला एकमुस्त रक्कम रुपये 3,510/- प्रमाणे प्रदान करण्यात आलेली आहे.

6) नियमाप्रमाणे 10 टक्के लाभार्थी हिस्सा प्रशिक्षण देण्याच्या अगोदर या कार्यालयास जमा करणे आवश्यक होते. परंतु या संबधी अर्धसमास पत्र क्रमांक 3, दिनांक 16/11/2017 ला देवून सुध्दा लाभार्थी हिस्सा रक्कम जमा झालेबाबत लेखापरिक्षणाची खात्री करुन देणेत आली नाही.

**3.921 इयत्ता 5 ते 12 मध्ये शिकणा-या सर्वसाधारण गटातील मुलींना सायकल पुरवठा करणे बाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** इयत्ता 5 ते 12 मध्ये शिकणा-या सर्वसाधारण गटातील मुलींना सायकल पुरवठा करणेकरिता रक्कम रुपये 5,81,350/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमाक झेडपीए-2008/प्रक्र. 446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये वैयक्तीक लाभाच्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सुचना केलेल्या आहेत व परिशिष्ट-ई प्रमाणे योजना अमलबजावणीचे वेळापत्रक नमुद करण्यात आले आहे. परंतु, त्यानुसार सदर विभागानी योजनेच्या उदिष्ट पुर्तीसाठी योग्य नियोजन केलेले नाही. त्यामुळे आर्थिक वर्षात लाभार्थींना साहित्य प्राप्त झाले नाही व योजनेचे उदिष्ट साध्य झालेले नाही.

2) लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

3) लाभार्थीकडुन व प्रकल्पांकडुन उपयोगीता प्रमाणपत्र ठेवलेले नाही.

4) लाभार्थी अर्ज लेखापरिक्षणांस सादर केले नाही.

5) लाभार्थी निवड मंजुर यादी सादर केले नाही.

6) 3 टक्के अंपग निधी रुपये 18,000/- खर्च करण्यात आला नाही.

7) साहित्य दर्जेदार असलेबाबत चाचणी अहवाल नाही.

8) पुरवठादारासोबत केलेला कराारनामा सादर करण्यात आला नाही.

**3.922 90 टक्के अनुदानावर पिको फॉल शिलाई मशीन खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** प्रमाणक क्रमांक 532 दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रूपये 9,89,010/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण/2010/275/प्र.क्र.172/पंरा-7, दिनांक 19/10/2011 मधील 10 नुसार पुरवठादाराकडून पतदारी प्रमाणपत्र घेतलेले नाही

2) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 7 नुसार साहित्याचे कंपनी वॉरंटी कार्ड साहित्यासोबत जोडणे आवश्यक असतांना वॉरंटी कार्ड जोडल्याची खात्री होत नाही. तसेच रूपये 33,000/- राष्ट्रीयकृत बँकेची गॅरेंटी घेण्यात आल्याचे दिसत नाही.

3) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे एकत्रीत पुरवठा आदेश क्रमांक 26/8.1.2015 अट क्रमांक 5 नुसार बीलावर साहीत्याची मुळ किंमत व विक्रीकर दर्शवीणे आवश्यक आहे. परंतू, मे.वर्धमान चंद्रपूर यांनी दिलेले बिल त्याप्रमाणे नसताना मंजुर केलेले आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परीपत्रक क्रमांक झेडपीए/1084/सी.आर., दिनांक 19/01/1995 नुसार साहीत्य खरेदीपुर्वी 10 टक्के लाभार्थी हीस्सा प्राप्त केलेला नाही.

5) विहीत कालावधीत प्रत्येक पंचायत समितीनिहाय साहित्य प्राप्त झाल्याबाबत पंचायत समितीचे साठापुस्तक लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. तसेच उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/109/1239, दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थ्यांची माष्टर नोंदवही ठेवली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्याला दुबार लाभ दिल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**3.923 5 ते 12 मध्ये शिकणा-या मुलींना सायकल पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदर बाबत रक्कम रूपये 19,95,213/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेशातील अटी व शर्ती मधील अट क्रमांक 4 प्रमाणे सदर साहित्यांचा पुरवठा 6 आठवडयामध्ये करणे आवश्यक आहे. असे न केल्यास प्रति आठवडा रुपये 0.5 टक्के प्रमाणे दंड-विलंब शुल्क आकारण्यात येईल. सदर साहित्य विलंबाने प्राप्त झाल्यामुळे अट क्रमांक 4 प्रमाणे 11 आठवडे उशीराकरीता विलंब शुल्काची परिगणना करुन रक्कम पुरवठादाराचे देयकातुन वसुल करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) 411 नग लेडिज सायकल हया दिनांक 31/3/2017 ला प्राप्त झाल्याची नोंद विभागातील साठा नोंदवहीतील पृष्ठ क्रमांक 73 व 74 वर नमुद आहे. असे असतांना बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी माहे जानेवारी-2017 मधील दिनांकाच्या स्वाक्ष-या केलेल्या आहेत.

3) महाराष्ट् शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासण निर्णय क्रमांक मागास 1098/प्र.क्र.78/34/ दिनांक 20/10/1999 नुसार महिला व बालकल्याण विभागाने लाभार्थी साहित्य वाटप मास्टर नोंदवही ठेवली नसल्याने लाभार्थ्यास दुबार लाभ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) सक्षम अधिका-यांचे विनियोग दाखले दप्तरी उपलब्ध नसुन लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

5) महाराष्ट् शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीऐ-1006/1207/प्र.क्र.08(पंरास-1), दिनांक 29/06/2006 नुसार शाळेला जाणेसाठी एस.टी. बसची सुविधा नसल्याचे व्यवस्थापक यांचे पत्र नस्तीला उपलब्ध नसुन लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

6) महाराष्ट् शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-1093/प्र.क्र.1239/34 दिनांक 01/09/1993 मधील परि.क्र. 4 प्रमाणे सदर योजनेचा फलश्रुती अहवाल सादर करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

**3.924 ग्रामीण भागातील महिलांकरीता सौर कंदिल पुरविणेबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 12) -** प्रमाणक क्रमांक 879 दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रूपये 4,94,816 /- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेशातील अटी व शर्ती मधील अट क्रमांक 7 प्रमाणे सदर साहित्यांचा पुरवठा 6 आडवठयामध्ये करणे आवश्यक आहे. सदर साहित्य विलंबाने प्राप्त झाल्यामुळे अट क्रमांक 8 प्रमाणे 11 आठवडे उशीराकरीता विलंब शुल्काची परिगणना करुन रक्कम पुरवठादाराचे देयकातुन वसुल करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) अट क्रमांक 12 प्रमाणे बालविकास प्रकल्प अधिकारी - सर्व यांचे स्वाक्षरी, शिक्का व दिनांकासह पोच पावती या कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक असतांना देयकासोबत व नस्तीमधील पोच पावतीवर एकाही बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी दिनांकित स्वाक्षरी केली नाही. त्यामुळे त्यांना प्रत्यक्षात कोणत्या दिनांकास सदर साहित्य प्राप्त झाले? याबाबतची तपासणी करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासण निर्णय क्रमांक मागास 1098/प्र.क्र.78/34/ दिनांक 20/10/1999 नुसार महिला व बालकल्याण विभागाने लाभार्थी साहित्य वाटप मास्टर नोंदवही ठेवली नसल्याने लाभार्थ्यास दुबार लाभ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) सक्षम अधिका-यांचे विनियोग दाखले दप्तरी उपलब्ध नसुन लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-1093/प्र.क्र.1239/34 दिनांक 01/09/1993 मधील परि.क्र. 4 प्रमाणे सदर योजनेचा फलश्रुती अहवाल सादर करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आली नाही.

**3.925 अनुसुचित जातीचा वर्ग 7 ते 12 पास महिला व मुलींना संगणक प्रशिक्षण देणे.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** अनुसूचीत जाती जमातीच्या मुलींना MS-CIT चे प्रशिक्षण देणे या योजनेसाठी विभागाअंतर्गत सन 2015-2016 पैकी अखर्चीत रक्कम 0.50 (पन्नास हजार) व 2016-2017 ची रक्कम रुपये 4.50 अशी एकूण 5.00 लक्ष तरतुद मधून सन 2016-2017 मध्ये एकूण 142 लाभार्थींना रूपये 3,500/- प्रमाणे रक्कम रुपये 4,97,000/- MS-CIT चे प्रशिक्षण योजना राबिविण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र. 446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविणेबाबतचे नियोजन, अंमलबजावणी विशिष्ट मुदतीत करणेस्तव वेळापत्रकाप्रमाणे पालन केल्याचे दिसून येत नाही.

2) प्रमाणक क्रमांक 2994 दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 4,09,500/- वित्त विभागाकडून देयक पारित करुन सदर रक्कम पुरवठादाराला अदा न करता शासकीय लेख्यातून काढून जिल्हा निधी XI संकिर्ण इतर जमा या शिर्षाखाली जिल्हा परिषद खाते क्रमांक 1 ला चलन क्रमांक 249 दिनांक 05/10/2017 ला जमा केलेली आहे. सन 2015-2016 ची अखर्चीत रक्कम रुपये 50,000/- खर्च करण्याची मुदत 31/03/2017 अखेर संपत असल्यामुळे अनुदान व्यपगत होऊ नये, म्हणून रक्कम काढून XI संकिर्णला जमा केल्याचे दिसून येते. सन 2016-2017 चे लेखापरिक्षण चालू दिनांक 16/11/2017 पर्यंत तरी सदर रक्कम पुरवठादार संस्थेला अदा केलेली नाही. नियम 218 नुसार महसुली शिर्षाखालील रक्कम ठेव या शिर्षाखाली जमा दाखवू नये, अशी तरतुद आहे. परंतू, त्याचे पालन झालेले नाही. त्यामुळे खर्चाची तात्काळ आवश्यकता नसतांना अनुदान व्यपगत होऊ नये, म्हणून रक्कम XI संकिर्ण जमा केल्याची कृती नियमबाह्य ठरते.

3) सन 2016-2017 मध्ये विशेष घटक योजना अंतर्गत इयत्ता 7 वी ते 12 पर्यंत मुली व महिलांना संगणक प्रशिक्षण देणे या योजना राबविणेस महिला व बाल कल्याण समिती सभा दिनांक 23/05/2016 ठराव क्रमांक 3 अन्वये मंजूरी घेतलेली आहे. ठराव क्रमांक 3/4 दिनांक 16/11/2016 अन्वये 77 लाभार्थी निवडीला मंजूरी दिलेली आहे. परंतू, वाढीव 142 लाभार्थींना मान्यता घेतल्याचे आढळून आले नाही. प्रस्तावासोबत योजनेच्या अटी शर्ती नुसार आवश्यक दस्तऐवज नाही. प्रस्ताव ज्या क्रमाने प्राप्त झाले, त्याची नोंदवही नाही. एकत्रीत मंजूरी यादीला मंजूरी घेतल्याचे आढळून आले नाही. तरी नोंदवही ठेऊन एकत्रित लाभार्थी यादीस मंजूरी घेणे अपेक्षीत आहे.

4) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे आदेश क्रमांक जिपग/मवबाक/योजना/30/2017, दिनांक 10/01/2017 अन्वये प्रकल्प अंतर्गत एकूण 142 अनुसुचित जातीच्या (महिला व मुलींना) लाभार्थींना MS-CIT चे प्रशिक्षण देणेस्तव श्री साई कॉम्प्युटर इंस्टिट्युट चामोर्शी यांना प्रशिक्षण देणेस्तव कळविले आहे. अट क्रमांक 6 नुसार प्रशिक्षण सुरु झाल्यानंतर प्रशिक्षण घेणारे लाभार्थीचे रुजू अहवाल सादर करणेबाबत सूचना आहे. संस्थेकडून अहवाल सादर केल्याचे आढळून आले नाही. परंतू, Bill No. 4 दिनांक 29/03/2017 अन्वये 117 प्रशिक्षणार्थीचे रक्कम रूपये 4,09,500/- देयक सादर केलेले आहे. सदर देयक पारित करून रक्कम काढलेली आहे. संस्थेकडून प्राप्त हजेरी रजिस्टर नुसार प्रशिक्षण पूर्ण झालेले लाभार्थी 88 आहे. 29 प्रशिक्षणार्थीचे रक्कम रुपये 1,01,500/- वसूल करावी.

5) प्रशिक्षण पूर्ण केलेले परंतू, परिक्षेला गैरहजर 6 लाभार्थीवरील प्रशिक्षणाची 3,500/- प्रति लाभार्थी रक्कम रुपये 21,000/- योजनेचा उद्देश सफल न झाल्यामुळे व्यर्थ झालेली आहे.

योजनेचा उद्देश व स्वरुपानुसार विशेष घटक योजने अंतर्गत इयत्ता 7 ते 12 पास मुली व महिलांना संगणक प्रशिक्षण देणे आहे. परंतू, लाभार्थी निवडी मध्ये प्रशिक्षण दिलेल्या (मुली/महिला) लाभार्थी B.A. पास असल्याचे आढळून आहे. (उदा. प्रकल्प चामोर्शी अंतर्गत पल्लवी सिताराम खोब्रागडे भिकाशी, तृप्ती रेकचंद दुर्गे हळदलमाल, पल्लवी डोमाजी वाडके रा. आमगांव, विशाखा शिवराम झाडे, शमा शिवराम झाडे रा. वायगांव) इतर प्रकल्पात सुद्धा असे लाभार्थी असावेत. परंतू, त्यांचे नावासमोर शिक्षण नमूद केलेले नाही. योजनेच्या उद्देशानुसार व स्वरुपानुसार कार्यवाही केलेली नाही. करीता 3,500 x 5 = 17,500/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

### 3.926 अनुसुचित जातीच्या मुलींना शिवणकामाचे प्रशिक्षण देणेमधील अनियमितता

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत प्रमाणक क्रमांक 2993 दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रूपये 1,74,600/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र. 446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविणेबाबतचे नियोजन, अंमलबजावणी विशिष्ट मुदतीत करणेस्तव वेळापत्रकाप्रमाणे पालन केल्याचे दिसून येत नाही. तसेच संस्थेने प्रशिक्षण कधी पूर्ण करावे? याबाबत आदेश कालावधी नमुद नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 27, 29(4) व 218 नुसार तात्काळ अदायगीची गरज असल्याशिवाय रक्कम काढू नये. नियम 29(4) नुसार चेक व्यक्तिच्या नावे न काढता संस्थेच्या नावे काढावे व नियम 218 नुसार अनुदान व्यपगत होऊ नये, म्हणून महसुली शिर्षाखाली रक्कम काढून ठेव या शिर्षाखाली जमा दाखवू नये, अशी तरतुद आहे. परंतू, विभागाने प्रमाणक क्रमांक 2993 दिनांक 31/03/2017 रक्कम रुपये 1,74,600/- चे देयक संस्थेच्या नावे न काढता स्वत:चे नावे काढून सदर रक्कम चालान क्रमांक 251 दिनांक 05/10/2017 अन्वये जिल्हा निधी XI-संकिर्ण इतर जमा या ठेवी शिर्षाखाली जमा केलेली आहे. सन 2015-2016 ची अखर्चीत रक्कम खर्च करण्याची मुदत 31/03/2017 होती. त्यामुळे रक्कम काढून ठेवी अंतर्गत जमा करणे ही केलेली कृती नियमबाह्य ठरते.

3) सदर योजना 90 टक्के अनुदान (4365 x 45) = 1,96,425/- व 10टक्के लाभार्थी हिस्सा (485 x 45) = 21,825/- अशी एकूण रक्कम रुपये 2,18,250/- ची योजना आहे. योजनेच्या संपूर्ण् रक्कम रुपये 2,18,250/- ला प्रशासकीय मंजूरी तांत्रिक मंजूरी घेतल्याचे आढळून आले नाही. लाभार्थी हिस्सा (लोकवाटा) रक्कम जमा केल्याचे आढळून आले नाही.

4) सन 2016-2017 मध्ये विशेष घटक योजना अंतर्गत अनुसुचित जातीच्या मुलींना शिवणकामाचे प्रशिक्षण देणे या योजनेला महिला व बाल कल्याण समिती सभा दिनांक 28/12/2015 ठराव क्रमांक 3 अन्वये योजना राबविण्यास सभा दिनांक 16/11/2016 ठराव क्रमांक 3/1 अन्वये लाभार्थी यादी (प्रकल्प अहेरी 45) प्रशिक्षणार्थी एकाच प्रकल्पातील लाभार्थीला मंजूरी प्रदान केलेली आहे. त्यानंतर बदल करुन प्रकल्प चामोर्शी - 5, मुलचेरा -12 लाभार्थी (पत्र क्रमांक 77 दिनांक 04/01/2017), अहेरी -28 असे 45 लाभार्थी आहे. बदल झालेल्या यादीला समितीची मंजूरी घेतल्याचे आढळून आले नाही. प्रकल्पाकडून ज्या क्रमाने लाभार्थीचे प्रस्ताव प्राप्त होतात, त्या क्रमाने रजिष्टर मधे नोंद करुन एकत्रित यादीला मंजूरी घेणे अपेक्षीत आहे. परंतू, तसे केल्याचे आढळून आले नाही.

5) विशेष घटक योजना सन 2016-2017 मध्ये प्रकल्प मुलचेरा अंतर्गत 12 प्रशिक्षणार्थींनी दिनांक 29/01/2017 ते 31/03/2017 व प्रकल्प अहेरी अंतर्गत 28 प्रशिक्षणार्थींनी दिनांक 28/01/2017 ते 31/03/2017 या कालावधीत प्रशिक्षण पूर्ण केले आहे, असे संस्थेने सादर केलेले हजेरी पत्रकावरून दिसून येते. पास विद्यार्थीनींच्या प्रमाणपत्राची तपासणी केली असता प्रमाणपत्रात नमूद कालावधी (दिनांक 20/03/2017 ते 20/06/2017, 18/03/2017 ते 18/06/2017 व 24/04/2017 ते 24/07/2017) व संस्थेने सादर केलेले हजेरी पत्रकातील प्रशिक्षण कालावधीत तफावत दिसुन येते. तरी संयुक्तिक खुलाशासह अनुपालन सादर करावे.

**3.927 हस्तातंरण योजना अंतर्गत योजना अंतर्गत 07 वी ते 12 वी पास मुलींना संगणक प्रशीक्षण खर्चातील अनियमितता बाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** हस्तातंरण योजना अंतर्गत योजना अंतर्गत 07 वी ते 12 वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण खर्चावर रक्कम रूपये 1,37,375/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रकल्प अधिकारी, औरंगाबाद, पैठण, सिल्लोड, कन्नड, वैजापुर, फुलंब्री, गंगापुर, सोयगांव व खुलताबाद यांचे फी भरल्याची पावती/अभीलेखे, उपस्थिती पट व एमएससी आयटी पास झालेचे प्रमाणपत्र लेखापरीक्षणास दर्शविली नसल्यामुळे सदर योजना राबविल्याची खात्री पटत नाही.

2) एमएससीआयटी हा अभ्यासक्रम उच्च व तंत्रशिक्षण खात्याचा अखत्यारित आहे. एमएससीआयटीची जिल्हयामध्ये 231 अधिकृत प्रशिक्षण केंद्रे आहेत. तसेच महाराष्ट्रातही अनेक अधिकृत केंद्र असतांना विभागाने 02 जानेवारी 1992 व 11 10.2011 अन्वये इ-निविदा प्रक्रीया किंवा निविदा प्रक्रीया का अवलंबली नाही याचा खुलासा करावा.

3) औरंगाबाद जिल्हयात एकुण 231 अधिकृत केंद्रे असतांना सुयश कॉम्पयुटर इनिस्यटुट ॲण्ड औरंगाबाद यांनाच संपुर्ण प्रशिक्षणाचे काम का सोपविण्यात आले याचा कारणासह खुलासा करावा

4) एकुण 157 लाभार्थीपैकी 3 टक्के अपंग मुली व महिलांना याचा लाभ मिळाले नसल्याचे दिसुन येते.याचा खुलासा करावा.

5) 1. सुयश कॉम्पयुटर इनिस्यट्‌ट अॅण्ड औरंगाबाद 2. प्रतिक कॉम्पयुटर औरंगाबाद यांनी प्रशिक्षण दिलेल्या 157 पैकी किती मुली पास व नापास झाल्या. गैरहजर मुली किती होत्या याची यादी दिलेली नसल्याने प्रशिक्षण व्यवस्थित झालेची खात्री करता आली नाही.

6) प्रशिक्षण कालावधीत योग्य प्रकारे प्रशिक्षण कार्यक्रम सुरु असले बाबत बाल विकास प्रकल्प अधिकारी एकात्मिक सेवा योजन व गट विकास अधिकारी यांनी भेट देवुन उपस्थिती संस्थामध्ये हजर असलेल्या मुली व गैरहजर असलेल्या मुली संख्या दर्शविली नसल्याने खात्री करता आली नाही..

7) लाभार्थीची निवडीची मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. अशी नोंदवही ठेवली नसल्याने एकाच लाभार्थ्याने दुबार लाभ घेतला किंवा कसे याची खात्री होवु शकली नाही

8) महाराष्ट जिल्हा परिषद व पंचायत समीती लेखा सहिंता 1968 चे नियम 79 अन्वये देयक प्रदानानंतर विरुपीत करणे आवश्यक आहे.

9) एमएससीआयटी प्रशिक्षणसाठी ई-निविदा राबविली असती तर निश्चितपणे स्पर्धात्मक दराचा लाभ होवु शकला असता.

10) सदरील योजनेचा फलश्रुती अहवाल सचिंकेत दिसुन आला नाही.

11) एकुण लाभार्थ्यापैकी एकुण नापास झालेल्या मुलीची पुन्हा परिक्षा घेवुन उत्तीर्ण करुन घेतले किंवा कसे याची माहिती सचिंकेत नसल्याने खात्री करता आली नाही.

12) एकुण 157 पैकी 152 मुलींना प्रशिक्षण दिले उर्वरीत 5 मुलींचे रुपये 3,500/- प्रमाणे 17,500/- वसुल करुन अनुपालन अहवाल सादर करावे.

**3.928 जिल्हा परिषद उपकरतून अंगणवाडीना विविध साहित्य पुरविणे योजनेतंर्गत विविध साहित्य खरेदीमधील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** महिला व बालकल्याण विभाग जिल्हा परिषद जालना यांनी सन 2016-2017 या वित्तीय वर्षात अंगणवाडीना विविध साहित्य खरेदिकरीता रक्कम रूपये 49,98,400/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 30/10/2015 मधील क्रमांक 4:4:2 मधील अट क्रमांक 3 नूसार खुल्या निविदेतील अंदाजीत खर्च रूपये 25 लक्ष ते 5 कोटीपर्यंतची खरेदीची जाहिरात एका प्रमुख विभागीय स्तरावरील वर्तमानपत्रात आणि एका राज्यस्तरीय वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात शासन निर्णयानूसार कार्यवाही केल्याचे संचिकेवरुन दिसून येत नाही.

2) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 मधील अनुक्रमांक 13 नूसार एकात्मिक बालविकास सेवा योजनेखालील अंगणवाडयांना एकात्मिक बालविकास सेवेकडून विविध साहित्य पुरविण्यात येते मात्र हे साहित्य अपुरे पडते त्यामुळे या अंगणवाडीतील मिनी अंगणवाडीतील बालकांच्या संर्वागीण विकासासाठी साहित्याची आवश्यकता असल्यास यावरील खर्च जिल्हा परिषदेने अथवा शासन निधीतून असे नमूद आहे. मात्र उपरोक्त प्रकरणात खरेदी केलेल्या 1) खेळणी साहित्य रॉंकीग हिप्पो 2) व्हाईट प्लेबोर्ड पेनसह 3) वजनकाटे इत्यादीबाबत खरोखरीच आवश्यकता असल्याबाबत अथवा जिल्हयातील अंगणवाडीकडून तशी मागणी केल्याचे संदर्भिय पत्रे अभिलेखे संचिकेत दिसून आले नाहीत.

3) उपरोक्त तीनही साहित्य खरेदीसाठी प्रसिध्द केलेल्या निविदा सुचना -1, 2, 3 व ई- निविदेनूसार पुरवठादाराचे 1) पॅनकार्ड 2) शॉप अॅक्ट नोंदणी 3) साहित्य मशीनरी उपलब्धबाबत माहिती 4) निविदा फी व बचाना

5) दिनांक 31/03/2016 पर्यंत मुल्यवर्धीत कर वॅट भरलेले चलन 6) आयकर रिटर्न 7) ISO प्रमाणपत्र 8) व्यवसायकर भरल्याचे अद्यावत चलन इत्यादी बाबी वरीलप्रमाणे तीनही साहित्य पुरवठादाराकडे निविदेसोबत सादर

करणे आवश्यक आहे. परंतू, याबाबत संचिकेमध्ये वरीलप्रमाणे सर्व पुरवठादाराची पूर्ण कागदपत्रे दिसून आली नाहीत त्यामूळे तुलनात्मक तक्ता तयार करतांना या बाबींकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते

4) व्हाईट प्ले बोर्ड खेळणी मे. स्वामी उदयोग, जालना या पुरवठादाराचे दर सर्वात कमी असल्यामूळे त्यांना पुरवठा आदेश देण्यात आले. ई-निविदा प्रक्रीया दरम्यान पुरवठादाराने रूपये 55,000/- बयाना रक्कम जमा केली व उर्वरीत रक्कम रूपये 10,988/- चा डी डी क्र. 034252 दिनांक 17/10/2016 सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा डी डी सुरक्षा अनामत जमा करुन घेणेबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांना पत्रासोबत डी डी जोडून दिला. परंतू, सदर डी डी जिल्हा परिषदेच्या संबंधित खात्यात जमा न करता संचिकेमध्ये अद्यापपर्यंत तसाच जोडून ठेवलेला आहे. त्यामूळे जिल्हा परिषदेचे रक्कम रूपये 10,988/- चे व्याजाचे नुकसान झालेले आहे. याबाबत संबंधिताची जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसूल करावी.

5) सदर प्रकरणात रॉकींग हिप्पो खेळणीसाठी व व्हाईट प्ले खेळणीसाठी प्रत्येकी रूपये 1,300/- चा मद्रांक करणे आवश्यक असतांना रूपये 100/- चा केला. म्हणजे दोन्ही मिळून रूपये 2,400/- चे शासनाचे महसूली नुकसान झाले आहे. याबाबत संबंधिताची जबाबदारी निश्चित करुन रूपये 2,400/- शासनखाती भरणा करुन अनूपालन दर्शवावे.

6) रॉकीग हिप्पो खेळणीसाठी व वजनकाटे खरेदीसाठी केलेल्या कार्य करारावर दोन साक्षीदारांची तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांची सही केलेली नाही व व्हाईट प्ले बोर्ड खेळणी खरेदीसाठीचा मुद्रांक कोरा आहे. त्यामुळे करारनामा अधिकृत होत नाही. सबब अधिकृत करारनामा न करताच खरेदी आदेश दिल्याचे दिसून येते. याबाबत संबंधिताची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

7) उपरोक्त तीनही साहित्याबाबत बालविकास प्रकल्प अधिकारी यांची साहित्य प्राप्त झाल्याची स्वाक्षरी देयकासोबत जोडलेली आहे. परंतू, दिनांक नमूद केलेला नाही. त्यामुळे साहित्य वेळेत पोहच झाल्याची खात्री करता आलेली नाही.

8) उपरोक्तप्रमाणे तीनही प्रकारचे साहित्य कोणकोणत्या अंगणवाडयांना वाटप करण्यात आले. याबाबत गटस्तरावरील प्रकल्पाची साठा नोंदवही लेखापरिक्षणात उपलब्ध न झाल्यामूळे साहित्य प्राप्त व विनियोगाबाबत खात्री पटत नाही.

9) वजन काटे खरेदी करण्यात आलेले पुरवठादार श्री. निलप्रभा आर्टस, गणेशनगर कळवण, नाशिक यांचे लेटरपॅडवर दिलेल्या मशीनरीच्या यादीवर वजनकाटे मशीनचा उल्लेख नाही व संबंधित तीनही साहित्याचे पुरवठादार अधिकृत विक्रेते नसल्याचे दिसून येत.

**3.929 जिल्हा उपकरातून 7 वी ते 12 वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण देणेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** 7 वी ते 12 वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण देणेबाबत रक्कम रूपये 39,98,826/- खर्च नोंदवण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2016-2017 या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षणास उपरोक्तप्रमाणे केलेल्या खर्चाची संचिकेचे अवलोकन केले असता सन 2015-2016 मुळ अंदाजपत्रकान्वये 7 वी ते 12 वी पास मुलींना संगणक प्रशिक्षण देणे योजनेस रूपये 23 लक्ष तरतूद प्राप्त होती. सुधारीत अंदाजपत्रकान्वये योजनेस रूपये 27 लक्ष तरतूद प्राप्त झाली होती. महिला बालकल्याण विषय समिती दिनांक 03/02/2016 रोजीच्या विषय समिती बैठकीचे इतिवृत्तांत वि क्र (2) ठराव क्रमांक 66 व जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक 04/03/2016 आयत्या वेळची विषय क्रमांक 8 महिला व बालकल्याण समिती, जिल्हा परिषद उपकर अंतर्गत योजना निधीचे पुनर्विनियोजन करणेबाबत प्राप्त तरतूद रूपये 27 लक्ष मधून समुपदेशन केंद्राना अर्थसहाय रूपये 10 लक्ष वळवून उर्वरीत 17 लक्ष मुलींना व महिलांना संगणक प्रशिक्षण देणेबाबत असा ठराव पारीत केल्यानूसार इयत्ता 7 वी ते 12 वी महिला व मुलींचा संगणक प्रशिक्षण बाबतचा अर्ज ज्यामध्ये नाव, पास वर्ष, प्रवर्ग, जन्मदिनांक, अर्जदाराचे वय, दारिद्रय रेषेखालील आहे काय, वार्षिक उत्पन्न, इ. महिती, लाभ न मिळाल्याचा दाखला, रहिवाशी प्रमाणपत्र, हमीपत्र इ. संचिकेत आढळून आले नाही. लाभार्थी महिला मुलींची निवड कोठे व कशी करण्यात आली, याबाबत खात्री पटवावी.

2) मागील तीन वर्षाचा संगणक ट्रेनिंग दिलेल्या संस्थेचे अनुभवपत्र, संचिकेत अथवा देयकासोबत जोडलेला नाही.

3) एकूण लाभार्थी संख्या 1,486 पैकी 44 पदविधारक मुली, 4 पदव्युत्तर एम एस सी मुली व 1 डी एड असे एकूण 49 विद्यार्थी हे 7 वी ते 12 शैक्षणिक आर्हता मर्यादेबाहेरील विद्यार्थी आहेत. त्यामुळे रूपये 2,691 X 49 = 1,31,859/- संबंधिताची जबाबदारी निश्चित करुन रक्कम वसूल करण्याची यावी.

4) संचिकेमधील पृष्ठांना क्रमांक दिले आहेत. परंतू, मधली काही पाने संचिकेत दिसून आली नाहीत. उदा. पान क्रमांक 515 ते 552 संचिकेत उपलब्ध नाहीत.

5) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) यांचे कार्यारंभ आदेश क्रमांक 477 दिनांक 02/08/2016 मधील अटी व शर्ती मधील अट क्रमांक 4 नूसार मुद्रांकींत करारनामा करुन द्यावा, असे नमूद असतांना करारनामा करण्यात आलेला नाही. याबाबत जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक एडीआर-2010/(185/10) तांशि-6, दिनांक 16/08/2010 शैक्षणिक वर्ष सन 2010-2011 नविन कला संस्थांना मान्यता व मान्यताप्राप्त कला संस्थामध्ये वाढीव अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे त्यामसोबतचे सहपत्र विवरणपत्र - अ मध्ये संस्थेचे नाव आहे व मंजूर अभ्यासक्रम 1) मुलभूत 2) इंटेरीअल डेकोरेटर हे दोन आहेत व प्रवेश क्षमता प्रत्येकी 15 विद्यार्थी आहेत. असे असतांना 1,486 विद्यार्थ्यांना संस्थेने प्रशिक्षण कसे दिले व संस्थेकडे संगणक प्रशिक्षणाबाबत कोणतीही मान्यता नसतांना संबंधित संस्थेची निवड कशी करण्यात आली, याबाबत चौकशी होणे आवश्यक आहे.

7) लाभार्थीने प्रशिक्षण पूर्ण केले नाही, तर दिलेल्या लाभाची रक्कम पूर्णपणे परत करणेबाबत लाभार्थीकडून रूपये 100/- च्या स्टॅंप पेपरवर हमीपत्र लिहून घेण्यात यावे तसेच हजेरीपट व प्रशिक्षण पूर्ण मोफत मिळावे, हेही नमूद असणे आवश्यक आहे. परंतू, अशी कार्यवाही केलेबाबत संचिकेत कागदपत्रे दिसून आली नाही. त्यामूळे प्रशिक्षण सत्र खरोखरीच राबविलेबाबत अधिकृतता दिसून येत नाही.

8) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) यांचे कार्यारंभ आदेश दिनांक 02/08/2016 अन्वये एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प कार्यालयातील सर्व प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पातंर्गत केद्रांना भेट देवून तसा लेखी अहवाल सादर करण्यात यावा. परंतू, असे अहवाल दिल्याचे संचिकेमध्ये नमूद नाहीत.

9) मास्टर नोंदवही विभागाने ठेवलेली नसल्याने लाभार्थ्यांना दुबार लाभ दिला आहे किंवा कसे, तसेच लाभार्थी शासकीय / निमशासकीय कर्मचारी नसलेबाबत प्रमाणपत्र नाही.

**3.930 जिल्हा परिषद उपकर योजना अंतर्गत अंगणवाडयातील बालकांना, गरोदर माता, स्तनदा मातांना अतिरिक्त अहाराचा “Frutin Syrup” कॅल्शीयम सप्लीमेंट खरेदी खर्चातील अनियमितता बाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** उपकर योजना अंतर्गत अंगणवाडी केद्रातील बालकांना, गरोदर स्तनदा मातांना व कुपोषित मुला/मुलीकरीता “Frutin Syrup” खरेदी केलेली खर्चाचे लेखा परिक्षण केले असता रक्कम रूपये 2,90,990/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद बीड यांनी प्रत्यक्ष” Frutin Syrup” कॅल्शीयम सप्लीमेंट खरेदी करण्यापुर्वी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83 (3) नुसार शासकिय, मेडिकल व रिसर्च सेटर (केद्रीय संशोधन तपासणी प्रयोगशाळा) यांच्याकडुन गुणवत्ता  चाचणी अहवाल प्रमाणपत्र घेतलेले दिसुन आले नाही.

2) महाराष्ट्र शासन वैदकिय व औषधी द्रव्य् विभाग,शासन निर्णय क्रमांकडिपीआर-1088/1515/सीआर/230-एएमडी (अ), दिनांक 31/08/1990 मधील परिच्छेद क्रमांक 32 नुसार दर करारानुसार औषधी खरेदी करतांना 80% रकमा औषधी प्राप्त झाल्यानंतर व उर्वरीत रकमा 20% औषधीची तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर रकमा अदा करणे आवश्यक असतांना महिला व बालकल्याण विभागाने पुर्ण रक्कम औषधी प्राप्त झाल्यानंतर अदा केलेली असुन ही बाब नियमबाहय आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिष्द व पचांयत समीती अधिनियम 1961 चे नियम 146 अन्वये दरपत्रक धारक यांच्याकडुन 100/- रुपये किंमतींचा मुद्रांक/बॉड पेपरवर करारनामा न घेता व त्यावर लिहुन घेणाऱ्या अधिकारी यांनी दोन साक्षीदाराच्या समक्ष सही करणे आवश्यक असतांना मुद्राक कोरे घेवुन अनियमितता केल्याचे निदर्शनासस आले.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 90 नुसार साहित्य प्राप्त झाल्यानंतर साठा नोंदवही नमुना नंबर 32 मध्ये नोंद घेणे बंधणकारक आहे. परंतु वरील प्रकल्प अधिकारी 1 ते 13 यांनी साठा नोंदवहीमध्ये“ Frutin Syrup” कॅल्शीयम सप्लीमेंट ची नोंद घेतल्याची दर्शविले नाही.

5) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्रमांक सीआर 1239 / 34, दिनांक 01/09/1993 नुसार औषधी वाटपाचा सदर योजनेचा फलश्रुती अहवाल संचिकेत दिसुन आला नाही.

6) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जल संधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक-1082/645/366/34, दिनांक 29/07/1989 अन्वये योजनेचे मुल्यांकन करणे आवश्यक आहे. परंतु उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद बीड यांनी अशी कार्यवाही केलेली नाही.

7) “Frutin Syrup” कॅल्शीयम सप्लीमेंट च्या दर्शनी भागात औषधाच्या मध्यभागी हिरव्या पेन ने The Word “FOR USE OF GOVERNMENT OF MAHARASHTRA NOT FOR SALE” असे लिहलेले नसल्याची खात्री करता आली नाही. महिला व बालकल्याण विभागाचे स्टीकर लावले बाबत खात्री करता आली नाही.

8) दरपत्रकधारकचे नाव संचिकेत टिपणीध्ये सिडलर रेमीडेज प्रायव्हेट लिमीटेड, मुंबई आहे. परंतु उप्रपमाणक वर औरंगाबाद आहे. दोन्ही पैकी “Frutin Syrup” कॅल्शीयम सायरप पुरवठा कोणाला दिला होता व पुरवठा कोणी केला या बाबत शंका उपस्थित होते.

9) उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद महिला व बालकल्याण विभागाने तांत्रिक मान्यता व पुरवठा आदेश दिनांक 26/12/2016 रोजी एकाच दिवशी दिल्याचे दिसुन येते.

10) सदरील पुरवठा आदेशावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, बीड यांची सही नाही व पुरवठा आदेशामध्ये व्हाईट प्ले बोर्ड या नावाने आदेश असल्याचे आढळुन आले.

11) पुरवठा आदेशामध्ये किती दिवसांत पुरवठा करावयाचा आहे याचा उल्लेख पुरवठा आदेशात केलेला नाही.

12) विभागाने गुणवत्ता व चाचणी अहवाल संचिकेत उपलब्ध झाले नाहीत.

**3.931 जिल्हा परिषद उपकरातून ग्रामीण भागातील महिलांना शिलाई मशिन खरेदी करून पुरवठा करणे या योजनेतील अनियमिततेबाबत व झालेल्या जादा प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद, परभणीच्या सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात जिल्हा परिषद उपकरातून महिलांना विविध साहित्य पुरविणे या योजने अंतर्गत ग्रामीण भागातील महिलांना शिलाई मशिनचा पुरवठा करणे या बाबीवर विभागाने रक्कम रूपये 24,66,450/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 मधील सूचना क्रमांक 16 अन्वये सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी योग्य लाभार्थी मिळविण्याच्या अनुषंगाने पुरेशी व व्यापक प्रसिद्धी देवून प्रथम अर्ज मागवून त्यातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील पात्र महिलांना या योजनेचा प्राथम्याने लाभ द्यावा. जर दारिद्र्य रेषेखालील महिला लाभार्थी पुरेशा प्रमाणात न सापडल्यास रूपये 50,000/- पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या अन्य महिला लाभार्थींना या योजनेचा लाभ देण्यात यावा, असे स्पष्ट निर्देश असताना विभागाने अशी कार्यपद्धती न अवलंबिता सरसकट लाभार्थी निवडून त्यांना शिलाई मशीनचे वाटप केल्याचे दिसून आले. त्यामुळे अवलंबिलेली प्रक्रिया ही वित्तीय औचित्यास अनुसरून नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 मधील सूचनेनुसार एकूण खर्चाच्या 3 टक्के रक्कम ही अपंग महिलांसाठी खर्च करण्यात यावी, असे स्पष्ट निर्देशित असताना विभागाने अशी कार्यपद्धती अवलंबिलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील प्रकरण क्रमांक 4.4.2 मधील अट क्रमांक 3 अन्वये खुल्या निविदेतील अंदाजित खर्च रूपये 25 लाख ते 5 कोटी पर्यंतची खरेदीची जाहिरात एका प्रमुख विभागीय स्तरावरील वर्तमानपत्रात आणि एका राज्यस्तरावरील वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे. परंतु, निविदा ऑनलाईन केल्यानंतर दिनांक 03/10/2016 रोजी दैनिक लोकपत्र व दैनिक राजसम्राट या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. तेंव्हा याबाबत उक्त शासन निर्णयानुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक पंरास-2012/प्र.क्र.104/वित्त-3, दिनांक 16/10/2012 अन्वये जिल्हा परिषदांनी साहित्याची खरेदी करताना खरेदी प्रक्रिया ही पारदर्शी पद्धतीने होण्या संदर्भात खालील मुद्यांवर काटेकोरपणे कार्यवाही करण्याचे निर्देश आहेत.

(i) जे साहित्य खरेदी करावयाचे आहे, त्याच्या गुणवत्तेबाबत खात्री करावी.

(ii) सदर साहित्याची बाजारभावापेक्षा जास्त दर नसल्याची खात्री करावी.

(iii) साहित्य हे सुस्थितीत व मापदंडाप्रमाणे असल्याची खात्री करून त्याची संबंधित कार्यालयाकडून तांत्रिक तपासणी करून घावी. परंतु, अशी उचित कार्यवाही केलेचे अभिलेखे संचिकेत दिसून आली नाहीत.

5) रुपये 1,900/- मूल्यांच्या मुद्रांकावर करारनामा करणे आवश्यक होते. परंतु, विभागाने रूपये 500/- मूल्यांच्या मुद्रांकावर करारनामा केलेला आहे. तरी कमी रक्कम रूपये 1,400/- रामकृष्ण सोलार फर्निचर & इलेक्ट्रिकल्स, परभणी यांचे कडून वसूल होणे आवश्यक आहे. तसेच करारनामा तपासला असता त्यावर साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या दिसून आल्या नाहीत.

6) या योजने अंतर्गत शिलाई मशीनचा लाभ घेण्यासाठी लाभार्थीकडे शासनमान्य संस्थेकडे शिलाई मशिन चालविण्याचे प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच या योजनेच्या अटी व शर्ती मध्ये सदर बाब नमूद करणे आवश्यक होते. परंतु, या योजनेच्या अटी व शर्ती मध्ये ही बाब नमूद केलेली नाही. तसेच लाभार्थींचे मंजूर प्रस्ताव अर्ज तपासले असता त्या अर्जासोबत शासनमान्य संस्थेकडे शिलाई मशिन चालविण्याचे प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र जोडलेले नाही. त्यामुळे योग्य लाभार्थीची निवड झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे केलेली निवड प्रक्रिया ही वित्तीय औचित्यास अनुसरून नसून सदर बाब महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 च्या शासन निर्णयाचे उल्लंघन करणारी आहे.

7) सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांची बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या शिफारशीसह विहित नमुन्यातील प्राप्त झालेल्या अर्जाची तपसणी केली असता रूपये 100/- बॉ डवर साहित्य विक्री हस्तांतरण न करण्याचे हमीपत्र अर्जासोबत दिसून आले नाही.

8) एकाच लाभार्थ्यास शासन जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरून दुबार लाभ मिळाले नसलेबाबतची पडताळणी करण्यासाठी विभागाने विभाग स्तरावर लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापि, विभागाने अशी नोंदवही ठेवलेली नाही.

9) योजनेच्या अंमलबजावणी नंतर लाभार्थी महिलांकडून उपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त करून घेण्यात आलेली नाहीत. तसेच योजना अंमलबजावणी नंतर योजनेचा फलश्रुती अहवाल निर्गमित केलेला नाही.

**3.932 90 टक्के अनुदान व 10 टक्के लाभार्थी हिस्स्यातून ग्रामीण भागातील मुलींना व महिलांना व्यवसायिक व तांत्रिक योजनाअंतर्गत ब्युटी पार्लर प्रशिक्षण योजनेतील अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद परभणीच्या सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात जिल्हा परिषद उपकरातून 90 टक्के अनुदान व 10 टक्के लाभार्थी हिश्यातून ग्रामीण भागातील मुलींना व महिलांना व्यवसायिक व तांत्रिक योजनाअंतर्गत ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण देणे या बाबीवर विभागाने रक्कम रूपये 27,48,000/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2012/प्र.क्र.680/ वित्त-9, दिनांक 31/01/2013 मधील टीप 1 प्रमाणे- विभाग स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रीक मान्यतेची व निविदा स्विकारलेची माहिती पुढील स्थाई समिती व विषय समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे. परंतु, अशी कार्यवाही झालेचे दिसुन आले नाही.

2) सदर योजनेस उपरोक्त शासन निर्णयानुसार ग्रामपंचायत पातळीवरून प्रसिद्धी देऊन इच्छुक लाभधारकाकडून अर्ज मागवून प्राप्त अर्जातून अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या लाभार्तीची निवड करून त्यास समितीची मान्यता घेऊन लाभ देणे आवश्यक होते. तथापि, अशी कार्यपद्धती अवलंबलेचे दिसून आले नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/पंरा-1 दिनांक 24/01/2014 मधील सूचनेनुसार एकूण खर्चाच्या 3 टक्के रक्कम ही अपंग महिलांसाठी खर्च करण्यात यावी, असे स्पष्ट निर्देशित असताना विभागाने अशी कार्यपद्धती अवलंबिलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/ उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील प्रकरण क्रमांक 4.4.2 मधील अट क्रमांक 3 अन्वये खुल्या निविदेतील अंदाजित खर्च रूपये 25 लाख ते 5 कोटी पर्यंतची खरेदीची जाहिरात एका प्रमुख विभागीय स्तरावरील वर्तमानपत्रात आणि एका राज्यस्तरावरील वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे. परंतु, निविदा जाहिरात वर्तमानपत्रात प्रसिध्द केल्याचे दिसून आले नाही.

5) या योजनेच्या निविदेतील अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत:-

(i) अट क्रमांक 11 प्रशिक्षणे सुरु झाल्यानंतर तात्काळ प्रशिक्षण स्थळ निहाय नेमलेल्या प्रशिक्षकांची यादी या कार्यालयास द्यावी लागेल.

(ii) अट क्रमांक 18 संस्थेने सादर केलेल्या प्रशिक्षकांच्या यादीतील प्रशिक्षकांनीच प्रशिक्षण देणे अनिर्वाय असेल.

(iii) अट क्रमांक 20(3) सदर प्रशिक्षणाच्या संपूर्ण थेअरीच्या सविस्तर नोट्स प्रत्येक प्रशिक्षणार्थीस देणे अनिर्वाय राहील.

(iv) अट क्रमांक 20(4)(14) प्रशिक्षण पूर्ण झालेबाबतचे प्रमाणपत्र संबंधित प्रशिक्षणार्थीस देणे आवश्यक असेल.

उक्त अटी व शर्तीसंबंधीची अभिलेखे अथवा त्याबाबत केलेल्या कार्यवाहीसंबंधीची अभिलेखे संचिकेत दिसून आली नाहीत.

6) सदर प्रशिक्षणाच्यावेळी वेळोवेळी प्रशिक्षणास दिलेल्या प्राधिकारी, अधिकारी / कर्मचारी यांचे भेटींचे शेरेबुक लेखापरीक्षणात उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

7) निविदेतील अट क्रमांक 14 नुसार बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रशिक्षण केंद्रांना भेटी देऊन निविदेतील अटी व शर्ती नुसार प्रशिक्षण दिले जात आहे काय, याची पडताळणी करून विभागास तसे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. परंतु, बालविकास प्रकल्प अधिकारी मानवत, जिंतूर, सेलू, पाथरी यांनी अशी कार्यवाही केलेबाबतची अभिलेखे संचिकेत दिसून आली नाहीत.

8) सदर योजना राबविल्यामुळे प्रस्तावनेत नमूद केलेले योजनेचे उदिष्ठ साध्य झालेबाबत व योजना यशस्वी झालेबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे तसेच सक्षम प्राधिकारी यांचा योजनेबाबतचा फलश्रुती अहवाल लेखापरीक्षणास पहावयास मिळाला नाही.

**3.933 महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणेकरीता नोंदविलेल्या खर्चामधील अनियमितता.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** महिलांसाठी समुपदेशन केंद्र चालविणेकरीता रक्कम रूपये 3,78,000/- खर्च झाला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 अन्वये कुटुंबातील मारहाण, लैंगिक छळ व इतर तऱ्हेने त्रासलेल्या तसेच मानसिकदृष्टया असंतुलित

महिलांच्या सामाजिक, मानसशास्त्रीय, कायदेशीर समुपदेशनसाठी सदरील योजना राबवायची आहे. उपरोक्त तिनही स्वयंसेवी संस्थांना राज्य महिला आयोगाची सहमती असलेबाबत परिपूर्ण अभिलेखे लेखापरीक्षणास दर्शवून पुर्तता करावी.

2) वसमत तालुक्यातील स्वयंसेवी संस्थेस (संतोषीमाता महिला मंडळ आरळ ता.वसमत) हिंगोली येथे तर औंढा येथील स्वयंसेवी संस्थेस (पुजा महिला विकास संस्था पुरजळ ताऔढा) वसमत येथे समुपदेशनाचे काम देण्याबाबत खुलासा करावा.

3) संबंधित स्वयंसेवी संस्थेस कार्यरत विधी सल्लागार तसेच समुपदेशन यांचेकडे आवश्यक ती शैक्षणिक पात्रता असलेबाबतची वैध कागदपत्रे / प्रमाणपत्रे संचिकेत आढळून आली नाही. तिनही संस्थाकडे कार्यरत विधी सल्लागार व समुपदेशक योग्य त्या शैक्षणिक पात्रतेचे व वैध असलेबाबत अभिलेख्याद्वारे खात्री पटवावी.

4) संबंधित संस्थांनी मुख्यत: संतोषीमाता महिला मंडह यांनी सरासरी दरमहा प्राप्त 5 तक्रारींचे संदर्भात फक्त नोटीस देण्याची कार्यवाही केल्याचे दिसले. बरीच न्यायालयीन प्रकरणे संस्थांनी हाताळल्याचे दिसले. प्राप्त तक्रारी बाबत केवळा कोर्टात केस चालू आहे असा शेरा संस्थांनी दिला आहे; म्हणजे केवळ संख्यात्मक केसेस दर्शविल्याचे दिसते.

5) सदरील संस्थांना मानधन अदा करतांना दरमहा किती प्रकरणे निकाली काढणे बंधनकारक आहे याचा तपशिल योजनेच्या प्रारूप आराखडयात नमूद नाही.

6) समुपदेशन केंद्रास मान्यता देणे व त्याकरीता उपकरातून निधी खर्च करणे याची फलनिष्पत्ती काय झाली याबाबत अहवालाद्वारे पूर्तता करावी.

7) सदरील केंद्रांना प्रत्येक महिन्यास जिल्हा परिषदेच्या बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी कामकाजाबाबत विस्तृत अहवाल देणे आवश्यक होते.

8) सदरील संस्थांचे सनदी लेखापाल यांचे लेखापरीक्षणत अहवाल विभागाने वितरीत अनुदानोच संदर्भात तपासणे आवश्यक आहे.

**3.934 90 टक्के अनुदानावर शिलाई मशीन पुरवठा करणे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** 90 टक्के अनुदानावर शिलाई मशीन पुरवठा करणे रक्कम रूपये 19,69,812/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जसलंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडीपीए-2008/प्र.क्रं.446/ वित्त व मुंबई, दिनांक 20/06/2008 मध्ये नमुद केल्यानुसार व परिशिष्ट "ई" मध्ये नमुद केल्यानुसार दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यात आलेली नाही.

2) या योजनेअंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या शिलाई मशीनचा पुरवठा पंचायत समिती स्तरावर करण्याचे आदेश पुरवठादारास देण्यात आले.

3) पंचायत समिती, नायगावमध्ये 15 लाभार्थीचे अर्जावर दिनांक नाही व ते आवक नोंदवहीमध्ये नोंदविलेले नाहीत. तसेच त्यांचे शिलाई मशीन प्रमाणपत्र संशयास्पद वाटते तर 02 लाभार्थीचे उत्पन्नाचा दाखला कोरा आहे.

4) पंचायत समिती, मुदखेडमध्ये 04 लाभार्थ्यांच्या अर्जावर दिनांक नमूद नाही व ते अर्ज आवक नोंदवहीमध्ये नोंदविलेले नाहीत. तसेच त्यांनी सादर केलेले शिवणकला प्रशिक्षण प्रमाणपत्रे अर्धवट किंवा संशयास्पद वाटतात. त्यांचे उत्पन्न रूपये 50,000/- पेक्षा जास्त असलेने ते सर्व अर्ज अपात्र आहेत.

5) कंधार पंचायत समितीने एकुण (एस.सी.पी-14, ओ.टि.एस.पी.-23, उपकर-14 = 51) पैकी 07 नग शिल्लक असल्याचे लेखापरिक्षण दिनांकापर्यंत साठानोंदवही वरुन दिसुन आले असुन प्रत्यक्षात एकही शिल्लक नसल्याचे संबधिताने सांगितले असुन 1190 x 44 = 52,360/- लाभार्थी हिस्सा रक्कमेचा भरणा करण्यासाठी रूपये 52,360/- चा डी.डी. काढला नसल्याचे दिसुन येते. सबब रूपये 52,360/- व शिल्लक नसलेल्या साहित्याचे रूपये 11,895 * 07 = 83,265/- संबधिताने अपहार केल्याचे लेखापरिक्षणाचे मत आहे. नस्तीची पडताळणी केली असता

मंजुर लाभार्थी यादी वाटप केलेल्या 44 नगापैकी 40 ची यादी असतांना 44 वाटप करणे संशयास्पद आहे. मंजुर यादीतील व साहित्य वाटप करण्यात आलेले लाभार्थी एकुण 10 दिसुन येतात.

6) पंचायत समिती, कंधारमध्ये 10 लाभार्थ्यांचे अर्जावर दिनांक नाही व ते आवक नोंदवहीमध्ये नोंदविलेले नाहीत. 05 लाभार्थ्यांचा करारनामा कोरा आहे.

7) पंचायत समिती, धर्माबाद व मुखेड कडील साठा नोंदवहया दर्शविण्यात आल्या नसून नोंदवहया लेखापरीक्षणात सादर केलेल्या नाहीत. त्यामुळे साठा व विनियोगाची खात्री पटू शकली नाही. साहित्य वाटपाअभावी पडून असल्याने योजनेचे उद्दीष्ट साध्य झाले नाही.

8) एकाच लाभार्थ्यास शासन, जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरून दुबार लाभ मिळाले नसलेबाबतचे पडताळणी करण्यासाठी लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापि, अशी नोंदवही ठेवलेली नाही.

9) जि.प.उपकरातून योजना राबवितांना योजनेचे प्रारूप तयार करून लाभार्थी निवड पद्धती अटी/शर्ती निश्चित करणे आवश्यक आहे तथापी महिला व बालकल्याण विभागाने प्रारूप व लाभार्थी निवड पद्धती निश्चित न केल्यामुळे अपात्र लाभार्थीची निवड होवून लाभ दिल्याची श्यक्यता नाकारता येत नाही.

10) जिल्हा परिषद स्तरावर साठा नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु, विभागाने नोंदवही ठेवलेली नाही. साहित्य जमा व वाटपाच्याबाबत गटविकास अधिकारी यांच्या प्रमाणीत स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या नाहीत. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 91 नुसार गटविकास अधिकारी यांनी दर सहा महिन्यांनी साठ्याची तपासणी करणे आवश्यक असतांना तसे केलेले नाही.

**3.935 अंगणवाडयांना साहित्य (प्लास्टिक मॅट) पुरवठा करणे खर्चातील अनियमितता.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** प्लास्टिक म्याट खरेदी करणेकरीता रूपये 4,98,238/- चा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जसलंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडीपीए-2008/प्र.क्रं.446/ वित्त व मुंबई, दिनांक 20/06/2008 मध्ये दिनांक 20/06/2008 मध्ये नमुद केल्यानुसार व परिशिष्ट “ई” मध्ये नमुद केल्यानुसार दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यात आलेली नाही.

2) या योजनेअंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या एकुण 279 नग (प्लास्टिक मॅट) पुरवठा पंचायत समिती स्तरावर करण्याचे आदेश पुरवठादारास देण्यात आले. अर्धसमास पत्र क्रमांक 01 दिनांक 07/10/2017 अन्वये मागणी करूनही पंचायत समिती धर्माबाद, मुखेडकडील साठा नोंदवहया दर्शविण्यात आल्या नाहीत. त्यामुळे साठा व विनियोगाची खात्री पटू शकली नाही.

3) निविदा नस्तीची पडताळणी केली असता निविदेतील मॅटचा दर रूपये 1,765.80 प्रती नग असतांना पुरवठा आदेशात रूपये 1,785.8 दर्शवुन रूपये 20/- ने 279 नग चे रूपये 5,580/- ज्यादा प्रदान झाल्याचे दिसुन येते.

4) सदर योजना राबवितांना प्रत्यक्ष तालुकानिहाय किती मोठ्या अंगणवाड्या ISO नोंदणीकृत आहेत. तसेच प्रत्यक्षात या आधी किती अंगणवाड्यांना मॅटचा पुरवठा करण्यात आलेला आहे. त्यानुसार मागणी नोंदवुन साहित्य खरेदी करणे आवश्यक असतांना तसे केलेले नाही. तसेच याबाबत कोणतेच अभिलेखे उपलब्ध झालेले नाहीत.

**3.936 शासन हास्तातंरण वैयक्तीक लाभाच्या योजना न राबविणे बाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद सन 2016-2017 या वर्षाचे लेखा परिक्षणात अंदाजपत्रकिय तरतूद रुपये 7260000/- मंजूर असताना रुपये 42480/- खर्च केलेला असुन उर्वरित रुपये 7217520 /-अखर्चीत आहे. सदर योजना न राबविल्यामुळे मागासवर्गीय व अपंग लाभार्थी वैयक्तीक लाभार्थी योजने पासुन वंचित राहिलेले आहेत.

**3.937 जिल्हा परिषद उपकर योजने मधुन वैयक्तीक लाभाच्या योजना न राबविणे बाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबाद सन 2016-2017 या वर्षाचे लेखा परिक्षणात अंदाजपत्रकिय तरतूद रुपये 6131000/- मजूर असताना रुपये 1509991/- खर्च केलेला असुन रुपये 4621009 /-. अखर्चीत रक्कम जिल्हा परिषद खाती भरणा केलेली आहे. सदर योजना न राबविल्यामुळे ग्रामिन भागातील महिला लाभार्थी वैयक्तीक योजने पासुन वंचित राहिलेले आहेत.तसेच शासन निर्णय क्. झेडपीई-10/2001/प्र.क्र.206/05 दिनांक 06.11.2001 नुसार त्या त्या वर्षात निधी खर्च न झाल्यास पुढील वर्षी अनुशेषासह तरतूद करणे आवश्यक आहे.अशी तरतूद करुन अनुपालन दर्शवावे.

**3.938 सादिल साहित्य खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** महिला बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांनी सादील साहित्य खरेदीवर लेखापरीक्षण निवड महिन्यात 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 47,993/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता, 1968 चे नियम 80 नुसार नमुना क्रमांक 30 मध्ये आकस्मिक खर्चाची नोंदवही मध्ये नोंद घेणे आवश्यक आहे. तसेच साहीत्य खरेदीच्या नोंदी नियम 91 नुसार नमुना क्रमांक 33 साहीत्याच्या साठा नोंदवहीमध्ये घेणे आवश्यक असताना याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III / उद्योग-4, दिनांक 01/12/2016 मधील परिच्छेद 3.2.2 व 3.2.3 अन्वये जेंव्हा खरेदीची किंमत रुपये 5,000/- पेक्षा जास्त असेल तेंव्हा खुल्या बाजारातून कमीत कमी 3 वेगवेगळ्या पुरवठादाराकडून दरपत्रके मागवून तुलनात्मकरित्या कमी दरानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तथापि, विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) प्रमाणक क्रमांक 94, 31/03/2017, रक्कम रुपये 21,682/- मध्ये एकाच पुरवठादाराकडून साहित्य खरेदी केलेले आहे. परंतु सदरील साहित्य विभागणी करुन रक्कम रुपये 5,000/- च्या आतील उपप्रमाणके दर्शवून दरपत्रके न मागविता खरेदी केलेले आहेत.

उपरोक्त शासन निर्णयातील नमुद परिच्छेदात खरेदी करताना विभागणी करुन खरेदी करणे टाळण्यात यावे असे स्पष्ट निर्देश असताना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) सदरील साहित्य खरेदीचे रक्कमा संबंधितास प्रदान केलेबाबत वाटप नोंदवही लेखापरीक्षणास दर्शविली नसल्यामुळे सदरच्या रकमा संबंधितास मिळाल्याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

5) प्रमाणक क्रमांक 74, दिनांक 30/03/2017, रुपये 14,000/- चा खर्च डिजीटल वजनकाटे खरेदीसाठी केलेला आहे. सदर सादील खर्चापोटीची रक्कम 2236-पोषण आहार, कर्मचारी वेतन व भत्ते या लेखाशीर्षामधून अदा केली आहे. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.